सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, ०९ जानेवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक २८६ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा, अधिसूचना महाराष्ट्राला सुपूर्द : उदय सामंत

नवी दिल्ली, ८ जानेवारी : मराठी भाषेला अभिजात भाषेचा मान मिळाल्याबाबतची अधिसूचना आज केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी मराठी भाषा आणि उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याकडे सुपूर्त केली असल्याची माहिती श्री सामंत यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष सदानंद मोरे, अभिजात भाषा पाठपुरावा समितीचे अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर मुळे, तसेच ज्येष्ठ साहित्यिक प्रदीप ढवळ व राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. शामकांत देवरे उपस्थित होते.

मराठी भाषेचं स्वप्न पूर्ण



श्री सामंत यांनी या ऐतिहासिक प्रसंगी आनंद व्यक्त करत पत्रकारांना माहिती देत सांगितले, ११ वर्षांपूर्वी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी प्रस्ताव पाठवला होता. तेव्हा ते मराठी भाषेचे राज्यमंत्री होते. याबाबतची अधिसुचना आज स्वीकारताना त्याच विभागाचा कॅबिनेट मंत्री आहे, हा मोठा योगायोग आहे. महाराष्ट्राच्या प्राकृत भाषेला हा मान मिळाल्याचा अभिमान असल्याच्या भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या.

पंतप्रधान मोदींना महाराष्ट्राचे आभार

महाराष्ट्राच्या जनतेच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानत, मंत्री सामंत यांनी हा ऐतिहासिक निर्णय घेतल्याबद्दल धन्यवाद दिले.

मराठी भाषेच्या विकासासाठी निधीची मागणी

केंद्रीय सांस्कृतिक मंत्री श्री शेखावत यांच्याशी झालेल्या भेटीमध्ये श्री सामंत यांनी महाराष्ट्राच्या प्राकृत भाषेला निधीची अधिक उपलब्धता करून देण्याची विनंती केली. तसेच पुण्यात होणाऱ्या आगामी विश्व मराठी संमेलनाला श्री.शेखावत यांनी येण्याचं मान्य केलं असल्याची माहिती त्यांनी योवळी दिली. दिल्लीच्या साहित्य संमेलनाच्या पाठीशी राज्य शासन उभे असल्याचे ही श्री. सामंत यांनी यावेळी सांगितले.

पुढील महिन्यात होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर अभिजात भाषेचा दर्जा हा महत्वाचा टप्पा ठरला आहे. मागील वर्षीपासून साहित्य संमेलनासाठी राज्य शासनाने दोन कोटी रुपयांची मदत देण्याचा निर्णय घेतला असून यावर्षी ही तेवढीच मदत दिली जाईल, असे श्री. सामंत म्हणाले.

**दिल्लीतील मराठी शाळांसाठी प्रयत्न** – दिल्लीतील मराठी शाळा सुदृढ करण्यासाठी महाराष्ट्र सरकार विशेष प्रयत्न करेल, असे आश्वासन श्री. सामंत यांनी यावेळी दिले.

## डॉ. व्ही नारायणन इस्रोचे नवे प्रमुख

नवी दिल्ली , ८ जानेवारी (हिं.स.)।भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रोचे (खडठज) नवे प्रमुख म्हणून डॉ. व्ही.नारायणन यांची नियुक्ती करण्यात आली आहे.केंद्र सरकारने मंगळवारी याबाबतची घोषणा केली. याशिवाय व्ही नारायणन यांच्याकडे अंतराळ सचिव पदाचीही जबाबदारी देण्यात आली आहे. सध्या इस्रोचे प्रमुख एस सोमनाथ त्यांची जागा व्ही नारायणन १४ जानेवारीला पदाची सूत्रे हाती घेतील.



डॉ.एस. सोमनाथ हे त्यांचा दोन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करून १४ जानेवारी रोजी निवृत्त होणार आहेत. ३ वर्षांच्या कार्यकाळानंतर ते निवृत्त होत आहेत. त्यांच्या जागेवर आता डॉ.व्ही.नारायणन यांच्या नियुक्तीची घोषणा मंगळवारी करण्यात आली आहे. व्ही नारायणन यांचा कार्यकाळ दोन वर्षांचा असणार आहे. सध्या ते वलियमाला इथल्या लिक्विड प्रोपल्शन सिस्टिम सेंटरचे संचालक आहेत. वरिष्ठ शास्त्रज्ञ असलेल्या नारायणन यांच्याकडे अंतराळ क्षेत्रातला ४० वर्षांचा अनुभव आहे. ते रॉकेट आणि स्पेसक्राफ्ट ऑपरेशनचे तज्ज्ञ आहेत. लिक्विड प्रोपल्शन सिस्टीम सेंटरच्या संचालक पदाच्या संपूर्ण कार्यकाळात डॉ.व्ही.नारायणन यांच्या मार्गदर्शनाखाली इस्रोच्या विविध मोहिमांसाठी १८३ लिक्विड प्रोपल्शन सिस्टम्स आणि कंट्रोल पॉवर प्लांट्स वितरित करण्यात आले आहेत. डॉ.व्ही.नारायणन हे इस्रोमधील जेष्ठ शास्त्रज्ञ आहेत. त्यांनी जवळपास चार दशके इस्रोत अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केलेलं आहे.

व्ही नारायणन यांनी ऋडङत चज्ञ खखख च्या ३२५ क्रायोजेनिक प्रकल्पाचं प्रकल्प संचालक म्हणून काम केलेलं आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली ३२५ स्टेज यशस्वीपणे विकसित केलं गेलं. या बरोबरच डॉ.व्ही.नारायणन यांनी आदित्य अंतराळयान आणि ऋडङत चज्ञ-खखख मिशन्स आणि चांद्रयान-२ आणि चांद्रयान-३ च्या मोहिमेमध्ये देखील त्यांनी महत्वाचं योगदान दिलेलं आहे.

## 'एक देश, एक निवडणूक'साठी जेपीसीची पहिली बैठक

नवी दिल्ली (वृत्तसंस्था) : देशातील लोकसभा आणि सर्व राज्यांमधील विधावसभा निवडणुका एकत्र घेण्याची तरतूद असलेल्या दोन विधेयकांवर विचारविनिमय करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या जेपीसी अर्थात संयुक्त संसदीय समितीची पहिली बैठक बुधवारी झाली. भाजपाचे खासदार पी.पी. चौधरी यांच्या अध्यक्षतेखालील या समितीच्या पहिल्या बैठकीमध्ये कायदे मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनी जेपीसीच्या सदस्यांना दोन्ही प्रस्तावित कायद्यामधील तरतुदींची माहिती दिली. या बैठकीला काँग्रेसच्या नेत्या प्रियांका गांधीही उपस्थित होत्या.

वन नेशन-वन इलेक्शनच्या पहिल्या बैठकीमध्ये समितीचा कार्यकाळ वाढवण्याच्या विषयावर सर्व सदस्यांमध्ये एकमत झाले. त्याबाबतचा प्रस्ताव हा पुढच्या अधिवेशनात दिला जाईल. या समितीला अर्थसंकल्पीय अधिवेसनाच्या शेवटच्या आठवड्यातील पहिल्या दिवसापर्यंत आपला अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले आहे. दरम्यान, वन नेशन वन इलेक्शनबाबतचे विधेयक १७ डिसेंबर रोजी लोकसभेत सादर करण्यात आले होते.

या विधेयकाला विरोधी पक्षांकडून तीव्र विरोध झाल्यानंतर सरकारने वन नेशन वन इलेक्शनबाबत अभ्यास करण्यासाठी ३९ सदस्यांच्या संयुक्त संसदीय समितीची स्थापना केली आहे. या समितीमध्ये भाजपाचे १६, काँग्रेसचे ५, समाजवादी पार्टी, तृणमूल काँग्रेस आणि द्रमुकचे प्रत्येकी २, शिवसेना, टीडीपी, जेडीयू, आरएलडी, एलजेपी (रामविलास), जनसेना पार्टी, शिवसेना (उबाठा), एनसीपी (एसपी), माकप, आप, बीजू जनता दल आणि वायएसआर काँग्रेस यांच्या प्रत्येकी एका सदस्याचा समावेश आहे.

## राज्यातील सर्व शाळांमध्ये आता मराठी शिकवणं अनिवार्य

मुंबई, ८ जानेवारी : महाराष्ट्रामध्ये इंग्रजी शाळेचे प्रमाण वाढते आहे. इंग्रजी शाळांमधून मराठी शिकवण्याची टाळाटाळ केली जात आहे. तसेच नव्या राज्य अभ्यासक्रम आराखड्यात मराठी हा विषय पर्यायी करण्यात आल्याची चर्चा असताना शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी एक मोठा निर्णय घेतला आहे. आता शाळांमध्ये मराठी भाषा शिकवणे अनिवार्य असल्याची माहिती शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिली आहे. महाराष्ट्र राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी शिकवणं बंधनकारक असणार आहे, असे देखील त्यांनी नमूद केले आहे.



राज्यामध्ये पुन्हा एकदा महायुती सरकार आल्यानंतर दादा भुसे यांनी शालेय शिक्षणमंत्री म्हणून पदभार स्वीकारला. दादा भुसे हे आता क्शनमोडमध्ये आले असून राज्यातील सर्व शाळांमध्ये आता मराठी हा विषय अनिवार्य करण्यात आला आहे. दादा भुसे म्हणाले की, शालेय शिक्षण विकासाचा एक दशसूत्री कार्यक्रम जाहीर करून तो राबवला जाईल. इंग्रजी भाषा आवश्यक असली तरी राज्यात मराठी भाषा महत्त्वाची आहे.आता या भाषेला केंद्राकडून अभिजात ही दर्जा मिळाला आहे. त्यामुळे इंग्रजी शाळांमध्ये मराठी शिकवणे बंधनकारक आहे. मात्र तरी काही शाळा यातून पळवाट काढत आहेत. अनेक इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवली जात नसल्याच्या तक्रारीही येत आहेत. आता राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी शिकवणे सक्तीचा कायदा करण्यात आला आहे. यामुळे खासगी, सीबीएससी, आयसीएससी किंवा कोणत्याही इंग्रजी बोर्डाच्या शाळांना हा नियम लागू असणार आहे. त्यानुसार मराठी भाषा शिकवली गेलीच पाहिजे, अशा सूचना दादा भुसे यांनी केल्या आहेत.

पुढे बोलताना दादा भुसे म्हणाले, तसेच मराठी भाषेचे अध्यापन करण्यास टाळाटाळ करणाऱ्या इंग्रजी शाळांवर शालेय शिक्षण विभागाची करडी नजर असणार आहे. ज्या शाळा मराठी भाषा शिकवण्यास टाळाटाळ करत असतील, त्याची तक्रार पालकांना करता येणार आहे. तसेच या अशा शाळांवर योग्य ती कारवाई केली जाणार आहे, असा सूचक इशारा देखील शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी ओळख दिला आहे.अनेक इंग्रजी माध्यमांच्या तसेच विविध बोर्डाच्या शाळांकडून मराठी भाषा शिकवण्यास टाळाटाळ केली जात होती. मात्र आता महाराष्ट्र राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी शिकवणं बंधनकारक असणार आहे.

## बिबट्याने पाडला गाय चा फडशा; शेतकऱ्यांला तात्काळ मदत द्यावी

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ८ जानेवारी : पैठण तालुक्यातील डोणगाव तांबे येथे गेले चार ते पाच महिन्यांपासून बिबट्याची मोठ्या प्रमाणावर दहशत निर्माण झाली आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी यांना कळविले असता वनविभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले असून बिबट्याने गायचा फडशा पाडला आहे असे त्यांनी सांगितले.

डोणगाव बाळानगर परिसरातील शेतकऱ्यांनी वन विभागाने बिबट्याचा पिंजरा आणून बंदोबस्त करावा असे मागणी केली आहे. परंतु अद्याप पर्यंत बिबट्याला पकडण्यात वनपरिक्षेत्राला यश आले नाही. अशातच दि. ८ जानेवारी २४ वार बुधवार रोजी शेतकरी भाऊसाहेब भाऊराव तांबे यांच्या मालकीच्या शेतात गट नंबर १६३ यांच्या शेतातील गाय गोठ्यात वन्य प्राणी बिबट्याने अंदाजे रात्री दोन ते तीन वाजता बिबट्याने गायचा फडशा पाडला सदर घटनेमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे हि नुकसान भरपाई शेतकरी भाऊसाहेब भाऊराव तांबे यांना तात्काळ मदत द्यावे अशी मागणी शेतकरी भाऊसाहेब भाऊराव तांबे तसेच परिसरातील शेतकरी यांनी केली आहे.परिसरातील पहिली घटना ही दादा गोपीनाथ चव्हाण यांची तर ह्याच महिन्यातील दुसरी घटना भाऊसाहेब भाऊराव तांबे यांची असून शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. डोणगाव परिसराला डोंगराचा भाग आहे. वन्य प्राणी यांना आजूबाजूला पाझर तलाव असल्याने मुबलक पाणी आहे यामुळेच या परिसरात नेहमी बिबट्यांचा वावर असतो. अनेक वेळा गुरे, शेळ्या, मेंढ्यांवर हल्ला करून त्यांना ठार मारले आहे. रात्री मध्यरात्रीच्या सुमारास बिबट्याने हला करून गाय जागीच ठार करून फडशा पाडला आहे. सकाळी शेतकरी उठल्यानंतर शेतात गेले असता दिसता रक्ताचे थारोळे दिसले व गाईचा फडशा पडल्याचा दिसले व बिबट्याच्या पायाचे ठसे उमटलेले दिसले. ठशांच्या मागावरून तपास करत काही अंतरावर झुडपात शरीराचे लचके तोडलेले गाय निदर्शनास पडले दिसले. त्यामुळे बिबट्याचा अजूनही परिसरात वावर असल्याची खात्री झाली. शेतकरी यांनी वनविभागाला माहिती कळविली आहे. शेतकरी यांनी वनविभागाला कळविल्यानंतर वनविभागाच्या अधिकारी अलका राठोड स्वता घटनास्थळी दाखल झाल्या होत्या व त्यांच्या मार्गदर्शना- खाली कर्मचारी वनपाल पैठण अलका राठोड व वनरक्षक प्रशांत निकाळजे, वनरक्षक प्रभू चोरमारे, अमिता शेख ,अहिरे मामा, पशुप्रवेशक डॉ. विलास केदार बालानगर यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आहे. सदर घटनेमुळे सध्या रब्बीच्या पिकांना पाणी देण्यासाठी शेतात राहणारे शेतकरी भयभीत झाले आहे त्यामुळे वनविभागाने याची दखल घेण्याची व पिंजरा आणून बंदोबस्त करावा अशी मागणी शेतकरी भाऊसाहेब भाऊराव तांबे यांनी वन विभागाचे अधिकारी अलका राठोड यांच्याकडे केली आहे.

डोणगाव शिवारातील शेतकरी भाऊसाहेब भाऊराव तांबे यांच्या गाईवर बिबट्याने हल्ला केला असून या हल्ल्यात गाईचा अक्षरता फडशा पडला आहे .त्यामुळे बिबट्याचा अजूनही परिसरात वावर असल्याची शक्यता असून शेतकऱ्यांनी शेतात वावरताना खबरदारी घेण्याचे आव्हान वनपाल अलका राठोड यांनी केले आहे.

## ऑनलाईन शॉपिंगच्या माध्यमातून होतेय ड्रग्जची देवाणघेवाण!

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली दखल; पोलिसांना दिले निर्देश

नवी मुंबई : ड्रग्जने पंजाबसारखे आपले राज्यही पोखरायला सुरुवात केली आहे. वेळीच ते पोलिसांच्या लक्षात आले आहे. पोलिसांनी धडक कारवाई करत काही पेडलर्सना ताब्यात घेतले आहे. त्यांच्या चौकशीत सोशल मीडिया आणि ऑनलाईन प्लॅटफॉर्मवरुन पार्सलच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर ड्रग्जची देवाणघेवाण होत असल्याचे निदर्शनास आले आहे. पोलीस यंत्रणा सतर्क झाली असून असे गैरव्यवहार शोधून काढण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. ते आज नवी मुंबई येथील नशामुक्त नवीमुंबई या कार्यक्रमात बोलत होते.

दरम्यान, आजच्या या नशामुक्त नवीमुंबई या नवीन पर्वाच्या शुभारंभ प्रसंगी वनमंत्री गणेश नाईक, सुप्रसिद्ध अभिनेते आणि ड्रग्जमुक्त नवी मुंबई अभियानाचे ब्रँड अम्बॅसिडर जॉन अब्राहम, आमदार मंदा म्हात्रे, महेश बाल्डी, प्रशांत ठाकूर, विक्रांत पाटील यांसह पोलिस आयुक्त मिलिंद भारंबे, दिपक साकुरे, संजय एनपुरे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी ते म्हणाले की, अतिशय महत्त्वाचं कँपेन नवी मुंबई पोलिसांनी लॉन्च केले आहे. पुन्हा मुख्यमंत्री पदाची धुरा हाती घेतली आणि होम मिनिस्टरची पहिली बैठक घेतली त्यावेळी ज्या मुद्द्यांवर पुढील पाच वर्ष फोकस करायचा आहे त्यामुद्द्यांचा परामर्ष मी घेत होतो,. त्यामध्ये पोलिस विभागाला सांगितलं ड्रग्ज विरुद्ध मोठी लढाई लढायची आहे. आज आपला देश एक मजबूत देश म्हणून पुढे येत आहे. जगातील पाचवी मोठी अर्थव्यवस्था ही भारताची व्यवस्था झाली आहे. पंतप्रधानांच्या नेतृत्वात एक बलशाली भारत आपण पाहतोय ज्याकडे कोणीच वाकड्या नजरेने पाहत नाही.

## मुख्यमंत्र्यांच्या सात कलमी कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी करा : दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर : प्रशासकीय कामकात गतिमानता येऊन सामान्यांचे जीवन सुकर व्हावे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या सात कलमी कृती कार्यक्रमाची प्रत्येक शासकीय कार्यालयाने अंमलबजावणी करावी,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

जिल्ह्यात प्रलंबित फेरफार प्रकरणे निकाली काढण्यासाठी सर्व तहसिलदार, उपविभागीय अधिकारी यांची दुरदृष्य प्रणालीद्वारे बैठक आयोजीत करण्यात आली. बैठकीस जिल्हाधिकारी कार्यालयातून अपर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर उपस्थित होते. जिल्ह्यात प्रलंबित असलेल्या फेरफार प्रकरणे निकाली काढण्यासाठी दि.१५ रोजी विशेष अदालतींचे आयोजन करण्याचे आदेश यापुर्वीच देण्यात आले आहेत. त्यानुसार याबाबत मंडळ अधिकारीस्तरावर होत असलेल्या तयारीचा आढावा जिल्हाधिकारी स्वामी यांनी आज घेतला. तसेच प्रलंबित महसूल अपिलांची प्रकरणे निकाली काढण्यासाठीही राबवावयाच्या कार्यपद्धतीबाबत मार्गदर्शन केले. जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, सामान्य जनतेचे जीवन सुकर करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेला सात कलमी कार्यक्रम मुख्यमंत्री महोदयांनी दिला आहे. त्यानुसार प्रत्येक शासकीय कार्यालयात जुन्या रेकॉर्डचे वर्गीकरण करणे, जुनी वाहने साहित्य इ. निर्लेखित करणे, नागरिकांच्या तक्रारींची दखल घेऊन त्यांची निर्गत करणे, कार्यालयातील वातावरण सुसज्ज ठेवणे. स्वच्छता गृहे, पिण्याच्या पाण्याची सोय, अभ्यागतांसाठी सुविधा आदी बाबींवर प्रकर्षाने कामकाज करावे,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले.

## टोरेस कंपनी घोटाळ्यातील तिघांना अटक, संस्थापक फरार

मुंबई, ८ जानेवारी : मुंबईतल्या टोरेस कंपनीने सव्वा लाखाहून अधिक गुंतवणूकदारांची सुमारे हजार कोटींची फसवणूक झाल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. या फसवणुकीचा आकडा आठ ते दहा हजार कोटीपर्यंत जाऊ शकतो. तर फसवणूक केल्यानंतर पळण्याच्या तयारीत असलेल्या संचालकासह, जनरल मॅनेजर आणि स्टोअर मॅनेजरला शिवाजी पार्क पोलिसांनी मंगळवारी अटक केली. कंपनीचा संस्थापक मात्र युक्रेनला पसार झाला आहे. अटक केलेल्यांमध्ये एक जण रशिया, तर दुसरा उझबेकिस्तनामधील रहिवासी आहे.

शिवाजी पार्क पोलिसांनी उझबेकिस्तानची रहिवासी असलेली जनरल मॅनेजर तानिया कसातोवा, संचालक सर्वेश अशोक सुर्वे आणि रशियन नागरिक असलेली स्टोअर मॅनेजर व्हॅलेंटिना गणेश कुमार या तिघांना अटक केली आहे. तिघेही दादर कार्यालयातील रक्कम, दागिने घेऊन पळण्याच्या तयारीत असतानाच पोलिसांनी त्यांच्यावर झडप घातली. कंपनीचा संस्थापक जॉर्न कार्टर आणि व्हिक्टोरीया कोवालेंको हे दोघेही युक्रेनला पसार झाल्याचे समजते.ते दोघेच या घोटाळ्याचे मास्टरमाईंड असल्याचे समजते. मुख्य कार्यकारी अधिकारी असलेला तौफिक रियाज आणि सीए अभिषेक गुप्ता दोघेही भारतात असून, त्यांच्याविरुद्ध लूक आऊट नोटीस जारी करण्यात आली आहे. मुंबईचा रहिवासी असलेला आरोपी सर्वेश अशोक सुर्वे हा आधार कार्ड ऑपरेटर म्हणून काम करीत होता. त्याला कंपनीचा संचालक बनवण्यासाठी त्याचे नाव, आधार कार्ड आणि डिजिटल सहीचा वापर करण्यात आला. त्याला दरमहा रोखीने २२ हजार रुपये पगार दिला जात होता, असे त्याच्या चौकशीतून निष्पन्न झाले आहे. त्याला डोंगरीतील उमरखाडी परिसरातून अटक करण्यात आली.



टोरेस ज्वेलर्स कंपनीने गुंतवणूकदारांसाठी आकर्षक परताव्याची योजना सुरू केली होती. कंपनीने दादर, गिरगाव, कांदिवली, कल्याण, सानपाडा, मीरा रोड या सहा ठिकाणी शाखा उघडल्या होत्या. सर्वच ठिकाणी लाखो गुंतवणूकदारांनी या योजनेत पैसे गुंतवले होते. काही महिने सुरूवातीला चार टक्के आणि नंतर दहा टक्के परतावा देण्यात आला. पण मागील दोन आठवडे परताना न मिळाल्याने फसणुकीचा प्रकार समोर आला. आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकानेही मंगळवारी या फसवणूक प्रकरणाचा आढावा घेतला. आर्थिक गुन्हे शाखा या प्रकरणाचा तपास करणार आहे. आतापर्यंत याप्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे. सोमवारी टोरेसच्या दुकानांबाहेर गुंतवणूकदारांनी गर्दी करत आपला रोष व्यक्त केला. हा घोटाळा काही हजार कोटींचा असल्याची प्राथमिक माहिती

## कॅनडा अमेरिकेचाच भाग! ट्रम्प यांनी शेअर केला नकाशा, कॅनडामधील नेते संतप्त

वॉशिंग्टन, ८ जानेवारी - डोनाल्ड ट्रम्प हे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेण्यापूर्वीच ऍक्शन मोडमध्ये आल्याचे दिसत आहे. कॅनडा हा काही देश नाही ते तर अमेरिकेचे ५१वे राज्य आहे, असे विधान अमेरिकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे मागील काही दिवस सातत्याने करत आहेत.आता त्यांनी थेट कॅनडाला अमेरिकेचाच एक भाग दर्शविणारा नकाशा सोशल मीडियावर शेअर केला आहे. ज्यावर कॅनडाच्या नेत्यांनी आणि जनतेने तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.

डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडियावर दोन नकाशे शेअर केले आहेत ज्यात त्यांनी कॅनडाला अमेरिकेचा भाग म्हणून दाखवले आहे. या नकाशांद्वारे त्यांनी आपला हेतू पूर्णपणे स्पष्ट करत कॅनडाला अमेरिकेत



समाविष्ट करायचे असल्याचे सांगितले आहे. ट्रुडो यांच्या राजीनाम्यानंतर ट्रम्प यांनी सोमवारी सांगितले की, कॅनडा अमेरिकेचा भाग झाला तर तेथे कोणताही कर लागणार नाही. कर खूप कमी होतील आणि ते रशियन आणि चिनी जहाजांच्या सतत वेढा घालण्याच्या धोक्यापासून पूर्णपणे सुरक्षित होतील. एकत्रितपणे, हा देश किती महान होईल. कॅनडाने ट्रम्प यांच्या प्रस्तावाकडे लक्ष दिलेले नाही. कॅनडाने अमेरिकेच्या दक्षिणेकडील सीमेवरून अंमली पदार्थांची तस्करी आणि बेकायदेशीर स्थलांतर थांबवले नाही तर कॅनडाच्या आयातीवर २५ टक्के कर लागू केला जाईल, असा ट्रम्प यांनी इशाराही दिला आहे. मात्र, ट्रम्प यांच्या या कृतीमुळे कॅनडाचे नेते चांगलेच संतप्त झाले आहेत.

कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी ट्रम्प यांचा प्रस्ताव साफ फेटाळला आहे. ट्रूडो यांनी स्पष्टपणे सांगितले की कॅनडा अमेरिकेचा भाग होण्याची शक्यता नाही. कॅनडा हा स्वतंत्र आणि सार्वभौम देश आहे आणि तो असा कोणताही प्रस्ताव स्वीकारणार नाही, असे त्यांचे म्हणणे आहे.तर कॅनडाच्या परराष्ट्र मंत्री मेलानी जोली यांनीही ट्रम्प यांच्या वक्तव्यावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. त्यांनी एक पोस्ट करून ट्रम्प यांच्या टिप्पण्यांवरून असे दिसून येते की त्यांना कॅनडाची ताकद आणि स्वातंत्र्य पूर्णपणे समजलेले नाही. कॅनडा कधीही धमक्यांकडे झुकणार नाही, असेदेखील जोली यांनी यावेळी म्हटले. ट्रम्प यांच्या प्रस्तावाचा कॅनडाचे विरोधी पक्षनेते पियरे पॉलीवेअर यांनीही निषेध केला आहे. ते म्हणाले, कॅनडा एक महान आणि स्वतंत्र देश आहे आणि अमेरिकेचा सर्वात चांगला मित्र आहे, परंतु हे त्याच्या सार्वभौमत्वाच्या विरोधात आहे. ट्रम्प यांनी निर्माण केलेल्या वादाचा परिणाम कॅनडा आणि अमेरिका यांच्यातील संबंधांवर तर होऊ शकतोच, पण आंतरराष्ट्रीय स्तरावर अमेरिकेच्या प्रतिमेवरही परिणाम होऊ शकतो. कॅनडा आपल्या सार्वभौमत्वाशी तडजोड करणार नाही. असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

## अलिबागच्या समुद्रात मच्छीमार बोट बुडाली, १५ खलाशी बचावले

अलिबाग, ८ जानेवारी : येथील समुद्रात आक्षी साखर भागात 'हिरकन्या' ही मच्छीमारी बोट सोसाट्याच्या वाऱ्यामुळे बुडाल्याची घटना घडली. सुदैवाने बोटीवरील सर्व खलाशी बचावले असले तरी बोट बुडाल्याने तब्बल २० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा बोट मालक जगदीश बामजी यांनी केला आहे. दुसऱ्या मच्छीमारी बोटीतील खलाशांनी वेळीच प्रसंगावधान राखून मदत केल्याने १५ खलाशांचा जीव वाचला आहे.



जगदीश बामजी यांच्या मालकीची हिरकन्या बोट १५ खलाशांसह मासेमारीसाठी निघाली होती. हिरकन्या'मधील खलाशी हे मासेमारी करताना थकून बोटीतच झोपले होते. त्याचवेळी जोरदार वाऱ्यामुळे बोट भरकटली. त्यानंतर काही काळाने बोटीत पाणी भरू लागले. कुलाबा किल्ल्याच्या मागील बाजूस बोट अचानक बुडू लागली. ही घटना समोरून येणाऱ्या बोट चालकाच्या लक्षात येताच, त्याने आरडाओरडा करून हिरकन्यामधील खलाशांना जागे केले. त्यानंतर त्यांना बोटीत घेतले. मात्र, हिरकन्या बोट बुडाली.

हिरकन्या बोट बुडाल्याचे कळताच आम्ही दुसऱ्या बोटीने घटनास्थळी पोहोचलो, असे बोट मालक जगदीश बामजी यांनी सांगितले. मत्स्यव्यवसाय विकास विभागाचे अधिकारी कर्मचारी अलिबाग किनारी पोहोचले असून ते बोटीला झालेल्या अपघाताची माहिती घेत आहेत. अथक परिश्रमानंतर स्थानिकांच्या मदतीने अपघातग्रस्त बोट बाहेर काढण्यात मच्छीमारांना यश आले.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क- स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र. १८५/२०२४

अर्जदार : १) यशवंत हरी फलके, वय-६२वर्ष धंदा-शेती २) शिलाबाई काकासाहेब फलके, वय-५५वर्ष धंदा- घरकाम ३) विठ्ठल काकासाहेब फलके वय ३३ वर्ष धंदा-शेती ४) विशाल काकासाहेब फलके वय-३०वर्ष धंदा-शेती सर्व रा. किन्ही ता. सोयगाव, जि. औरंगाबाद. ५) गंगुबाई गणपत काकडे वय-६० वर्ष धंदा- घरकाम रा.वांगी बु.।। ता. सिल्लोड जि. औरंगाबाद

-: विरुध्द :-

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता.सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र. १ व ५ यांचे वडील व अर्जदार क्र. २ यांचे सासरे तसेच अर्जदार क्र. ३ व ४ यांचे आजोबा कै. हरी संपत फलके यांचा दिनांक ३१/०३/२०२२ रोजी वृद्धपकाळाणे मौजे किन्ही ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ५ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ५ हे कै.हरी संपत फलके यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ५ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ५ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख १७/१/२०२५. आज दि. ०४/०१/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक सहा.अधीक्षक

दिवाणी न्यायालय क-स्तर सोयगाव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र. २०२५

अर्जदार : १) अंजनाबाई अर्जुन उइके, वय-५२ वर्ष धंदा-घरकाम रा. निंभोरा, ता.सोयगाव, जि. औरंगाबाद २) छाया जितेंद्र मडावी, वय-३३ वर्ष धंदा-घरकाम रा.प्लॉट नं.३९, वार्ड नं.६, नवजीवन कॉलनी, वनाडोंगरी, नागपूर.

विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र. २ यांचे वडील कै. अर्जुन शंकर उड्के यांचा दिनांक-२७/०४/२०२३ रोजी मौजे निंभोरा ता.सोयगाव, जि. औरंगाबाद येथे मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ व २ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ व २ हे कै. अर्जुन शंकर उड्के यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ व २ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ व २ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील तारीख ०३/०२/२०२५. आज दि. ०४/०१/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक सहा.अधीक्षक

दिवाणी न्यायालय क-स्तर सोयगाव

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश, क- स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि.औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र. १९८/२०२४

अर्जदार : १) विद्यासागर विजय राठोड, वय-३९ वर्ष धंदा-घरकाम २) सुयश विजय राठोड वय-१६वर्ष धंदा-शिक्षण (अ.पा.क. म्हणून अर्जदार क्र.१) ३) तेजस्विनी विजय राठोड, वय-१४ वर्ष धंदा-शिक्षण (अ.पा.क. म्हणून अर्जदार क्र.१) १ ते ३ रा.हनुमंतखेडा, ता.सोयगाव, जि. औरंगाबाद

-: विरुध्द :-

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता.सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील कै. विजय डिगंबर राठोड यांचा दिनांक-२१/०८/२०२३ रोजी मौजे हनुमंतखेडा, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ३ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे कै. विजय डिगंबर राठोड यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी तरी ज्या ज्या कोणाचा कोणाचा अर्जदार क्र. १ ते ३ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ३ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील तारीख १४/१/२०२५. आज दि.०४/०१/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक सहा.अधीक्षक

दिवाणी न्यायालय क-स्तर सोयगाव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क- स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद**

दिवाणी कि. अर्ज क्र.१९५/२०२४

अर्जदार : १) शांताबाई धनराज चांभार, वय-७०वर्ष धंदा-घरकाम रा. बदरखे ता.पाचोरा. जि. जळगाव २) जानकीबाई शामलाल शेवाळे, वय-६८वर्ष धंदा-घरकाम रा.मुखेड ता. सोयगाव जि.औरंगाबाद. ३) बन्सीलाल डोकरू जाधव, वय-६६ वर्ष धंदा-शेती. ४) अमरसिंग डोकरू जाधव, वय-४८वर्ष धंदा-शेती ३ व ४ रा.वरठाण, ता. सोयगाव जि. औरंगाबाद. ५) सुमन अंतरसिंग पवार, वय-६२ वर्ष धंदा-घरकाम रा. नेहरू चाळ, न्यू लिंक रोड, आनंद नगर, जोगेश्वरी, पश्चिम मुंबई. ६) महादू डोकरू जाधव वय-६० वर्ष धंदा- शेती रा. जयबजरंग चाळ, आनंद नगर, न्यूलिंक रोड, जोगेश्वरी, पश्चिम मुंबई. ७) सुभाष डोकरू जाधव वय-५८ वर्ष धंदा-शेती रा. विकास नगर, झोपडपट्टी, बेहरम बाग, जोगेश्वरी, पश्चिम मुंबई.

-: विरुध्द :-

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र.१ ते ७ यांचे वडील कै. डोकरू तान्हा जाधव यांचा १५/०५/२०२४ रोजी वृद्धपकाळाणे मौजे वरठाण, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ७ है वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ७ हे कै. डोकरू तान्हा जाधव यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ७ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ७ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख १०/०१/२०२५. आज दि. ०४/०१/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक सहा. अधीक्षक

दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र. २२५/२०२४

अर्जदार:- १) मिनाक्षी कैलास निकम, वय-४८वर्ष धंदा-घरकाम रा.गलवाडा (ब), ता. सोयगाव, जि. औरंगाबाद, २) केतकी कैलास निकम, वय-२८ वर्ष धंदा-शिक्षण ३) वैष्णवी कैलास निकम वय-२३ वर्ष धंदा-शिक्षण ४) गंधार कैलास निकम, वय-१८ वर्ष धंदा-शिक्षण वरील २ ते ४ रा.एन-८ ई-१ ४१/४, हनुमान चौक, नवीन सिडको, व्ही.टी.सी. सिडको, नाशिक.

-: विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता.सोयगाव, जि.औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील कै. कैलास नामदेव निकम यांचा दिनांक- ०१/०६/२०२१ रोजी कोविड-१९ मुळे मौजे नाशिक, ता.जि. नाशिक येथिल झाकीर हुसेन हॉस्पिटल नाशिक येथे मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ४ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हे कै. कैलास नामदेव निकम यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ४ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ४ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील तारीख ५/०२/२०२५. आज दि. ०४/०१/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

## जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ०१/२०२५

अर्जदार : १) सुभाष आनदसींग बग्रास, वयः- ५८ दुर्षे, धंदाः- शेती २) दिपक आनंदसींग बयास, ययः ५६ वर्ष, धंदा शेती. ३) सुनिलसींग अनंदसींग बयास, यय.- ५० वर्षे, धंदाः शेती ४) रोशन उत्तमसींग बयास, ययः २७ वर्षे, धदाः शेती. ५) रितेश उत्तमतींग ध्यास, ययः २५ वर्षे, धदा-शेती. ६) सुदेश उत्तमसीग ध्यास, ययः २२ वर्षे, धंदा शेती सर्व अर्जदार रा. दस्तापुर ता. सोयगांव जि. औरंगाबाद.

// विरुध्द //

गैरअर्जदारःनिरंक

अर्ज:- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरगाबाद, यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. नामे सरजुबाई आनंदसिंग ज्यास या दिनांक २७/०२/२००७ ला मौजे दस्तापुर ता. सोयगांव जि औरगाबाद येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणप्रत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे

(पुढील दिनांक:-१७/२/२०२५)

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यानी है जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदाराना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक:- ०८/०१/२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले

विभागीय लिपीक संहाय्यक अधिक्षक

दिवाणी न फौजदारी न्यायालय, सोयगांव

## जाहीर प्रगटन

**जा.क्र.२०२४/विधी/ज.मू. आदेश/ प्र.क्र.३२७३/कावी-३३७३ उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, सिल्लोड दिनांक :-१२.०९.२०२४.**

अर्जदार :- मनीषा शिवलाल सपकाळ, वय २३ वर्ष, व्यवसाय- घरकाम, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ.संभाजीनगर,

विरूध्द

गैरअर्जदार :- मुख्याधिकारी सिल्लोड नगर परिषद सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म - मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी मनीषा शिवलाल सपकाळ, रा. सिल्लोड ता.सिल्लोड, जि.छ. संभाजीनगर, यांचा दिनांक ०४.०६.२००१, रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मनीषा शिवलाल सपकाळ, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ.संभाजीनगर, यांचा दिनांक ०४.०६.२००१, रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असल्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केलो आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर / आक्षेप हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर /आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर /आक्षेप/हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र. २९/२०२५

अर्जदार : सुभाष बाबुलाल जैस्वाल, वय ५३ वर्षे, धंदा शेती, नेहरु नगर रांजणगाव शेणपुंजी, ता गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एस.बी. पदार यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हा वरील नमुद ठिकाणचा रहिवाशी असुन अर्जदाराची आई नामे बसंताबाई बाबुलाल जैस्वाल ह्या मौजे रांजणगाव शेणपुंजी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होत्या, त्या दिनांक १३/०८/२०१८ रोजी मौजे रांजणगाव शेणपुंजी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेल्या आहे. मयत बसंताबाई बाबुलाल जैस्वाल यांना अर्जदार हाच कायदेशीर वारसदार असुन अर्जदाराच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार सांगुन या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्दीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

**जा.क्र.२०२४/विधी/ज.मू. आदेश/प्र.क्र.४५७२/कावि-५१८१ उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, सिल्लोड दिनांक :-२६.१२.२०२४.**

## जाहीर प्रगटन

अर्जदार : नजबुना बी साहेबखाँ पठाण, वय-४८ वर्ष व्यवसाय- घरकाम, रा.उपळी ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार :- ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय उपळी.ता.सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म- मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी नजबुना बी साहेबखों पठाण, रा.उपळी ता.सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांचा दिनांक १०.०५.१९७६ रोजी बाजों पठाण या उपळी ता. सिल्लोड सिजर त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नो मौजे उपळी येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी, अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की नजबुना बी साहेबखॉ पठाण, यांचा दिनांक १०.०५.१९७६ रोजी मोजे उपळी येथे जन्म झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर /आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर /आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश, क- स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र. २२४/२०२४

अर्जदार:-१) अनुसया भावराव बाविस्कर, वय-४५वर्ष धंदा-घरकाम २) अर्चना भावराव बाविस्कर, वय-२४ वर्ष धंदा-घरकाम ३) आशा भावराव बाविस्कर वय-२१ वर्ष धंदा-घरकाम ४) वर्षा भावराव बाविस्कर वय-१८ वर्ष धंदा-घरकाम ५) अपेक्षा भावराव बाविस्कर वय-१३ वर्ष धंदा-शिक्षण (अर्जदार क्र.५ साठी अ.पा.क. म्हणून अर्जदार क्र.१) वरील सर्व रा. निंभोरा, ता.सोयगाव, जि. औरंगाबाद.

-: विरुध्द :-

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण: वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता.सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ५ यांचे वडील कै. भावराव बाबुलाल बाविस्कर यांचा दिनांक-०९/०१/२०२४ रोजी मौजे निंभोरा ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. ते ५ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ५ हे. कै. भावराव बाबुलाल बाविस्कर यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ५ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ५ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील तारीख ०७/०२/२०२५. आज दि. ०४/०१/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक सहा.अधीक्षक

दिवाणी न्यायालय क-स्तर सोयगाव

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश, क- स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि.औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र. २०८/२०२४

अर्जदार : १) कमल धनसिंग सूर्यवंशी, वय-६५ वर्ष धंदा-घरकाम २) गणेश धनसिंग सूर्यवंशी, वय-३६ वर्ष धंदा-शेती ३) अनिता अनिल पाटील, वय-३४ वर्ष धंदा-घरकाम ४) अमोल धनसिंग सूर्यवंशी, वय-३२ वर्ष धंदा-शेती ५) अजबसिंग गणपत सूर्यवंशी, वय-६५ वर्ष धंदा- शेती ६) देवकाबाई गणपत सूर्यवंशी, वय-६३ वर्ष धंदा-घरकाम सर्व रा. वरठाण ता. सोयगाव जि.औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण: वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता.सोयगाव, जि.औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र.१ ची सासू व अर्जदार क्र. २ ते ४ यांची आजी अर्जदार क्र.५ व ६ यांची आई कै. भागाबाई गणपत सूर्यवंशी यांचा २२/१२/२०१६ रोजी वृद्धपकाळाणे मौजे वरठाण, ता.सोयगाव, जि.औरंगाबाद येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ६ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ६ हे कै. भागाबाई गणपत सूर्यवंशी यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ६ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ६ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील तारीख २२/०१/२०२५. आज दि. ०४/०१/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक सहा.अधीक्षक

दिवाणी न्यायालय क-स्तर सोयगाव

## जाहीर प्रगटन

**मा.श्री.के.टी. आढायके साहेब, दिवाणी न्यायाधीश साहेब, क.स्तर सिल्लोड यांच्या न्यायालयात**

एम.ए.क.४४८/२०२४

CNR-MHAU080051792024

अर्जदार : १ पुजाराम केशव पल्हाळ वय ४९ वर्ष व्यवसाय शेती रा. घाटनांद्रा ता. सिल्लोड जि. औरंगाबाद २. चंद्रभागा नामदेव पल्हाळ वय ७८ वर्ष व्यवसाय रा. वरील प्रमाणे वर्ष व्यवसाय घरकाम ३. जिजाबाई नारायण बनसोडे वय ६७ रा.वावाणा ता. फुलंब्री जि. औरंगाबाद ४. रुखमनबाई विश्वनाथ घुगरे वय ७३ वर्ष, व्यवसाय घरकाम रा. पाडली ता.खुलताबाद जि. औरंबागाबाद ५. जनाबाई हरी धोंडकर वय ७२वर्ष, व्यवसाय घरकाम रा. राजंगली कोठा ता.सोयगाव जि. औरंगाबाद ६. आनंदाबाई तुळशीराम गोरे वय ६३ वर्ष, व्यवसाय घरकाम। रा.बोरमाळ तांडा ता.सोयगाव जि. औरंबागाबाद ७. मंदाबाई राजाराम साबळे वय ४८ वर्ष, व्यवसाय घरकाम रा. वडोद चाथा ता.सिल्लोड ८. सुखदेव नामदेव पल्लोड जि. औरंवागावा व्यवसाय नौकरी रा. घाटनांद्रा ता. सिल्लोड जि.औरंगाबाद ह.मु.गणेश नगर, औरंगाबाद ता.जि. औरंगाबाद ९.सुभाष नामदेव पल्हाळ वय ४२ वर्ष, व्यवसाय नौकरी रा. घाटनांद्रा ता. सिल्लोड जि.औरंगाबाद ह.मु. औरंगाबाद ता.जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन मार्फत, जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

विषय : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिर प्रगटानाव्दारे कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी ॲड.एस.एम. बडक यांच्या मार्फत जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मयत नामे गजराबाई केशव पल्हाळ हया मौजे घाटनांद्रा ता.सिल्लोड जि. औरंगाबाद येथील रहिवासी होते.

त्यांचा दि.१७.०९.२०१९ रोजी मौजे घाटनांद्रा ता.सिल्लोड येथे मृत्यू झाला आहे.त्यांचे नामे केवश पुंजाजी पल्हाळ हे दि.२३.१२.२०२१ रोजी मृत्यू झाले आहे. तसेच मयत नामे नामदेव केशव पल्हाळ हे दि.१७.११.२०२१ रोजी मृत्यू झाले आहे. मयताचे अर्जदार क.१ हा मुलगा असून अर्जदार क.२ ही सून असून अर्जदार क.३ ते ७ ह्या मुली असून अर्जदार क. ८ ते ९ हे नातू आहे. अर्जदारां व्यतिरिक्त मयत गजराबाई केशव पल्हाळ यांना इतर कुणीही कायदेशीर वारस नाही. मयत नामे गजराबाई केशव पल्हाळ यांच्या वारस प्रमाणपशची अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व महसुल कामासाठी आवश्यकता आहे. अर्जदार क.१ व ९ हेच त्यांचे एकमेव वारसदार आहे. त्यामुळे मा. न्यायालयात सदरचे प्रकरण दाखल करण्याचे कारण घडले आहे.

ज्याअर्थी अर्जदार हे मयत नामे गजराबाई केशव पल्हाळ यांचे अर्जदार वारस नाही असे समजाविण्याचे असतील व वारस प्रमापतत्र देण्या बाबत आक्षेप, उजर, हरकत असेल तर हे जाहिर प्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत उजर, आक्षेप, हरकत या न्यायालयात लेखी पुराव्यासह हजर होवून सादर कराव्यात. जर मुदतीत आक्षेप, उजर, हरकत न नोंदविल्यास अर्जदारांच्या नावे वारसप्रमाणत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि.२३/१२/२०२४ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिले. पुढील तारीख २१/०१/२०२५

विभागीय लिपिक सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय सिल्लोड

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर सोयगांव यांच्या न्यायालयात जि. औरंगाबाद.**

दिवाणी किरकोळ अर्ज - २६/२०२०

अर्जदार : रविंद्र बळीराम पवार वय ४२, वर्षे धंदा शेती, रा. तिडका ता. सोयगांव जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार - कोणीही नाही.

विषय : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदाराचे वकील ॲड. एम.एन. जाधव यांच्या मार्फत अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र मिळण्यसाठी मा. सोयगांव न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. असे की, अर्जदारचे कंडील नामे बळीराम भिमा पवार, हे मौजे तिडका ता. सोयगांव जि. औरंगाबाद येथील कायमचे रहिवाशी होते. त्याचे दि. १७/०५/२०२० रोजी मौजे तिडका ता. सोयगांव जि. औरंगाबाद येथे निधन झालेले आहे. तसेच मयत बळीराम भिमा पवार यांची पत्नी व अर्जदाराची आई नामे लिलाबाई बळीराम पवार हिचे देखील दि. २२/१२/१९८१ रोजी मौजे तिडका ता. सोयगांव जि. औरंगाबाद येथे निधन झालेले आहे. मयताचे मृत्यु दाखले सदर अर्जासोबत दाखल केले आहे. सबब कै. बळीराम भिमा पवार यांना वर नमुद अर्जदार हा मुलगा एकमेव कायदेशीर वारस असुन बळीराम भिमा पवार यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नाही.

असे असतांना बळीराम भिमा पवार यांचे मृत्यु नंतर कागदोपत्री पुर्ततेसाठी शासकीय रेकॉर्ड साठी तसेच आवश्यकता भासेल त्या त्या ठिकाणी पुर्तता करणेसाठी तसेच मौजे तिडका ता. सोयगांव जि. औरंगाबाद शिवारातील शेतजमीन जिचा गट नं. २८ एकुण क्षेत्र ८ हे ७० आर पो.ख. ०० हे १७ आर आकार रु. २१.६१ पै. यापैकी ५ हे ६० आर आकार रु. १३.९० पै. ह्या मयत बळीराम भिमा पवार यांचे नावावरील मिळकती वारस म्हणुन अर्जदार यांचे नांव लावणेसाठी अर्जदार यांना मयत कै. बळीराम भिमा पवार यांच्या कायदेशीर वारसप्रमाणपत्राची अर्जदारांना आवश्यकता आहे.

अर्जदार यांनी तलाठी मौजे तिडका ता. सोयगांव जि. औरंगाबाद यांचेकडे जाऊन अर्जदार हे मयत कै. बळीराम भिमा पवार यांचे कायदेशीर वारस असल्याने वर नमुद गट. नं. २८ या जमीनीवर अर्जदाराचे नांव लावणेसाठी विनंती केली असता मा. तलाठी यांनी सदर जमीनीवर वारस लावणेसाठी अर्जदार हे के. बळीराम भिमा पवार यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा वारस दाखला सक्षम न्यायालयाकडुन आणने संदर्भात तोंडी सांगितले त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्याचे कारण घडले आहे. मयत कै. बळीराम भिमा पवार यांना अर्जदार हे कायदेशीर वारस नाही. असे कोणास समजवायचे असेल व वारसप्रमाणपत्र देण्याबाबत ज्या कोणास आक्षेप, उजर, हरकती, असेल अश्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासुन ३० दिवासांच्या आत आक्षेप, उजर, हरकती या न्यायालयात हजर होवुन सादर कराव्यात जर मुदतीत कोणी आक्षेप, उजर हरकती, न दिल्यास अर्जदाराच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक ०८/०१/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानीशी दिले.

पुढील तारीख १८/०२/२०२५

स्वाक्षरी

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी कार्यालय क. स्तर सोयगांव

## जाहीर प्रगटन

**माननिय दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर गंगापुर यांच्या न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज कं. २५/२०२५

अर्जदार - १. रामदास म्हसु पठारे, वय संभाजीनगर २. लक्ष्मण म्हसु पठारे, वय ६५ वर्ष, धंदा ६३ वर्ष, धंदा शेती, रा. घोडेगांव, ता. गंगापूर, जि. छत्रपती शेती, रा. घोडेगांव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार - निरंक

विषय - कलम २ बॉम्बे रेगूलेशन कायदयाप्रमाणे वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी ॲड. भगवान एस. शिंदे यांच्या मार्फत या मा. न्यायालयात अर्जदार यांनी वारसाचे प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे, सदरील अर्जात अर्जदार यांनी म्हटले आहे की, असे की, अर्जदार कं. १ व २ हि मयत म्हसु जयाची पठारे यांची मुले आहेत. म्हसु जयाची पठारे हे दिनांक ०२/०७/१९९४ रोजी मौजे टिळकनगर, ता. श्रीरामपुर जि. अहमदनगर येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार यांची आई नामे यशोदाबाई म्हसु पठारे हया दिनांक ०१/०३/२००६ रोजी मौजे टिळकनगर, ता. श्रीरामपुर जि. अहमदनगर येथे मयत झालेल्या आहेत. अर्जदार यांचे आई वडिल हे कामधंदा करण्यासाठी टिळकनगर, ता. श्रीरामपुर जि. अहमदनगर येथे राहत होते व तिकडेच त्यांचा मुत्यु झालेला आहे, परंतु त्यांचे मुळ गांव हे घोडेगांव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर हे आहे. अर्जदार अर्जासोबत मयताचे मुत्युप्रमाणपत्र व अर्जदार यांचे आधार कार्ड जोडत आहे. असे की, अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय योजनाचा लाभ घेण्यासाठी ते मयत म्हसु जयाची पठारे यांचे कायदेशीर वारसदार आहेत असे वारसाचे प्रमाणपत्राची अवश्यकता असल्यामुळे, त्याकामी त्यांनी मा. न्यायालयातुन कायदेशीर वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांना ते मयताचे कायदेशीर वारसदार आसल्याचे प्रमाणपत्र देण्यास ज्या कोणाचा उजर व आक्षेप आसेल अशानी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत त्यांचा उजर व आक्षेप या न्यायालयात नोंदवावा. मुदतीमध्ये कोणाचा उजर व आक्षेप न आल्यास अर्जदार यांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल, मुदतीनतंर आलेला उजर व आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. पुढील तारीख २५/०२/२०२५.

आज दिनांक ०७/०१/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

लिपिक सहायक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क-स्तर गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा.व्ही.डी. पाटील साहेब या. साहेब मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय कन्नड**

ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

पु.तो. १६/१/२०२५

कि.दि.अर्ज क्र. ३७२/२०२४

अर्जदार - १) प्रभावती भ्र. लक्ष्मणराव खंचाट, वय ६६ वर्षे धंदा गृहिणी रा. प्राध्यापक कॉलनी कन्नड ता. कन्नड ह.मु. प्रगती कॉलनी गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) अजित लक्ष्मणराव खंवाट. वय ४३ वर्षे, धंदा नौकरी, रा. प्राध्यापक कॉलनी कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर ३) सुजित लक्ष्मणराव खंवाट, वय ४२ वर्षे, धंदा मजुरी, रा. प्राध्यापक कॉलनी कन्नड ता. कन्नड ह.मु. मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण - हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त वि कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एम.व्ही. कसाने यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की अर्जदार क्र.२ व ३ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ असुन अर्जदार क्र.१ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील नामे लक्ष्मणराव तुळशिराम खंबाट हे कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होते, ते दिनांक ०३/०२/२०१३ रोजी मौजे कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. येणे प्रमाणे मयत लक्ष्मणराव तुळशिराम खंबाट यांना अर्जदार क्र.१ ते ३ असे कायदेशीर वारसदार असल्याचे नमुद करुन मयताचे मृत्यु पश्चात शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची मागणी करुन त्यासाठी या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्तीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील, करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ७/१/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापूर जि.छ. संभाजीनगर**

छे २८/०१/२५

सिव्हील एम.ए.नं.५६६/२०२४

अर्जदार : १. नितीन पदमाकर नवले वय.२३ वर्ष धंदा. शेती रा. अकोली वाडगांव ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर २. सुनंदा रविंद्र पहाड, वय.२७ वर्ष धंदा. शेती रा. खोजेवाडी ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ३. शितल शरद मारकळ, वय. २५ वर्ष धंदा. शेती रा. बगडी ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर

-: विरूद्ध :-

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : कलम ३७२ भारतीय वारसा कायद्यानुसार उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदार क. १ ते ४ यांनी त्यांचे वकील ॲड. डि.ई. पानकडे यांचे मार्फत उत्तराधिकारी असल्याबाबतचे प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणे कामी अर्ज सादर केला आहे. अर्जदार नं. १ ते ३ यांची आई नामे चंद्रकला पदमाकर नवले हे दि. ०२/०४/२०२४ रोजी मौजे अकोली वाडगांव ता. गंगापूर येथे मयत झाले आहे. तसेच अर्जदार यांचे वडिल नामे पदमाकर विश्वनाथ नवले हे देखील त्याअगोदरच दि. २०/१२/२००८ रोजी मयत झाले असल्याने अर्जदार हे मयत चंद्रकला पदमाकर नवले यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत त्यांच्या व्यतिरीक्त दुसरे कोणीही वारस नाही.

असे की, मयत चंद्रकला पदमाकर नवले यांचे इंडिया पोस्ट पेमेन्ट्स बँक शाखा अकोली वाडगांव (IFSC CODE-IPOS0000001) येथे खाते नं. ०३१६१००९६०३४ असलेल्या खात्यात रक्कम रूपये ३९,८२७.५५/- आहे. अर्जदार हे मयत चंद्रकला पदमाकर नवले यांचे कायदेशीर वारस असल्याने सदर रक्कम ही अर्जदार यांना मिळण्याकामी इंडिया पोस्ट पेमेन्ट्स बैंक शाखा अकोली वाडगांव यांनी अर्जदार यांना मा. न्यायालयाच्या उत्तराधिकारी असल्याचे प्रमाणपत्राची (Succession Certificate) याची मागणी केलेली आहे. करीता अर्जदारांना मयत चंद्रकला पदमाकर नवले यांच्या (Succession Certificate) उत्तराधिकारी असल्याचे प्रमाणपत्राची कार्यालयीन कामासाठी आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, मयत चंद्रकला पदमाकर नवले हे दिनांक ०२/०४/२०२४ रोजी मौजे अकोली वाडगांव ता. गंगापूर येथे मयत झाल्या आहे व त्यांचे अर्जदार हे एकमेव कायदेशिर वारस आहेत अर्जदारांना त्यांचे (Succession Certificate) उत्तराधिकारी प्रमाणपत्र देण्यास कोणास काही एक हक्क संबंध व उजर आक्षेप असल्यास त्यांनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे ३० दिवसाचे आत लेखी उजर, आक्षेप या न्यायालयात सादर करावा. नसता अर्जदार नं. १ ते ३ हे मयत चंद्रकला पदमाकर नवले यांचे वारस असल्याचे उत्तराधिकारी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल व मुदती नंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपिक सहायक अधिकक्षक

दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क. २०/२०२५

अर्जदार : १) अजित पिता पोपटराव पाटील वय ४५ वर्षे धंदा शेती रा. नूतन कॉलनी, गंगापूर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) रचना भ्र. चक्रधर खोतकर वय ४८ वर्षे, धंदा घरकाम रा. जालना जि. जालना ३) पूनम भ्र. निलेश चव्हाण वय ४१ वर्ष धंदा घरकाम रा. रजनीगंधा, डइड मार्ग, ठाणे ४) कमलबाई भ्र. पोपटराव पाटील वय ५९ वर्षे, धंदा घरकाम रा. नूतन कॉलनी, गंगापुर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

अर्जदार क्र.१, २ व ३ हे आपसात सख्खे भाऊ बहिण असून अर्जदार क्र. ४ हि अर्जदार क्रं. ची आई आहे वरील सर्व नमुद ठिकाणचे रहिवाशी आहेत. अर्जदार क्र. ४ चे पती व अर्जदार क्र. १ ते ३ चे वडील नामे पोपटराव दशरथराव पाटील हे गंगापूर ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक २३/०८/२०२० रोजी मौजे गंगापूर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे कोरोना काळात मयत झाले आहे. आता मयत पोपटराव दशरथराव पाटील यांना अर्जदार क्र. १ ते ४ हेच कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयत पोपटराव दशरथराव पाटील यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. अर्जदार क्र. १ ते ४ यांना शासकीय-निमशासकीय व इतर कार्यालयीन कामाकरीता मयत पोपटराव दशरथराव पाटील यांचे वारस प्रमाणपत्राची (हेअरशिप सर्टिफिकीट) ची आवश्यक असल्याने अर्जदार क्र. १ ते ४ यांनी प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला आहे. अर्जदार क्र. १ ते ४ यांनी वारस प्रमाणपत्र मिळणे करीता इतर कोणत्याही मा. न्यायालयात अर्ज सादर केलेला नाही. करीता अर्जदार यांचा अर्ज मंजुर करण्यात येऊन अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत पोपटराव दशरथराव पाटील यांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र (हेअरशिप सर्टिफिकीट) जारी करण्यात यावे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदाराचा अर्जास व त्यातील मागणीस कोणाचा काही आक्षेप उजर असेल तर संबन्धीतानी त्यांचा असलेला आक्षेप उजर या न्यायालयात व्यक्तिश अथवा विधीज्ञ मार्फत हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा मुदतीनंतर आलेला आक्षेप उजर गृहीत धरला जाणार नाही. व हे न्यायालय अर्जदाराच्या हक्कात मागणी प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील.

करिता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्याने आज दिनांक ०६/०१/२०२५ रोजी दिले.

लिपिक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर. गंगापूर

## सिद्धेश्वर अर्बन को ऑप. बँक मर्यादित सिल्लोड, फुलंब्री शाखेचा स्थलांतर सोहळा उत्साहात संपन्न



सिल्लोड प्रतिनिधी - सहकार महर्षी कै. माणिकराव दादा पालोदकर यांनी स्थापन केलेल्या बँकेला २७ वर्षे पूर्ण होत आहे. आपल्या सेवेत बँकेच्या दहा शाखा कार्यान्वित असून त्यापैकी फुलंब्री शाखेचा नवीन वास्तूत स्थलांतर सोहळा उद्घाटन प्रसंगी बँकेचे अध्यक्ष प्रभाकर पालोदकर उपाध्यक्ष विनोद मंडलेचा, व संचालक मकरंद कोरडे, उत्तम रणदिवे, खुशालराव पवार, अशोक पांढरे, सुरेश अपार, संजय जाधव, अमोल कळम, कुशीवर्ताताई कौतिकराव बडक, तसेच प्रमुख पाहुणे नामदेवराव कोलते, प्रल्हादराव डकले, गंगाधर सोनवणे, अजगर पटेल, मुमताज पटेल, उत्तम तावडे, गंगाधर जाधव, भगवान निराशे, तसेच व्यापारी वर्ग, बँकेचे खातेदार, बँकेचे मुख्य कार्यकरी अधिकारी बी.बी. साळवे व कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते.

## शरद औरंगे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक सेवा पुरस्कार प्राप्त



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.८ जानेवारी : जालना येथील शंभर शिक्षक क्लब ऑफ जालना याच्या तर्फ सोयगाव तालुक्यातील गलवाडा (अ) येथील रहिवाशी व शारदा भवन एज्युकेशन सोसायटी इंदिरा गांधी हायस्कूल सिडको,नादेड येथे सहशिक्षक म्हणून कार्यरत असलेले शरद नंदराम औरगे यानी केलेल्या कार्याचा गौरव म्हणून राज्यस्तरीय आदर्श शिक्षक सेवा गौरव पुरस्कार देऊन गौरव सुनिलभाई रायठठ्ठा ज्येष्ट समाजसेवक,राजेभाऊ मगर,आर.आर.जोशी याच्या हस्ते ट्रॉफी,प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या निवडीबद्दल शरद औरंगे याचे लक्ष्मीबाई औरंगे,काजेल औरंगे,नंदराम औरंगे,धनराज औरंगे,भरत औरंगे,विष्णू औरंगे,अक्षय औरंगे,भावडू घुले, विजय औरंगे,अनिल औरंगे,सोमनाथ काटकर,संतोष नामदे, योगेश बोखारे,एस.व्ही. देशमख,विजय जावळे,योगेश काळे यानी अभिनंदन केले.

## पोलीस रेझिंग डे स्पर्धेत जिल्हा परिषद प्रशाला सोयगावचे चमकले तीन विद्यार्थी



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.८ जानेवारी

पोलीस अधीक्षक कार्यालय,सायबर पोलीस स्टेशन छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण)अंतर्गत पोलीस स्टेशन सोयगाव यांच्या वतीने रेझिग डे उपक्रमातर्गत सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल, पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर,पोलीस उपनिरीक्षक गणेश झलवार,पोलीस उपनिरीक्षक रज्जाक शेख,याच्या तर्फे सोयगाव शहरातील जिल्हा परिषद प्रशाला सोयगाव येथे दि.६ जानेवारी सोमवार रोजी विद्यार्थ्यासाठी परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते.या परीक्षेत जवळपास १५० विद्यार्थी,विद्यार्थीनीनी सहभाग नोंदविला होता.या विद्यार्थ्या मधुन प्रथम क्रमांक सार्थक राजू औरंगे,द्वितीय कुमारी रुख्मिणी अशोक कोकाटे तर तृतीय क्रमांक कशिष रविंद्र इंगळे याचा क्रमांक आला.या विद्यार्थ्याचा सिल्लोड पोलीस उपविभागीय कार्यालय येथे उपविभागिय अधिकारी दिनेशकुमार कोल्हे तसेच पोलीस निरीक्षक शेषराव उदार याच्या शुभहस्ते ट्रॉफी,प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.निवडी बद्दल विद्यार्थ्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल,पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर,पोलीस शिपाई राजू बरडे,सादिक तडवी,रविंद्र तायडे,अजय कोळी,गजानन दांडगे याच्यासह शाळेचे मुख्याध्यापक दादाराव राठोड, सुकदेव पाटील,अनिल ठाकुर,वैजनाथ साळवे,सुनिल शेठे,दौलतसिंग परदेशी, बागुल सर,पंकज रगडे अनेक मान्यवरानी अभिनंदन केले.

## मोतीराम अग्रवाल जालना मर्चटस् बँकेची छ.संभाजीनगर येथे ११ व्या शाखेचा उद्घाटन सोहळा संपन्न



छत्रपती संभाजीनगर -

मोतीराम अग्रवाल जालना मर्चंटस् को-ऑप बँकेच्या छ.संभाजीनगर येथे ११ व्या शाखेचा उद्घाटन सोहळा दि.०७ जानेवारी २०२५ मंगळवार रोजी संपन्न झाला. यावेळी श्री सत्यनारायण महापुजा आयोजित करण्यात आली. यावेळी बँकेचे अध्यक्ष सी.ए.श्री गोपालजी अग्रवाल यांनी उपस्थित मान्यवर सभासद, ग्राहकांचे स्वागत- सत्कार केले. यावेळी शाखा इमारत मालक श्री मंगलसिंग राजपुत यांनी मा.अध्यक्ष सीए श्री गोपालजी अग्रवाल, उपाध्यक्ष श्री अनिलजी सोनी,श्री अंकुशजी राऊत, ॲड.श्री प्रविणजी लाहोटी, सीए श्री सागरजी कावना यांचा पुष्पहार देवुन सत्कार केला. यावेळी बँकेचे अध्यक्ष यांनी बँक देत असलेल्या सुविधां बाबत माहिती दिली.

जालना शहरातील नामांकित मोतीराम अग्रवाल जालना मर्चंटस् बँकेने सर्व सुविधेसह शाखा सुरु केली असुन सर्वांनी आपले खाते उघडुन सर्व सेवांचा लाभ घ्यावा असे आवाहन मा.अध्यक्ष यांनी केली.

या शुभारंभ सोहळ्यामध्ये बँकेचे अध्यक्ष सी.ए.श्री गोपालजी अग्रवाल, उपाध्यक्ष श्री अनिलजी सोनी, संचालक श्री अंकुशजी राऊत, ॲड.श्री प्रविणजी लाहोटी, सीए श्री सागरजी कावना, श्री विजयजी दाड, सभासद श्री विनोदजी अग्रवाल (दुर्गा प्लायवुड), श्री शांतीलालजी लुणीया, श्री योगीराजजी शेवगंन (डि.वाय.एसपी.), श्री अमरसिंगजी सत्याल, श्री बुढाणीजी, श्री विनोदजी अग्रवाल (रत्नादिप), श्री नविनजी अग्रवाल (दुल्हा-दुल्हन), श्री प्रमोदजी खरात, श्री प्रतिकजी मार्केटिंग, लक्की डुम्बडा, श्री कपिल गुप्ता (नारायण एंटरप्रायजेस), सारस्वत बँकचे सिडको शाखा व्यवस्थापक श्री अनिरूध्दजी कुलकर्णी डिपुटी मॅनेजर, सौ.मंजुषा कोराळे व बँकेचे महाव्यवस्थापक श्री राजेंद्र टोकशा शाखा व्यवस्थापक श्री सचिन पटेकर, श्री नारायण लखोटीया, श्री विक्रम बजाज व शाखा कर्मचारी उपस्थित होते.

# राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते राष्ट्रीय सौर दिनदर्शिकेचे प्रकाशन



**छत्रपती संभाजीनगर : शहरात आज राष्ट्रीय सौर दिनदर्शिकाचे प्रकाशन हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय दिनदर्शिका प्रसार मंचचे अध्यक्ष नारायणराव पांडव ,सचिव राहुल औसकर, कोषाध्यक्षा योगिता मराठे ,प्रसिद्ध उद्योजक विवेक देशपांडे ,राम भोगले ,सविता कुलकर्णी, गुरुप्रसाद मराठे आदी उपस्थित होते.**



**मागील ४० वर्षापासून आमदार ,मंत्री ,विधानसभेचे सभापती ते राज्यपाल पर्यंतच्या प्रवासात देशपांडे व रुद्रानी परिवारासोबत कायम राहिलेले राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचा देशपांडे /रुद्रानी परिवारातर्फे सत्कार करण्यात आला.**

छत्रपती संभाजीनगर - राष्ट्रीय सौर दिनदर्शिका शके १९४६ -१९४७ चे प्रकाशन राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय दिनदर्शिका प्रसार मंचचे अध्यक्ष नारायणराव पांडव ,सचिव राहुल औसकर, कोषाध्यक्षा योगिता मराठे ,प्रसिद्ध उद्योजक विवेक देशपांडे ,राम भोगले ,सविता कुलकर्णी, गुरुप्रसाद मराठे आदी उपस्थित होते.

प्रारंभी दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. राष्ट्रीय सौर दिनदर्शिका प्रसार मंच चे अध्यक्ष नारायणराव पांडव यांनी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचा पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला.

राष्ट्रीय सौर दिनदर्शिका चे प्रकाशन झाले असल्याचे घोषित करून राष्ट्रीय दिनदर्शिके विषयी बोलताना आपल्या देशात कायदा पास करण्यापासून ते प्रत्येक सरकारी कामकाज हे भारतीय तिथी, वार ,नक्षत्र ,टाकूनच केले जाते. इंग्रजी दिनदर्शिका आंगओळणी पडली असून याच दिग्दर्शिकेचा सराव झाल्या कारणाने आपण इंग्रजी दिनदर्शिका आत्मसात केली. मात्र भारतीय दिनदर्शिका ही समजून घेणे आणि येणाऱ्या पिढीला समजावून सांगणे तितकेच गरजेचे आहे. प्रथम भारतीय दिनदर्शिका समजून घ्यायची असेल तर शिक्षण पद्धती बदलण्याची गरज असून लहान वयापासूनच दिनदर्शिका अंगओळणी पाडावी लागणार असल्याचे राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे म्हणाले. शिक्षण पद्धती विषयी बोलताना राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी शिक्षण नीती २०२० नुसार शिक्षण पद्धतीमध्ये बदल करण्याचे काम चालू असून ४०० कुलगुरू व १ हजार शिक्षण तज्ञ शिक्षण नीती तयार करत असल्याचे सांगितले.

यावेळी उल्हास गवळी, उमेश दासरती, ऋषी बागवान, श्रीकांत जोशी, दातार साहेब, प्रसाद कुलकर्णी ,अवतारसिंह सोदी रवी वैद्य यांच्यासह राष्ट्रीय दिनदर्शिका प्रसार मंचचे कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन पी.यु. कुलकर्णी यांनी केले तर प्रसार मंचाच्या कोषाध्यक्षा योगिता मराठे यांनी आभार प्रदर्शन केले.

### अभय मराठे व सरोज देशपांडे यांना श्रद्धांजली

**दहा वर्षापूर्वी अभय मराठे यांनी राष्ट्रीय दिनदर्शिका प्रसार मंच छत्रपती संभाजीनगरची स्थापना केली प्रसारमंचच्या पहिल्या राष्ट्रीय अध्यक्षा म्हणून सरोज विवेक देशपांडे यांनी ४ ते ५ वर्षे उत्कृष्ट काम करत दिनदर्शिका प्रसार मंचचे कार्य नावारुपास आणले. अभय मराठे व राष्ट्रीय अध्यक्षा सरोज विवेक देशपांडे यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना यावेळी श्रद्धांजली वाहण्यात आली.**

# न.प समोरील जलकुंभाची घरघर कायम

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०८ :- जुने पैठण भागात वर्षानुवर्षे पाण्याच्या समस्येतून केलेले आंदोलन, आंदोलनाला यश म्हणून दिरंगाई ने जलकुंभाचे झालेले बांधकाम आणि आता महाकाय पाण्याची टाकी बांधून ही त्यात पाण्याची घरघर असल्याने येथील रहिवाशी पुन्हा आंदोलनाच्या तयारीत असल्याचे दिसून येत आहे.

नागरिकांनी आंदोलन केल्यानंतर जुन्या पैठण मधील पडलेल्या जुन्या तहसील कार्यालयाच्या जागेत पैठण-आपेगाव विकास निधीतून जवळपास ८लाख लिटरची पिण्याच्या पाण्याची टाकी उभारणीसाठी स्थानिक जीवन प्राधिकरणाने ४ ते ५ वर्षानंतर सुरुवात केली. टाकीच्या बांधकामासाठी गुत्तेदारांनी कधी काम बंद तर कधी सुरू अशी भुमिका घेतली त्यामुळे चिडलेल्या कार्यकर्त्यांना वेळोवेळी आंदोलने करावी लागली.



पुरातत्व विभागाने टाकी बांधकामाबाबत काही प्रश्न उपस्थित केल्यानंतर माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे व विद्यमान खासदार संदिपान भुमरे यांनी हा प्रश्न सोडविण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले. शेवटी रडत पडत सन २०२४ च्या अखेरच्या सत्रात टाकीचे बांधकाम पूर्ण झाले खरे पण जीवन प्राधिकरण व नगर परिषद पैठण यांच्यात समन्वय नसल्यामुळे टाकी हस्तांतर बाब लांबणीवर पडत चालली असल्यामुळे नागरीकांत संताप व्यक्त केला जात आहे.

गेल्या अनेक वर्षात पैठणकरांना कधीच नियमित वेळेवर पाणी मिळत नाही. दररोज अवेळीच नळाद्वारे पाणी मिळते. रात्री उशिरा कधीही पाणी येते त्यामुळे नळ धारकांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. मुख्याधिकारी संतोष आगळे हे खोटी नाटी उत्तरे देऊन वेळ मारून नेतात. असा अनुभव जनतेला आला आहे.पैठण पासून हाकेच्या अंतरावर असलेल्या नाथसागर तुडुंब भरलेला असतांना टाकी भरुन जनतेला पाणी पुरवठा होणे आवश्यक असतांना तसे दिसून येत नसल्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांना भेटुन टाकी प्रकरणाची कथा सांगण्यासाठी पाणी पुरवठा कृती समितीचे एक शिष्टमंडळ भेट घेणार आहे.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जांभळी येथे आनंदनगरी उत्सवात संपन्न

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ८ जानेवारी पैठण तालुक्यातील जांभळी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दि ८ जानेवारी रोजी आनंदनगरी व पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी आनंदनगरीमध्ये विविध प्रकारचे खाद्यपदार्थ, फळे, भाजीपाला,



व खेळण्याच्या विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या, तसेच विद्यार्थ्यांना व्यवसाय विषयी मार्गदर्शन मिळावे तसेच व्यावसायिक शिक्षण मिळावे या मागील हेतू होता, या कार्यक्रम प्रसंगी शाळेतील सर्व विद्यार्थी पालक वर्ग व गावकरी यांनी सहभाग घेतला, यावेळी अहेमद चॉद शेख, शालेय समिती अध्यक्ष जव्हार चॉद शेख, जब्बार पटेल,तसेच ग्रामपंचायत सर्व सदस्य, शाळेचे मुख्यध्यापक अरुण धोकटे सर, शाळेतील सर्व शिक्षक यांची उपस्थिती होती.

# पोलीस रेझिंग डे निमित्त सायबर सुरक्षा जनजागृती अनुषंगाने शालेय विद्यार्थ्यांची परीक्षा त्यांना विद्यार्थ्यांना पारितोषिक वाटप

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ८ जानेवारी : पोलीस रेझिंग डे निमत्ताने ग्रामीण पोलीस अधीक्षक छत्रपती संभाजीनगर ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली सायबर सुरक्षा जनजागृती अनुषंगाने पोलीस ठाणे बिडकीन हद्दीतील शाळा सरस्वती भवन महविद्यालय.व उच्च माध्यमकि शाळेतील इयता ७ वी ८ वी ९ वी १० वी तील वद्यार्थी यांची सायबर सायबर जनजागृती विषयावर परिक्षा घेण्यात आली



त्यात एकुण १२०० विदयार्थी यांनी या परिक्षा सहभाग नोंदवला होता या परीक्षेत प्रथम क्रमांक १) युवराज गणेसशिंग चव्हाण व्दित्तीय क्रमांक २)प्रणव रमेश मुंगसे तृतीय क्रमांक ३)सुजीत भाऊसाहेब निळ तर लक्ष्मीबाई प्राथमिक.व उच्च माध्यमिक विद्यालय निलजगाव येथे ८वी ९ वी व १०वी तील एकुण १५७ विद्यार्थीची परिक्षा घेण्यात आली होती या परीक्षेत प्रथक क्रमांक १)कु. तनुजा तुकाराम गाडेकर व्दित्तीय क्रमांक २)कु. आयशा शगीर शेख तृत्तीय क्रमांक ३)कु.गायत्री गणेश गाडेकर यांनी पटकावला आहे. या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक व प्रमाणपत्र बिडकीन पोलीस ठाण्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके, पोलीस उपनिरीक्षक मंजीलसिंग सेना, पोलीस कर्मचारी पवन चव्हाण यांच्या हस्ते वाटप करण्यात आले आहे

# दोन दिवसीय महानुभाव कार्यशाळेचे आयोजन

### वर्तमान आणि भविष्यातील धोरणावर मंथन

छ. संभाजीनगर- ग्लोबल महानुभाव संघाचे वतीने महानुभाव पंथाच्या वासनिक, पुजारी, उपदेशी, आश्रमातील मुले आणि मुली यांच्यासाठी दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे दिनांक ११ व १२ जानेवारी रोजी होणाऱ्या या कार्यशाळेत महानुभाव पंथाचे दृष्टीने आवश्यक व महत्त्वपूर्ण बाबींवर चर्चा, मंथन होणार आहे अशी माहिती सुदर्शन कपाटे महानुभवा यांनी दिली. छ. संभाजीनगर येथील श्रीकृष्ण मंदिर महानुभाव आश्रम येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.



महानुभाव पंथामाध्येही विविध विचारधारा आहेत. काहीवेळा या विचारधारा मध्ये विसंवाद होतो आणि : संघर्षाची परिस्थती निर्माण होते. सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींनी महानुभाव पंथीयांमध्ये एकमुखता असावी असा संदेश दिला आहे. त्यांच्या याच सिद्धांतावर सर्व साधकांना एकत्रित करण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. महानुभाव पंथाच्या दृष्टीने काही महत्त्वपूर्ण विषयावर ठराव पारित होणार आहेत.


दोन दिवसात एकूण ६ सत्र संपन्न होणार आहेत. ज्यात नित्य पठणा पासून ते सर्व पंथीय साधकांनी कशा प्रकारे आदर्श व्यवहार करावा, पंथाच्या प्रसार आणि प्रचारासाठी कसे काम करावे, आपापसातील समन्वय कसा राखावा यासाठी मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

सरकार स्थापनेतही महानुभव पंथाचा मोठा सहभाग आहे. सरकारकडून पंथाच्या काय अपेक्षा आहेत यावरही कार्यशाळेत मंथन होणार आहे. कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी पूर्वनोंदणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी महानुभाव आश्रम, पैठणरोड, छ. संभाजीनगर येथे संपर्क साधावा असे आवाहन ग्लोबल महानुभाव पंथाच्यावतीने करण्यात आले आहे. कार्यशाळेत सहभागी होणाऱ्याची व्यवस्था श्रीकृष्ण ✻ मंदिर महानुभाव आश्रम पैठण रोड छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आली आहे. महानुभाव पंथाच्या राजकीय, साहित्य, संघटन, धर्मप्रशिक्षण, अश्या अनेक गोष्टींवर विस्तृत चर्चा संपन्न होणार असून जास्तीत जास्त संख्येने यात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

## संघ हीच जीवनगाथा

अलक (८)

### सीमोल्लंघन



दसऱ्याचा दिवस होता. सीमोल्लंघनाची मिरवणूक, नंतर रावण वध म्हणजे लोकांची गर्दी स्वदेशीचा प्रचार करण्यास योग्य संधी आहे. असा विचार करून केशव व त्याचे दोन मित्र भगोरे व डबीर यांनी वंदे मातरम हे गीत गायले व त्यानंतर केशवने खरे रावण मारणे म्हणजे काय यावर अत्यंत जहाल असे भाषण केले. नेहमीप्रमाणे दसऱ्याच्या दिवशी मिरवणुकीने गावाबाहेर जाऊन रावणाचा फटाके उडवून वध करणे; या लोकांच्या बोथट वृत्तींना आज केशवने खरेच सीमोल्लंघन घडवले होते. पण केशवची ही देशभक्ती लक्षात आल्यावर सरकारी गुप्तचरांचा ससेमिरा चालू राहिला तो कायमचाच. वंदेमातरम् चा उद्-घोष करणाऱ्यांना दंडही ठोठावत असत. (क्रमशः)

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## बंजारा ब्रिगेडच्या युवा जिल्हाध्यक्ष ग्रामीणपदी विकास राठोड यांची नियुक्ती



बिडकीन दि ८ : जानेवारी बंजारा ब्रिगेड राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत राठोड,प्रदेश अध्यक्ष राहूल राठोड यांच्या आदेशानुसार जिल्हाध्यक्ष संतोष राठोड यांनी विकास राठोड बुकबॉण्ड तांडा (गेवराई), ता. जि. छत्रपती संभाजी नगर यांची बंजारा ब्रिगेडच्या सामाजिक संघटनेच्या युवा जिल्हाध्यक्ष ग्रामीण पदी नियुक्ती पत्र देऊन नियुक्ती करण्यात आली. विकास राठोड यांचे शैक्षणिक, सांस्कृतिक सामाजिक, राजकीय व संघटन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य पाहता बंजारा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत राठोड व प्रदेश अध्यक्ष राहूल राठोड यांच्या सहमतीने संघटना बांधणीसाठी वरिष्ठ पदाधिकारी यांच्या सोबत समन्वय ठेवून संघटनेची पुढील ध्येयधोरणे राबवावीत तसेच बंजारा समाजाला मान, सन्मान, न्याय, हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी कार्य करावे. समाजहित, जनहित, राष्ट्रहित जोपासून संघटनेचे संवर्धन करावे आणि संघटना वाढीसाठी प्रयत्न करण्यासाठी बाबाशेठ, गोकुळ चव्हाण, संदिप जाधव, छोटू जाधव यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## माधव लव्हाळे यांचे निधन



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.८ जानेवारी - सोयगाव तालुक्यातील जरंडी येथील माधव रामचंद्र लव्हाळे(वय.९०) यांचे मंगळवारी(दि.७)सकाळी आठ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले त्यांचे वर मंगळवारी दुपारी तीन वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, तीन मुली,सुना नातवंडे असा परिवार आहे माधव लव्हाळे हे सेवानिवृत्त सार्वजनिक बांधकाम विभागाचे रस्ता कारकून होते तर माजी ग्रामपंचायत सदस्य नारायण लव्हाळे यांचे वडील होते.


## अहिल्यानगर महानगरपालिका,अहिल्यानगर

**साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२४-२५**

**फेर ई निविदा सूचना क्र. २२१/२०२४-२५**

**साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२४-२५ अंतर्गत ०१ कामाची निविदा सूचना क्रमांक २२१ / सन २०२४-२५ ई टेंडर पद्धतीने ऑनलाईन मागविण्यासाठी शासनाच्या http://mahaetenders.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तरी याची संबंधितांनी नोंद घ्यावी.**

**(मा. उपायुक्त यांचे मान्यतेने)**

**शहर अभियंता**
**अहिल्यानगर महानगरपालिका**


**जा.क्र.२०२४/विधी/ज.मू. आदेश/ प्र.क्र.४५८५/कावि-५१९४ उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, सिल्लोड दिनांक :-२६.१२.२०२४.**

### जाहीर प्रगटन

अर्जदार : फरहत बानो बिस्मिल्ला पठाण, वय-४० वर्ष व्यवसाय- घरकाम, रा. बोरगाव सारवाणी ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार :- ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय बोरगांव सारवाणी.ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर,

विषय :- जन्म - मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी फरहत बानो बिस्मिल्ला पठाण, रा. बोरगाव सारवाणी ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांचा दिनांक ०३.१२ १९८४ रोजी मौजे बोरगाव सारवाणी येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की फरहत बानो बिस्मिल्ला पठाण, यांचा दिनांक ०३.१२.१९८४ रोजी मौजे बोरगाव सारवाणी येथे जन्म झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर / आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर / आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर /आक्षेप/ हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

**जा.क्र.२०२४/विधी/ज.म. आदेश/ प्र.क्र.४५७३/कावि-५१८२ उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, सिल्लोड दिनांक :-२६.१२.२०२४.**

### जाहीर प्रगटन

अर्जदार :- अभिषेक रविंद्र बिरारे, वय-१३ वर्ष व्यवसाय- शिक्षण, अ.पा.क. आई नामे - - लताबाई रविंद्र बिरारे, वय- ३४ वर्ष, व्यवसाय -मजुरी रा. खंडाळा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार :- ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय खंडाळा. ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय -:- जन्म - मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज त्यांचा मुलगा नामे अभिषेक रविंद्र बिरारे यांचा दिनांक ०७.०९.२०११ रोजी मौजे खंडाळा येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-

२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे. करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सूचित करण्यात येते की अभिषेक रविंद्र बिरारे याचा दिनांक ०७.०९.२०११ रोजी मौजे खंडाळा येथे जन्म झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर /आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर /आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर /आक्षेप/ हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

## अग्रलेख...

# भारताशी वैर : ट्रुडोंची गच्छंती

भारताविरुद्ध कारवाया करणाऱ्या खलिस्तान्यांना राजाश्रय देण्याचे पाप करणाऱ्या कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांना अखेर पायउतार व्हावे लागले. भारताविरोधात घेतलेल्या भूमिकेचा फटका त्यांना बसला आहे. खलिस्तानी दहशतवाद्यांची पाठराखण करताना सातत्याने भारताच्या विरोधात भूमिका घेणाऱ्या ट्रुडो यांना त्यांच्याच लिबरल पक्षातून तीव्र विरोध झाला. या विरोधामुळे शेवटी त्यांना राजीनामा द्यावा लागला. हरदीप निज्जरच्या हत्येप्रकरणी ट्रुडो यांच्या नेतृत्वातील ट्रुडो सरकारने भारताला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले होते. भारताने कॅनडा सरकारचा आरोप फेटाळूनही लावला होता. हा मुद्दा त्यावेळी एवढा तापला होता की, दोन्ही देशांनी आपापल्या राजनयिकांना माघारी बोलावले होते. तेव्हापासून दोन्ही देशांमधील परस्पर संबंध ताणलेले होते आणि आजही तसेच आहेत. ट्रुडो पायउतार झाल्यानंतर संबंधांमध्ये सुधारणा होईल, अशी अपेक्षा करायला हरकत नाही. ट्रुडो यांच्याशी माझे थेट संबंध आहेत आणि भारताच्या विरोधातील माहिती मी त्यांना दिली, असा दावा खलिस्तानी दहशतवाद्यांचा नेता गुरपतवंत सिंह याने केला होता. या गुरपतवंतने ट्रुडो यांना जणू कह्यात घेतले होते असे वाटावे एवढे ट्रुडो भारताविरोधात बोलायला लागले होते. कॅनडाचे सरकार खलिस्तानी दहशतवाद्यांना पाठिंबा देते आहे असा आरोप भारतानेही केला होता. गुरपतवंतच्या दाव्याने त्याला एकप्रकारे पुष्टी मिळाली होती. ट्रुडो यांनी खलिस्तान्यांना पाठिंबा देताना भारताशी संबंध बिघडतील याची कधी पर्वा केली नाही. त्यांच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात त्यांनी राबविलेली धोरणे आणि घेतलेली भारतविरोधी भूमिका यामुळे सत्ताधारी लिबरल पक्षातच असंतोष निर्माण झाला होता. असंतोष हळूहळू वाढत गेला आणि त्याचा उद्रेक होताच त्यांना राजीनामा द्यावा लागला. नव्या पंतप्रधानाची निवड होईपर्यंत ट्रुडो आता फक्त काळजीवाहू पंतप्रधान असतील. जस्टिन ट्रुडो यांनी राजीनामा देण्यामागे वेगवेगळी कारणे असल्याचे बोलले जातेय. जस्टिन ट्रुडो यांच्यावर दबाव होता. यात डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून सातत्याने केले जाणारे ट्रोलिंग तसेच स्वकीयांकडूनच बंडखोरीची भीती अशी अनेक कारणे आहेत. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक जिंकल्यापासून डोनाल्ड ट्रम्प हे जस्टिन ट्रुडो यांना सतत ट्रोल करत होते. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक जिंकताच ट्रम्प यांनी ट्रुडोंना अमेरिकेच्या ५१ व्या राज्याचे गव्हर्नर म्हटले होते. ट्रम्प यांच्या विधानाचा अर्थ स्पष्ट होता, ते कॅनडाला अमेरिकेचे ५१ वे राज्य मानतात. इतकेच नाही, ट्रुडो अमेरिकेत ट्रम्प यांना भेटायला गेले, त्यावेळी त्यांच्यासोबतचा फोटो शेअर करताना ट्रम्प यांनी ट्रुडोंना 'अमेरिकी राज्य कॅनडाचे गव्हर्नर', असे म्हटले होते. ट्रम्प यांच्या या विधानामुळे कॅनडामध्ये ट्रुडो यांची खिल्ली उडवली जात होती. त्याशिवाय ट्रम्प यांनी कॅनडावर २५ टक्के टॅरिफ आकारण्याची धमकी दिली होती. जस्टिन ट्रुडो यांच्या धोरणांमुळे त्यांच्या पक्षाच्या नेत्यांवरच बंडखोरीची वेळ आली होती. २०२४ च्या अखेरीस ट्रुडो यांच्या मंत्रिमंडळात राजीनाम्याची लाटच आली. १९ सप्टेंबर २०२४ ला परिवहन मंत्री पाब्लो रोड्रिग्ज यांनी राजीनामा दिला. २० नोव्हेंबर २०२४ ला अल्बर्टाचे खासदार रँडी बोइसोनॉल्ट यांनी राजीनामा दिला. १५ डिसेंबर २०२४ रोजी गृहनिर्माण मंत्री सीन फ्रेजर यांनी कौटुंबिक कारणांचा हवाला देत कॅबिनेट सोडण्याचा मनसुबा बोलून दाखवला. कहर तर तेव्हा झाला, जेव्हा १६ डिसेंबर २०२४ रोजी क्रिस्टिया फ्रीलँड यांनी उपपंतप्रधानपदाचा आणि अर्थमंत्री पदाचा राजीनामा दिला. मंत्रिमंडळातील सहकारी एकापाठोपाठ एक राजीनामा देत असल्यामुळे जस्टिन ट्रुडो यांच्यावर दबाव वाढला होता. कॅनडामध्ये एका बाजूला महागाई वाढत चालली होती. दुसऱ्या बाजूला बेरोजगारी सुद्धा वाढत होती. ट्रुडो यांच्या लिबरल पार्टी विरोधात कन्झर्व्हेटिव्ह पार्टीने हा मोठा मुद्दा बनवला होता. कॅनडामध्ये कोविडनंतर बेरोजगारीचा दर जवळपास ६.५ टक्क्यांपर्यंत पोहोचला. घरांच्या किमती सातत्याने वाढत आहेत, ज्यामुळे सर्वसामान्य नागरिकांचा जस्टिन ट्रुडो यांच्यावरील रोष वाढत गेला. त्याची परिणती त्यांच्या राजीनाम्यात झाली. मधल्या काळात भारत आणि कॅनडात तणाव निर्माण झाला असताना भारताने आपल्या नागरिकांसाठी एक ॲडव्हायझरी जारी केली होती, हेही आपल्याला स्मरत असेलच. भारत सरकारच्या वतीने असे सांगण्यात आले होते की, परिस्थिती पाहता आम्ही आमच्या नागरिकांना सल्ला देतो की, कॅनडाच्या ज्या भागात भारतविरोधी कारवाया झाल्या आहेत, त्या भागात जाणे टाळावे. भारतीय समुदायाच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी आमचे उच्चायुक्त आणि महावाणिज्य दूतावास कॅनडाच्या अधिकाऱ्यांच्या संपर्कात आहेत. कॅनडामधील ढासळत चाललेली सुरक्षा परिस्थिती पाहता तेथे उपस्थित असलेल्या भारतीय विद्यार्थ्यांना अत्यंत सावध राहण्याचा सल्ला देण्यात आला होता. भारतीय समुदाय आणि विद्यार्थी उच्चायुक्तालय आणि वाणिज्य दूतावासांच्या वेबसाईटवर तक्रारी नोंदवू शकतात, असेही त्यावेळी सांगण्यात आले होते. एकूण काय, तर ट्रुडो यांच्या सरकारने खलिस्तानी दहशतवाद्यांची बाजू घेत भारतीयांच्या हिताकडे दुर्लक्ष केल्याने तणाव आणखी वाढला होता. हा तणाव कमी करण्यासाठी ट्रुडो प्रशासनाने कोणतेही प्रयत्न केले नाहीत. उलट, तणाव कसा वाढेल यादृष्टीनेच त्यांचे धोरण राहिले. त्यामुळे दोन्ही देशांच्या संबंधांमध्ये कटुता आली, ती वाढत गेली. भारत सरकार आपल्या भूमिकेवर ठाम राहिले आणि कॅनडाला वाकवण्याचा यशस्वी प्रयत्नही केला. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी पंतप्रधान मोदींच्या पाठिंब्याने कणखर भूमिका घेतल्याने भारताच्या प्रतिष्ठेतही वाढ झाली. भारताचे परराष्ट्र धोरण किती मजबूत आणि स्पष्ट आहे, हेही यानिमित्ताने अधोरेखित झाले. भारताचा मोस्ट वॉन्टेड खलिस्तानी दहशतवादी हरदीप निज्जर कॅनडात ठार झाला होता. त्याच्या हत्येमध्ये भारताचा सहभाग असल्याचा आरोप कॅनडाने खलिस्तान्यांची बाजू घेताना केला होता. त्यामुळे भारताशी संघर्षाच्या मुद्द्यावरून कॅनडाचे विरोधक पंतप्रधान ट्रुडो यांच्यापासून दूर असल्याचे दिसत होतेच. विरोधी पक्षनेते पीअर पॉलिव्हर सोशल मीडियावर असे म्हणाले होते, आमच्या पंतप्रधानांनी स्पष्ट आणि थेट बोलले पाहिजे. त्यांच्याकडे पुरावे असतील तर त्यांनी ते जनतेसमोर मांडावेत. हे घडल्यावरच कोण बरोबर आणि कोण चूक हे लोक ठरवू शकतील. आश्चर्याची बाब म्हणजे ट्रुडो कोणतेही तथ्य मांडत नव्हते. त्यामुळे विरोधी पक्षांनीसुद्धा ट्रुडो यांच्या भूमिकेचे कधी समर्थन केले नव्हते, ही भारताच्या दृष्टीने जमेची बाजू होती. भारतासोबत तणावाचे वातावरण असताना कॅनडाच्या एका सरकारी अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर न्यू यॉर्क टाईम्सशी बोलताना सांगितले होते की, अनेक देशांच्या मदतीने हरदीप निज्जरच्या हत्येची माहिती गोळा करण्यात आली आहे. चौकशी पूर्ण झाल्यानंतर याबाबतची संपूर्ण माहिती दिली जाईल. आम्ही तुम्हाला सांगू इच्छितो की, कॅनडा हा 'फाईव्ह आइज' नावाच्या इंटेलिजन्सस अलायन्सचा एक भाग आहे. कॅनडाशिवाय यात अमेरिका, ब्रिटन आणि ऑस्ट्रेलियाचा समावेश आहे. कॅनडाच्या अधिकाऱ्याच्या या कथनाचा अर्थ काय? कॅनेडियन प्रशासनाला घटनाक्रमाची संपूर्ण माहिती होती. असे असतानाही कॅनेडियन प्रशासनाने खलिस्तान्यांच्या दबावाखाली भारतावर आरोप केला. पुरावे असल्याच्या फक्त बाता मारल्या. भारताने मात्र पहिल्या दिवसापासून स्पष्ट भूमिका घेत कॅनडाचे आरोप फेटाळून लावले होते. त्यावेळी परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले होते की, कॅनडाचे सर्व आरोप हास्यास्पद आहेत. असेच आरोप कॅनडाच्या पंतप्रधानांनी आपल्या पंतप्रधान मोदींवर केले होते आणि ते पूर्णपणे फेटाळण्यात आले होते. असे बिनबुडाचे आरोप म्हणजे खलिस्तानी दहशतवादी आणि अतिरेकी यांच्यापासून लक्ष हटवण्याचा प्रयत्न आहे. त्यांना कॅनडात अभय देण्यात आले असून, ते भारताच्या सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडतेला धोका आहे. भारताची ही भूमिका कॅनडाच्या जिव्हारी लागली नसती तरच नवल!

## चिंतन

# नवीन वर्षात अर्थव्यवस्था सुधारणार

**गुरुदत्त दिनकर वाकदेकर**

निश्चितपणे, नवीन वर्ष २०२५ च्या आर्थिक संभाव्यतेवर जागतिक आर्थिक आणि वित्तीय संस्थांनी प्रकाशित केलेल्या विविध अहवालांनुसार, २०२५ हे वर्ष भारतासाठी उज्ज्वल आर्थिक संभावनांचे वर्ष असेल. नवीन वर्षात, भारतीय अर्थव्यवस्था गतवर्षी २०२४ पासून आलेल्या आर्थिक आव्हानांना तोंड देत यशस्वीपणे पुढे जाईल आणि जगातील सर्वांत वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून लक्ष वेधून घेईल. गेले वर्ष २०२४ पासून नवीन वर्ष २०२५ मध्ये आपल्याला मिळणारा आर्थिक वारसा पाहिला तर आपल्या लक्षात येते की, या वारशात अनेक आव्हाने असली, तरी विकासासाठी अनेक मजबूत आर्थिक पायादेखील आहेत. गेल्या वर्षी ८ टक्के विकास दराने सुरुवात झाली असली, तरी गेल्या वर्षी जुलै ते सप्टेंबर या तिमाहीत केवळ ५.४ टक्के विकास दर राहिल्याने अनेक आर्थिक गणिते चुकली. गेल्या वर्षभरात भारताच्या आर्थिक परिस्थितीवर महागाई आणि रोजगार हे चिंतेचे प्रमुख मुद्दे राहिले आहेत.

महागाईच्या आघाडीवरील अडचणी जवळपास बहुतेक महिने कायम होत्या. विशेषतः नोव्हेंबर २०२४ नंतर, पुन्हा एकदा घाऊक आणि किरकोळ महागाई वाढू लागली आणि महागाई रिझर्व्ह बँकेने निर्धारित केलेल्या मर्यादेबाहेर राहिली. गेल्या वर्षभरात शहरी बेरोजगारी कमी झाली असली, तरी असंघटित क्षेत्रातील रोजगाराच्या संधी कमी झाल्या आहेत. परकीय व्यापार तूटही वाढली. वर्षभर रुपयाची घसरण सुरूच होती. वर्षभर डॉलरच्या तुलनेत रुपयाचे मूल्य कमी होत राहिले आणि डिसेंबर २०२४ मध्ये डॉलरच्या तुलनेत रुपया ८५ च्या खाली आला. २०२४ मध्ये देशाच्या परकीय चलनाचा साठा कधी कमी होत होता तर कधी वाढत होता. परकीय चलनाचा साठा सुमारे ६५२ अब्ज डॉलरच्या पातळीवर घसरला आहे. निश्चितपणे, नवीन वर्ष २०२५ लादेखील मागील वर्षाच्या तुलनेत आर्थिक विकासाचा भक्कम पाया मिळाला आहे. अर्थतज्ज्ञ व्यवसाय आणि आर्थिक वाढीबद्दल एकमताने आशावादी आहेत आणि देशाचा मजबूत ताळेबंद मांडत आहेत तसेच विकासाभिमुख संकेत देत आहेत. त्यामुळे कृषी, खाणकाम, बांधकाम आणि औद्योगिक उत्पादनाला अधिक गती मिळेल, असे बोलले जात आहे. नवीन द्विपक्षीय व्यापार वाटाघाटी आणि नवीन मुक्त व्यापार करार (एफटीए) आकार घेताना दिसतील.

विशेषतः सिमेंट, वीज, हॉटेल, वाहतूक, ऑटो मोबाईल, फार्मा, केमिकल, फूड प्रोसेसिंग, टेक्सटाईल, ई-कॉमर्स, बँकिंग, मार्केटिंग, डेटा ॲनालिसिस, सायबर सिक्युरिटी, आयटी, पर्यटन, किरकोळ व्यापार या क्षेत्रांमध्ये वेगाने वाढ होईल. त्यामुळे रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी वाढताना दिसतील. नवीन वर्ष २०२५ मध्ये निफ्टी नवीन उंची गाठताना दिसेल. यासोबतच सोन्या-चांदीच्या दरातही नवी वाढ पाहायला मिळणार आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की, नवीन वर्ष २०२५ मध्ये स्थानिक आणि देशांतर्गत बाजाराची ताकद अर्थव्यवस्थेसाठी फायदेशीर ठरेल. स्वावलंबनाचे धोरण आणि स्थानिकांसाठी व्होकल हा मंत्र घेऊन गेल्या १० वर्षांत देशाने ज्या वेगाने प्रगती केली आहे, त्याचा नवीन वर्षात अधिक फायदा होणार आहे. डेलॉईट इंडियाचा इंडियाज होम ॲण्ड हाऊसहोल्ड मार्केट रिपोर्ट सांगतो की, भारताचा स्थानिक बाजार १० टक्क्यांहून अधिक चक्रवाढ वार्षिक वाढ दराने (सीएजीआर) वाढेल आणि या वेगाने भारताचा स्थानिक बाजार २०३० पर्यंत सुमारे २३७ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचू शकेल.

नवीन वर्षात देशाच्या कानाकोपऱ्यात 'मेक इन इंडिया' मोहिमेची ताकद वाढणार हे नक्की. भारत जगातील तिसरे सर्वांत जास्त मागणी असलेले उत्पादन गंतव्य म्हणून उदयास येईल. चीनमधून आयात होणारी औषधे, रसायने आणि इतर कच्च्या मालाला पर्याय निर्माण करण्यासाठी देशात लागू केलेल्या उत्पादन लिंक्ड इन्सेंटिव्ह (पीएलआई) योजनेचे अधिक चांगले परिणाम दिसून येतील. नवीन वर्ष २०२५ मध्ये कृषी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, यात शंका नाही. देशातील शेतीचा दर्जा सुधारणे, शेतीतील नावीन्यपूर्ण उपक्रमांना प्रोत्साहन देणे, खर्च कमी करणे आणि उत्पादनासोबतच शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे ही अभूतपूर्व मोहीम पुढे सरकताना दिसेल. सरकारला गेल्या वर्षीपासून मिळालेल्या चांगल्या मान्सूनमुळे नवीन वर्षात ग्रामीण अर्थव्यवस्था झपाट्याने वाढेल आणि ग्रामीण भागातील खपही वाढेल, यात शंका नाही. देशातील कृषी क्षेत्राची झपाट्याने प्रगती होईल. उल्लेखनीय बाब ही आहे की, पीक वर्ष २०२३-२४ मध्ये अन्नधान्य उत्पादन ३२.२२ कोटी टनांच्या विक्रमी पातळीवर पोहोचले आहे. २०२३-२४ मध्ये गहू आणि तांदळाचे अधिक उत्पादन झाले आहे. गव्हाचे विक्रमी उत्पादन ११३२.९२ लाख टन आणि तांदळाचे उत्पादन १३७८.२५ लाख टनांवर पोहोचले. सरकारच्या नवीन कृषी विकास धोरणामुळे नवीन वर्षात अन्नधान्य उत्पादन विक्रमी पातळीवर पोहोचेल, असा अंदाज आहे. नवीन वर्ष २०२५ मध्ये भारतातील कर संकलनात मोठी वाढ होणार असल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. उद्योग आणि व्यवसायात सुधारणा झाल्याने वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) संकलन वाढेल. चालू आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये, एप्रिल ते नोव्हेंबर २०२४ दरम्यान जीएसटी संकलन गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत ९ टक्क्यांनी वाढून १४.५६ लाख कोटी रुपये झाले आहे. त्याचप्रमाणे चालू आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये मागील वर्षाच्या तुलनेत जास्त आयकर परतावा आणि अधिक प्राप्तिकर संकलनाची परिस्थिती दिसून येत आहे. चालू आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी ७.२८ आयकर रिटर्न भरले गेले. वेगाने वाढणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेतील वाढती उद्योग उलाढाल, सेवा क्षेत्र, शेअर बाजार आणि मध्यमवर्गाची क्रयशक्तीची नवी उंची यामुळे नवीन वर्षात देशातील कर संकलनात मोठी वाढ होईल, यात शंका नाही. यामुळे पायाभूत सुविधा, सामाजिक सेवा आणि जीवनमान सुधारण्याची सरकारची क्षमता वाढेल. सरकारच्या हातात कर महसूल वाढल्याने अर्थव्यवस्थेचे नूतनीकरण होण्यास मदत होईल.

नवीन वर्षात निर्यात आणि परकीय गुंतवणुकीत वाढ होण्याची शक्यताही महत्त्वाची आहे. सरकारच्या आर्थिक नियंत्रण धोरणांमुळे भारत नवीन वर्ष २०२५ मध्ये वित्तीय तूट नियंत्रित करण्यात यशस्वी होताना दिसेल. ट्रम्प जानेवारी २०२५ मध्ये अमेरिकेचे अध्यक्ष झाल्यानंतर चीनवर मोठ्या प्रमाणात व्यापारी निर्बंध लादण्याची शक्यता वाढेल. त्यामुळे भारत हा नवा जागतिक पुरवठादार देश बनण्याची शक्यता वाढेल. नवीन वर्षात भारतीय शेअर बाजाराचा मार्ग कठीण होणार नाही, शेअर बाजाराला सर्वोच्च उंचीवर नेण्यात देशांतर्गत निधी महत्त्वाची भूमिका बजावेल आणि कॉर्पोरेट कमाईला चालना मिळेल. आर्थिक सुधारणा, कृषी सुधारणा, मेक इन इंडिया, निर्यात वाढविणे आणि ग्रामीण भागातील उत्पन्न वाढविणे या दिशेने सरकारच्या धोरणात्मक प्रयत्नांमुळे देशाची अर्थव्यवस्था मजबूत होईल. नवीन वर्षात भारताचा विकास दर ७ टक्क्यांच्या पातळीवर असेल आणि सध्या जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असलेला भारत नव्या वर्षात जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होण्याच्या मार्गावर वेगाने वाटचाल करेल आणि तितक्याच वेगाने आर्थिक विकासासोबत देशाचा विकास होईल तसेच देशभरातल्या सर्वसामान्यांच्या चेहऱ्यावरही आर्थिक हास्यही पसरलेलं दिसेल.

९९८७७४६७७६

## वेध

# आजन्म बंदी; पण मानसिकतेचे काय?

**विजय निचकवडे**

आम्ही प्रत्येक गोष्टीचा अतिरेक करीत सुटलो आहोत. आपल्या अतिरेकी वर्तणुकीचा काय परिणाम होऊ शकतो? याचा विचार करण्याची शक्तीही गमावून बसलो आहोत. अशाच अतिरेकी पर्यटनाचा अनुभव ३१ डिसेंबरच्या निमित्ताने आला आणि पर्यटकांवर पर्यटनाला आजन्म बंदीसारखी कारवाई पुढे आली. कदाचित हे एका अर्थाने योग्यही आहे. स्वतःच्या आनंदासाठी प्राण्यांना वेठीस धरून आसुरी आनंदाचा अनुभव घेणे म्हणजे पर्यटन असेल तर मग मात्र अशा पर्यटनाला चाप बसलाच पाहिजे. पण यासोबतच अगतिक मानसिकता बदलणेही तेवढेच महत्त्वाचे ठरेल.

जंगलात जातो, म्हणजे आम्ही फक्त व्याघ्रदर्शन करण्यासाठी! वाघ दिसला तर आमची पर्यटनवारी सफल झाल्याचा आनंद आमच्या चेहऱ्यावर दिसतो. याला काही अपवादही असतात, जे निसर्गाच्या सान्निध्यात निवांत वेळ घालून खऱ्या अर्थाने पर्यटन जगतात. पण सध्या पर्यटनाच्या नावाखाली घातला जाणारा गोंधळ नक्कीच चिंतेचा विषय! आज व्याघ्र संवर्धनासाठी नाना तऱ्हेचे उपक्रम शासन स्तरावर राबविले जात आहेत. तरीही यंत्रणांच्या डोळ्यात धूळ झोकून वाघांची शिकार केली जातच आहे. दोन दिवसांपूर्वी भंडारा जिल्ह्यातील तुमसर तालुक्यात घनदाट जंगलात चार तुकड्यांमध्ये आढळून आलेला मादी वाघाचा मृतदेह प्रचंड क्लेशदायी असाच आहे. ही घटना पाहून खरंच, लोकांना कशाचेच भय राहिले नाही, याची खात्री पटते. कधी कधी यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी यांच्याविषयीसुद्धा आपसूकच शंकेची पाल मनात चुकचुकून जाते.

वाघांचे हल्ले, त्याचे मानवी वस्तीत येणे याचा कायमच गवगवा आम्ही करतो. मग वाघाच्या घरात म्हणजेच जंगलात जाऊन त्याला वेठीस धरीत पर्यटनाचा आनंद घेण्याच्या प्रकारावर कधीच वन्यप्रेमी का विचार करीत नाही. अशा पर्यटकांविषयी वन्यजीवांसाठी झटणाऱ्या संस्थाही उदासीन दिसतात. ३१ डिसेंबर रोजी उमरेड कऱ्हांडला व्याघ्र प्रकल्पात पर्यटनाच्या निमित्ताने पुढे आलेला प्रकार अत्यंत कीव यावा, असा आहे.

एक वाघीण आपल्या शावकांसह जात असताना पर्यटकांच्या गाड्यांपुढे आल्यानंतर तिला मार्ग मोकळा करून देणे हा धर्म असताना चारही बाजूने तिला घेऊन छायाचित्र, चित्रफीत काढण्याच्या मोहात 'त्या' पाचही जणांचा जीव धोक्यात टाकणे कितपत सयुक्तिक होते. वाघांचाच नव्हे, तर पर्यटकांच्या घेऱ्यात वाघ बिथरून एखाद्या पर्यटकावर हल्ला झाला असता तर? पर्यटकांना वाघ दिसल्याने ते भान विसरले असतील; मात्र वन विभागाचे प्रतिनिधी असलेल्या जिप्सीचालक आणि गाईड यांचे काय? त्यांना नियमांचे भान नसावे, याचे नवल वाटते. आज कारवाई झाली. जिप्सीमध्ये जे पर्यटक होते, त्यांच्यावर उमरेड-कऱ्हांडला अभयारण्यात पर्यटनाला आजन्म बंदी घालण्यात आली. नक्कीच ही कारवाई योग्य असेल. पण कारवाई करून ही मानसिकता बदलणार आहे का, हा प्रश्न आहे. त्यासाठी कारवाईपेक्षा स्वतःच्या कर्तव्याची जाणीव होणे अधिक गरजेचे आहे. हा प्रकार आजचा नाही. यापूर्वीही अनेकदा असे उतावीळ पर्यटक लोकांपुढे आले आहेत. आम्ही जंगलात जातो, म्हणजे जणू काही प्राण्यांवर उपकार करतो, अशीच भावना त्यांची असावी. पण आम्ही त्यांच्याच अधिवासात जाऊन त्यांना वेठीस धरतो, हे न बदलणारे सत्य आहे. नक्कीच पर्यटनाने अर्थचक्र गतिमान राहण्यास मदत होते, पण ते करताना आपण काय करतो? याची जाणीव प्रत्येकाने ठेवायला हवी. पर्यटक म्हणून नियमांचे पालन करण्याची जबाबदारी येणाऱ्या प्रत्येकाची आहे. मग अशावेळी पर्यटक जबाबदारी विसरत असतील, तर जाणीव करून देण्याचे काम गाईडचे नक्कीच आहे. पण तोच जर त्यांच्या सुरात सूर मिसळत असेल तर मात्र पालथ्या घड्यावर पाणीच म्हणावे लागेल. आज जिप्सीचालक, गाईड आणि पर्यटकांवर कारवाई झाली. जिप्सीचालक, गाईड यांच्या रोजीरोटीचा विषय तीन महिन्यांसाठी गोठविला गेला. पण पर्यटक तर दुसरीकडे जाऊन पुन्हा आणखी कुठल्या वाघाला वेठीस धरून आनंद घेऊ शकतील ना? अशावेळी पर्यटक कोण? यापेक्षा त्याची मानसिकता कशी बदलेल, याचा प्रयत्न होणे गरजेचे आहे. यासाठी ज्यांच्या भरवशावर जंगलात सोडले जाते, त्या गाईडला सर्वार्थाने प्रशिक्षित करून त्याचे कर्तव्य आणि नियमांचे जाणीव करून देण्याची गरज आहे. ज्यावेळी पर्यटकांचा अतिउत्साह आपल्यासाठीही अडचणीचा ठरू शकतो, हे माहिती असेल, तेव्हा कदाचित अशा पद्धतीने कुठल्या वाघाच्या परिवाराला वेठीस धरण्याची आणि नियम मोडण्याची हिंमत कुणाची होणार नाही. नाहीतर आज एका व्याघ्र प्रकल्पात आजन्म बंदी घातली तरी दुसऱ्या ठिकाणी हे घडणार नाही? याची शाश्वती कोण देणार?

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# कठोपनिषदातील यम आणि नचिकेता संवाद

**प्रा. दिलीप जोशी**

आपल्या भारतीय तत्त्वज्ञानात साधारणतः वेदांच्या एक लाख श्रुती असून त्या १) कर्मकांड २) उपासनाकांड ३) ज्ञानकांड अशा तीन भागांत विभागल्या आहेत. यातील ज्ञानकांड केवळ चार हजार श्रुतींचे असून हे ज्ञानकांड अंतिम असल्यामुळे याला 'वेदांतशास्त्र' म्हटले आहे. वेदांतामध्ये ब्रह्मविद्येचे गुह्यज्ञान आहे. उपनिषद हे वेदांतावरील भाष्य असून त्यात आत्मस्वरूपाचे चिंतन आहे. उपनिषदे अनेक म्हणजे ज्यांची १०८ नावे उपलब्ध आहेत. परंतु श्रीमद्भगवत्पूज्यपाद आद्य शंकराचार्यांनी दशोपनिषदावर भाष्य केले असल्यामुळे दहा उपनिषद प्रमुख मानले जातात. या उपनिषदांनाच आदिशंकराचार्यांनी प्रस्थानत्रयीमध्ये स्थान दिले आहे. इतर उपनिषदांचेही महत्त्व आहेच; त्यांना 'गौण उपनिषद' असे म्हणतात.

दशोपनिषदात १) ईशोपनिषद, २) कठोपनिषद, ३) केनोपनिषद, ४) प्रश्नोपनिषद, ५) मुंडकोपनिषद, ६) मांडुक्योपनिषद, ७) ऐतरेयोपनिषद, ८) तैत्तरीयोपनिषद, ९) छांदोग्योपनिषद, १०) बृहदारण्यक उपनिषद. अशी ही १० उपनिषदे असून ते चार वेदांतील वेदांतशास्त्रानुसार आहेत. ज्यामध्ये- १) ऋग्वेदीय श्रुतींपासून ऐतरेय उपनिषद २) यजुर्वेदापासून कठोपनिषद, तैत्तरीय, बृहदारण्यक, ईशावास्य उपनिषद ३) सामवेदातून केन आणि छांदोग्य उपनिषद ४) अथर्वेदापासून प्रश्न, मुंडक आणि मांडुक्य उपनिषद निर्माण झालेत. तसे तर 'उपनिषद' या शब्दाचे अनेक अर्थ विद्वानांनी लावले, पण त्यातल्या त्यात सर्वांत सोपा अर्थ म्हणजे गुरूजवळ बसून संक्रमित केलेला, समजून घेतलेला वेदांचा गूढार्थ होय. उप म्हणजे सान्निध्य आणि नि म्हणजे निश्चित आणि षत् म्हणजे यथार्थ. आचार्यांच्या सान्निध्यात बसून मिळविलेले यथार्थ ज्ञान म्हणजे उपनिषद होय.

कठोपनिषद हा तिसरा उपनिषद आहे. वेदव्यासांच्या चार शिष्यांपैकी ऋषी वैशंपायन होते. या वैशंपायन ऋषींचे शिष्य होते आचार्य कठऋषी. कठोपनिषदाचे कर्तेऋषी आचार्य कठ असल्यामुळे नाव पडले कठोपनिषद. कठोपनिषदाची सुरुवात कथेने झालेली आहे. ब्रह्मविद्या जड वाटू नये, सहज समजावी म्हणून कथा प्रयोजन असते. आपल्या पूर्वजांमध्ये वाजश्रवा नावाचे



ऋषी होते. त्यांच्या पुत्राचे नाव वाजश्रवस ऋषी. या वाजश्रवस ऋषींनी विश्वजित यज्ञ केला. या यज्ञात दानधर्माचे महत्त्व असल्याने त्यांनी गोदान संकल्प केला. गाई दान करताना त्या गाई पीतोदका, जग्धतृणा, दुग्धदोहा आणि नीरिंद्रिया होत्या.

पीतोदका जग्धतृणा, दुग्धदोहा नीरिंद्रियाः ।
अनंदा नाम ते लोकस्तान्स, गच्छति ता ददत् ॥

म्हणजे त्या गाई शेवटचे पाणी आणि गवत खाल्लेल्या, ज्यांनी दूध देणे बंद केले, ज्या वांझ झालेल्या आहेत. ज्या गाई गलितगात्र, मरणोन्मुख होत्या.

या वाजश्रवस ऋषींना एक पुत्र होता त्याचे नाव नचिकेता होते. हा कुमारावस्थेतील नचिकेता हे सर्व पाहत होता. आपल्या पित्याकडून अशा गाई दिल्या जात असल्याने पुण्यकर्म घडणार नाही म्हणून तो आपल्या पिताश्रीजवळ जाऊन 'मला कोणाला दान देता?' असा प्रश्न पित्याला करू लागला. पित्याने पहिल्यांदा दुर्लक्ष केले, पण हाच प्रश्न त्याने तीन-तीनदा विचारल्यावर रागाने चिडून ते वाजश्रवस ऋषी आपल्या पुत्राला म्हणजे नचिकेत्याला म्हणाले, ''जा! तुला यमाला दान केले!''

नचिकेत्याने वडिलांची आज्ञा प्रमाण मानून यमाकडे जाण्याची परवानगी मागितली. तेव्हा 'मी रागाच्या भरात बोललो' असे वडिलांनी प्रतिपादन केले. नचिकेता आणि पिता वाजश्रवस यांचा शास्त्रोक्त संवाद झाल्यावर त्यानंतर अंतिमतः वडिलांची आज्ञा घेऊन नचिकेता यमाच्या द्वारावर येतात. यावेळी यम बाहेर गेलेले होते. तीन दिवस-रात्र नचिकेता यमसदनी उपवास करून राहिले. यमधर्म परत आल्यावर अतिथी म्हणून यमांनी नचिकेत्याचे पाद्यपूजन, वस्त्रालंकार देऊन अतिथी भोजन केले. 'माझ्यामुळे तुम्हाला तीन दिवस प्रतीक्षा करावी लागली म्हणून मी तुम्हाला तीन वर देतो' असे यमांनी नचिकेत्याला म्हटल्यावर नचिकेत्याने तीन वर मागितले.

शांतसंकल्पः सुमना यथा स्यात वीतमन्यु गौतमो माऽभि मृत्यो ।
त्वत्प्रसृष्टम् माऽभिवदेत्प्रतीत एतत् त्रयाणाम् प्रथमं वरं वृणे ॥

१) माझे वडील माझ्यावर रागावले आहेत, त्यांचा माझ्यावरील राग कमी करून त्यांना शांतसंकल्प करा.

स्वर्गलोका अमृतत्त्वं भजंते एतद् द्वितीयेन वृणे वरेण ॥

२) ज्या तत्त्वाने अमृतत्त्व प्राप्ती होते, ते तत्त्व माझ्यात संक्रमित करा.

येयं प्रेते विचिकित्सा मनुष्ये अस्तीत्येके नायमस्तीति चैके ।
एतद्विद्यामनुशिष्टस्त्वयाऽहं वराणामेष वरस्तृतीयः ॥

३) मला मृत्युरहस्यविषयक ज्ञान द्या.

सूर्यपुत्र यमधर्म आणि नचिकेता यांचा संवाद कठोपनिषदात असून यमाने सुरुवातीला तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर देण्यास असमर्थता दर्शवत दुसरा एखादा वर मागण्याची नचिकेत्याला विनंती केली. यमराजांनी त्याला अनेक प्रलोभनेही दाखविली. इतर काहीही माग, पण मृत्यूविषयक ही ब्रह्मविद्या मागू नको; पण नचिकेता ठाम होता.

जीविष्यामो यावदीशिष्यसि त्वं वरस्तु मे वरणीयः स एव ॥

'मला मी मागितलेलाच वर दे' यावर तो अडीग राहिला. त्यामुळे यमाने नचिकेत्याला जी ब्रह्मविद्या सांगितली ती कठोपनिषदात आहे.

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### दादागिरीविरहित राजकारण हे आता स्वप्नवतच

नुकतेच 'वाचक पत्रे' या सदरात राम राजे यांचे या विषयावरील पत्र वाचनात आले. मला देखील याविषयी काही विचार मांडावेसे वाटतात. आजकाल राजकारणात दादागिरीचे स्वरूप दिसून येते. ते थेट शारीरिक दादागिरीपासून ते सूक्ष्म राजकीय खेळाडूंपर्यंत पसरलेले असते.

शारीरिक दादागिरी : ही दादागिरी प्रत्यक्ष शारीरिक हिंसाचाराद्वारे केली जाते. निवडणुकांमध्ये विरोधकांना धमकावणे, मतदानाच्या वेळी गोंधळ घालणे, याचे उदाहरण म्हणून दिले जाऊ शकते.

आर्थिक दादागिरी : पैशाच्या जोरावर लोकांना प्रभावित करणे, भ्रष्टाचार करणे, या प्रकारची दादागिरीही राजकारणात दिसून येते.

राजकीय दादागिरी : सत्तेचा गैरवापर करून विरोधकांवर दडपण आणणे, कायदे बदलून स्वतःला फायदा करून घेणे, ही राजकीय दादागिरीची उदाहरणे आहेत.

सामाजिक दादागिरी : समाजात विभाजन निर्माण करून, जाती-धर्म-प्रांत यांच्या नावावर राजकारण करणे, ही सामाजिक दादागिरीचे उदाहरण आहे.

माहितीच्या दादागिरी : खोट्या बातम्या पसरवून समाजात भ्रम निर्माण करून, राजकीय प्रतिस्पर्ध्यांना बदनाम करणे, हे माहितीच्या दादागिरीचे उदाहरण आहे.

दादागिरीची कारणे : सत्ता मिळवण्यासाठी आणि टिकवून ठेवण्यासाठी काही नेते कोणतेही मार्ग अवलंबतात. काही नेते केवळ स्वतःच्या स्वार्थासाठी दादागिरी करतात. लोकांच्या अज्ञानाचा फायदा उठवून काही नेते दादागिरी करतात. राजकीय प्रणालीतील दोषांचा फायदा उठवून काही नेते दादागिरी करतात.

दादागिरीमुळे लोकशाही कमजोर होते. विकासावर परिणाम होतो. समाजात असंतोष निर्माण होतो. गुन्हेगारी वाढते.

दादागिरी रोखण्यासाठी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे. कायदे कठोरपणे लागू करणे. राजकीय प्रणालीत सुधारणा करणे. मीडियाने आपली जबाबदारी पार पाडावी. चुकीच्या बातम्या देऊन नुसता आपला टी. आर. पी. वाढविण्याचा प्रयत्न न करणे. नागरिकांनी सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे.

**अनंत ताम्हणे**/९४२२६१४७६२

### कुंभमेळ्याचे महत्त्व

यावर्षी १३ जानेवारीपासून प्रयागराज येथे कुंभमेळा सुरू होत आहे. कुंभमेळा हा जगातील सर्वांत मोठा सांस्कृतिक आणि धार्मिक मेळा आहे. या काळात भारतातील हिंदू धर्मीय आस्तिक लोक, साधक, भक्त, साधू- संत एकत्र येऊन कुंभ पर्वात पवित्र नदीत स्नान करतात. यावेळी संतांची प्रवचने ऐकणे, ध्यानधारणा, साधना याद्वारे आपले जीवन आध्यात्मिकदृष्ट्या सुंदर होण्यासाठी प्रयत्न केले जातात. कुंभमेळ्यात येणाऱ्या श्रद्धाळूची अशी आस्था आहे की, यावेळी पवित्र नदीत डुबकी मारून स्नान केले की आपले पापक्षालन होते म्हणजेच पापापासून मुक्ती मिळते. तसेच जन्म- मृत्यूच्या फेऱ्यातून मुक्ती मिळते. या आशेनेच जगभरातील हिंदू श्रद्धाळू पवित्र स्नानासाठी प्रयागराज, हरिद्वार, उज्जैन, नाशिक येथे पोहोचतात. काहींना प्रश्न पडतो की केवळ याच नदीच्या किनारी कुंभमेळा का भरतो? कुंभ याचा अर्थ कलश. हिंदू धर्माच्या मान्यतेनुसार कुंभमेळ्याचा इतिहास जवळपास ८५० वर्ष जुना आहे. पौराणिक ग्रंथानुसार जेव्हा देव आणि असुर यांनी अमृत प्राप्त करण्यासाठी समुद्रमंथन केले. तेव्हा त्यातून मूल्यवान असा अमृत कलश निघाला. तो अमृत कलश घेण्यासाठी देव आणि असुरांमध्ये युद्ध झाले. असुरांपासून अमृत वाचवण्यासाठी विष्णूने तो अमृत कलश आपले वाहन गरुड याला दिला. असुरांनी गरुडाकडून तो कलश हिसकावून घ्यायचा प्रयत्न केला, तेव्हा त्यातील काही थेंब प्रयागराज, हरिद्वार, उज्जैन आणि नाशिक येथील नदीत पडले. तेव्हापासून दर बारा वर्षांनी या पवित्र नदीकाठी कुंभमेळा भरतो. यावेळी २०२५ मध्ये प्रयागराज येथे महाकुंभमेळा आहे. कुंभातील पहिले पवित्र शाही स्नान १३ जानेवारी पौष पौर्णिमेला सुरू होईल .१४ जानेवारीला मकर संक्रांतीला शाही स्नान, २९ जानेवारीला मौनी अमावास्या स्नान, २ फेब्रुवारीला वसंत पंचमी शाही स्नान होईल. या काळात ४ फेब्रुवारीला रथसप्तमी, १२ फेब्रुवारीला माघ पौर्णिमा आणि २६ फेब्रुवारीला महाशिवरात्र. म्हणजेच हा कुंभमेळा पूर्ण ४५ दिवस चालेल.

**पल्लवी देशपांडे**/दुर्ग, छत्तीसगढ

### परदेशच का?

देशभक्तीच्या गोष्टी करणारे नेते चिंतन (?) करायचे असेल तर परदेशात जात असतात. उपचार करायचा असेल तर परदेशात जात असतात. फिरायचे असेल तर परदेशात जात असतात आणि भारतात परतल्यावर मात्र देशभक्तीच्या बाता मारत असतात. हत्तीचे खायचे दात वेगळे असतात आणि दाखवायचे वेगळे. तसेच हे असते. या नेत्यांचे आत एक असते आणि बाहेर एक. स्वदेशीची चळवळ ज्या देशात झाली, परकीय वस्तूंची होळी ज्या देशात झाली त्याच देशातले हे बाबुआयटम नेते परदेशाचे उंबरठे झिजवीत असतात.

**आशिष देव**/चंद्रपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### निखिलच्या प्रयोगाची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड

**परभणी,/प्रतिनिधी :** बाल विद्यामंदिर हायस्कूलच्या निखिल लताड या विद्यार्थ्याच्या प्रयोगाची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे.

विद्या नगरातील प्रभावती विद्यालयात तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात बाल विद्यामंदिर हायस्कूल वैभव नगर विभागातील निखिल मंगेश लताड (वर्ग आठवा) या विद्यार्थ्याने 'फायर आणि गॅस लिक अलार्म' हा प्रयोग सादर केला होता. वर्ग सहावी ते आठवीच्या गटातून या प्रयोगाला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले असून या प्रयोगाची परभणी जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे. या प्रयोगासाठी निखिलला प्रशालेचे विज्ञान शिक्षक बाळाभाऊ दंडवते, राम पतंगे, सचिन वानरे यांचे मार्गदर्शन लाभले.

दरम्यान, ११ व १२ जानेवारी या कालावधीत गंगाखेड रस्त्याावरील राजे संभाजी कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित परभणी जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात हा प्रयोग सादर होणार आहे. त्याबद्दल बाल विद्यामंदिर हायस्कूलचे मुख्याध्यापक अरुण बोराडे यांनी निखिल लताडचे पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन अभिनंदन केले. व त्याला जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी शुभेच्छा दिल्या.

### १ एप्रिलपासून टोलनाक्यावर टॅगव्दारेच पथकर

**परभणी,/प्रतिनिधी :** राज्यातील पथकर वसुली नाक्यांवर १ एप्रिल २०२५ पासून सर्व वाहनांचा पथकर फास्ट-टॅगद्वारेच भरावा लागणार आहे. या त्रिणयानुसार सद्याच्या सार्वजनिक खाजगी सहभाग धोरण २०१४ मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

फास्ट टॅग च्या माध्यमातून पथकर वसुली झाल्यास पथकर वसुलीत अधिक सूसुत्रता, पारदर्शकता येणार आहे. पथकर नाक्यांवर वाहनांचा खोळंबा कमी होणार आहे. यातून वेळेची, इंधनाची बचत होणार आहे. फास्ट-टॅग शिवाय अन्य कोणत्याही माध्यमातून पथकर भरायचा झाल्यास किंवा फास्ट - टॅग सुरु नसेल किंवा टॅगशिवाय वाहनाने फास्ट-टॅगच्या मार्गिकेत प्रवेश केल्यास दुप्पट पथकर भरावा लागणार आहे.
राज्यात सद्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या १३ आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या ९ रस्ते प्रकल्पांवर पथकर वसुली सुरु आहे. या ठिकाणी तसेच भविष्यात पथकर वसुल करावा लागणाऱ्या प्रकल्पांसाठी हा निर्णय लागू राहणार आहे.

### व्याधीपासून बचावासाठी लसीकरण उत्तम पर्याय- राज्यस्तरीय कार्यशाळेत उमटला सूर

**परभणी,/प्रतिनिधी :** निरनिराळ्या व्याधी पासून बचाव करण्यासाठी लसीकरण करणे हा उत्तम पर्याय आहे, असा सूर परभणी मेडिकल कॉलेज येथे 'तरुणांचे लसीकरण काळाची गरज व बदलते स्वरूप' या विषयावर राज्यस्तरीय कार्यशाळेत उमटला.

वैद्यकीय क्षेत्रात दररोज नव्या ज्ञानाची भर पडते त्याचा वैद्यकीय व्यवसाय करताना डॉक्टरांना फायदा होतो त्यासाठी वैद्यकीय निरंतर शिक्षणासारख्या परिषदांना बाहेर ठिकाणी जाऊन तेथे हजेरी लावणे बंधनकारक आहे, परंतु सर्वच परिषदांना हजेरी लावणे डॉक्टरांना शक्य होत नाही यामुळे परभणी वैद्यकीय महाविद्यालयाने नुकतीच प्रौढांचे लसीकरण काळाची गरज व बदलते स्वरूप या विषयावर परभणी मेडिकल कॉलेजमध्ये रविवार ५ जानेवारी रोजी राज्यस्तरीय कार्यशाळा घेतली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. राजगोपाल कालानी व्यासपीठावर महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रमोद शिंदे, वैद्यकीय अधीक्षक डॉ.अमीर तडवी यांची उपस्थिती होती. महाराष्ट्र वैद्यकीय मंडळाकडून डॉ. अभिजीत चित्रकार यांची पर्यवेक्षक म्हणून उपस्थित होती.

या कार्यशाळेसाठी परभणी व राज्यभरातून १८१ डॉक्टरांनी सहभाग नोंदवला. जगभरातील इतर देशांमध्ये नागरिकांप्रमाणे भारतातील नागरिकांना देखील निरनिराळ्या व्याधीना सामोरे जावे लागते. या व्याधींच्या उपचारासाठी वेळ आणि खर्च करावा लागतो. मुळातच या व्याधी उद्भवणे यासाठी लसीकरण उपलब्ध असल्याचे लोकांना बहुतेक वेळी माहित नसते. लहान मुलांच्या निराळ्या व्याधी पासून बचाव करण्यासाठी लस उपलब्ध असते. त्याचप्रमाणे प्रौढांसाठी अनेक व्याधीपासून बचाव करण्यासाठी लस उपलब्ध आहेत, परंतु याबद्दल फारशी माहिती नसल्याने या लसीचा उपयोग केला जात नाही, लसीकरण केवळ लहान मुलांसाठीच असल्याची बहुतांश लोकांना समज आहे. उत्तम आरोग्यासाठी लसीकरण हा एक पर्याय आहे असा सूर यावेळी उमटला.

या कार्यशाळासाठी डॉ. मोमीन काशीफ यांनी प्रवाशांसाठी लसीकरण, डॉ. किरण सगर यांनी प्रौढ विरुद्ध मुलांमध्ये लसींच्या प्रतिसादातील जैविक फरक, डॉ. दमकोंडावार यांनी एचपीव्ही लसीकरण विस्तारित संकेत आणि कर्करोग प्रतिबंध, डॉ. रोहन बेंबडे यांनी अँटी रेबीज लसीकरण, डॉ. कृष्णप्रिया सिकची यांनी आरोग्य कर्मचाऱ्यांचे लसीकरण याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. जयदेव उघडे, गुणवंत आहेरे आदींनी परिश्रम घेतले.

### अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांनी १५ जानेवारीपर्यंत अर्ज करावेत

**परभणी,/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने सन २०२४-२५ मध्ये अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील नोंदणीकृत बचत गटांना ९ ते १८ अश्वशक्तीचे मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने ९० टक्के अनुदानावर वाटप करण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत १५ जानेवारी, २०२५ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन सहायक आयुक्त समाज कल्याण यांनी केले आहे. अर्ज सहायक आयुक्त, समाज कल्याण परभणी या कार्यालयात विनामूल्य उपलब्ध असून अर्ज बचत गटाच्या नावे देण्यात येईल. एका बचत गटास एकच अर्ज मिळेल. त्यासंबंधी बचत गटाने कागदपत्रे सोबत आणावीत. परिपूर्ण भरलेले आवश्यक असलेली कागदपत्रे व डिमांड ड्राफ्टसह अर्ज १५ जानेवारी २०२५पर्यंत शासकीय सुट्टी वगळून कार्यालयीन वेळेत सादर करण्याचे आवाहन केले आहे.


तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

# सहानुभूती नको, आम्हाला हक्क द्या-श्रीगौरी सावंत

## जिंतूर येथील कार्यक्रमाला प्रेक्षकांची अलोट गर्दी

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी-:** समाजाने आम्हाला दूर लोटू नये, ही आमची अपेक्षा असून आम्ही सुद्धा समजाचा एक भाग आहोत ही भावना बाळगा. आम्हाला सहानुभूती नको तर आमचा हक्क हवा आहे, असे प्रतिपादन तृतीयपंथीयांच्या हक्कासाठी लढणाऱ्या श्रीगौरी सावंत यांनी केले त्या तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने मंगळवार दि ७ जानेवारी रोजी दर्पणकार बाळासास्त्री जाभेकर यांच्या जयंती निमित्त आयोजित समाज आणि मातृत्व या कार्यक्रमात बोलत होत्या.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुकुंद सावजी कळमकर प्रमुख पाहुणे म्हणून भावना मुंगसे बोर्डीकर, उप विभागीय पोलीस अधिकारी जीवन बेनिवाल,ब्रिजगोपाल तोष्णीवाल,अँड मनोज सारडा, प्रताप देशमुख, प्रिया देशमुख, सुरेखा टाले, वैभव वट्टमवार, डॉ देवराव कराळे, डॉ रविकिरण



चांडगे,पत्रकार विजय चोरडिया रतदीप कळमकर,किशोर देशपांडे,हरीश मुंदडा,धरमचंद अच्छा,रमेश दरगड,डॉ विवेक थिटे,अँड गोपाळ रोकडे, सखाराम चिद्रवार,अरुण शहाणे, सुधीर शहाणे,देवेंद्र भुरे, सत्यानारायण शर्मा,जसपाल राउरी, पवन



महेरिया,गोविंद थिटे,सुनील तोष्णीवाल आदी मान्यवर उपस्थित होते.पुढे बोलताना श्रीगौरी सावंत म्हणाल्या की तृतीयपंथी नागरिकांच्या पुनर्वसन बाबत राज्य व केंद्र सरकार काहीच करत नाही. राज्य सरकारने सेक्स वर्कर महिलांना आत्मनिर्भर केले पाहिजे. त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणासाठी ठोस पावले उचलायला पाहिजे.मुलं-मुलं असतात ती कुणाचीही असो त्या त्यांचा काय दोष? ज्या महिला एकल पालक आहेत, त्यांच्या विकासासाठी राज्य सरकारने पावले उचलणे गरजेचे आहे. या महिलांना बाळंतपणासाठी नवऱ्याचे नाव नसल्याने अंनत अडचणीचा सामना करावा लागतो. माझ्यासारख्याने किती टाळ्या वाजवायच्या आणि किती याचना करायच्या? पण मी मागे हटणार नाही. घेतलेला वसा मी पूर्ण करणारच. जाता जाता मी काय घेऊन जाणार आहे? आयुष्य ज्याला कळलं आहे, तो मदत करतो. मी एकटी या संस्थेची मालक नाही. दुसरी फळी मी तयार करते आहे. मी नसेल तर अनाथ, तृतीयपंथी मुलं रस्त्यावर पडता कामा नये. एकीकडे तृतीयपंथीयांचे सक्षमीकरणाचे काम सुरू आहे. आता मी झाड लावलं आहे. त्याचा वटवृक्ष व्हायला अजून अवकाश आहे. खरं तर अशा घराची आवश्यकताच नको; पण नाइलाज आहे. मला समाजापासून दूर नाही जायचे. ही सुरुवात आहे. समाजाने सगळ्यांना सामावून घ्यावं हीच इच्छा आहे. कार्यक्रमाचे सूत्र संचालन मो या शेख यांनी तर आभार संघाचे अध्यक्ष शेख शकील यांनी मानले या कार्यक्रमाला हजारोंच्या संख्येने महिला,नागरिक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पत्रकार संघाच्या सर्व पदाधिकारी सदस्यांनी परिश्रम घेतले.

## प्रणिल गिल्डा यांना महेश प्रतिभा गौरव पुरस्कार

**सेलू,/प्रतिनिधी:** सेलू येथील भूमीपुत्र तथा मिरज येथील उपविभागीय पोलीस अधिकारी प्रणिल गिल्डा यांना महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभा यांच्या वतीने सेठ सितारामजी सुखदेवजी बिहाणी (बंगडीवाला) स्मृती प्रित्यार्थ दिला जाणारा महेश प्रतिभा गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. प्रदेशाध्यक्ष मधुसूदन गांधी, प्रदेश मंत्री सत्यानारायण सारडा यांनी पुरस्कार निवडीबाबत पत्राद्वारे कळविले आहे. सार्वजनिक प्रशासन क्षेत्रातील विशेष कामगिरीबद्दल प्रणिल गिल्डा यांना महेश प्रतिभा गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. छत्रपती संभाजीनगर येथील चिकलठाणा एमआयडीसी परिसरातील महेश सांस्कृतिक भवन येथे रविवारी, ११ जानेवारी रोजी सायंकाळी पाच वाजता आयोजित विशेष समारंभात प्रदान करण्यात येणार आहे.



श्री. गिल्डा यांना याआधी माहेश्वरी प्रोफेशन फोरम पुणे यांचा उत्कृष्ट युवा अधिकारी पुरस्कार, गडचिरोली येथे कार्यरत असताना विशेष कामगिरी केल्याबद्दल पोलीस महासंचालक पदक तसेच पोलीस विभागातील विशेष सेवा पदकानेही त्यांचा सन्मान झालेला आहे. पुरस्काराबद्दल श्री गिल्डा यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

### थंडी वाढल्यामुळे जिल्हा पूर्णतः गारठला

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी जिल्हयात गेल्या दोन ते तीन दिवसापासून चांगलीच थंडी पडली आहे. त्यामुळे संपूर्ण जिल्हा हा चांगलाच गारठलेला दिसून येत आहे. त्यातच या वाढत्या थंडीचा लहान मुले, वयोवृध्द नागरिक यांना चांगलाच त्रास होत आहे. दम्याच्या रुग्णांना तर श्वास घेतांना देखील त्रास होत आहे. त्यामुळे असेच वातावरण आणखीन काही दिवस कायम राहणार असल्याचे वनामकृविच्या हवामान खात्याने सांगितले आहे.

## भागवत कथा जीवनात उतरली पाहिजे- पंडित अतुल शास्त्री भगरे

### श्री क्षेत्र धनगर टाकळीत भागवत कथा सप्ताह व यज्ञास जोरदार सुरुवात

**संपत तेली**

**पूर्णा,/प्रतिनिधी :** प्रतिनिधी- जीवनाच्या समस्या दूर करण्यासाठी सर्व प्रथम स्वतः मध्ये बदल घडवून आणला पाहिजे.त्यादृष्टीने भावभक्ती,अहंकारमुक्ती, बासरीस्वरूप मधुरता इत्यादीं वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असणारा श्रीमद् भागवत ग्रंथ मार्गदर्शक होय,असे प्रतिपादन ख्यातनाम भागवतभूषण ज्योतिषाचार्य पंडित अतुल शास्त्री भगरे गुरुजी यांनी आज ७ जानेवारी मंगळवार रोजी श्री क्षेत्र धनगर टाकळी येथे भागवत कथा ज्ञानयज्ञाच्या प्रारंभी केले.

श्री सद्गुरू दाजी महाराज संस्थान, सच्चीदानंद वेद स्वाध्याय प्रतिष्ठान, संतवर्य योगीराज गंगाजीबापू गोसेवा प्रकल्प,श्रीदाजीमहाराज सेवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त सहकार्याने दाजी महाराज यांचा १६५ वा जन्मोत्सव व वैदिक गुरुकुलाचा रौप्य महोत्सव आयोजित करण्यात आला आहे,त्यात आज भागवत कथा ज्ञान यज्ञ सप्ताह सुरू झाला यावेळी श्री भगरे



गुरुजी निरूपण करीत होते. कथेच्या प्रारंभी त्यांनी भागवत कथेचे महत्त्व विषद केले .केवळ कथा ऐकून चालत नाही तर ती कथा जीवनात उतरली पाहिजे.बासरीचे रूपक सार्थकतेने देत उक्ती व कृतीचे ऐक्य होण्याची अपेक्षा व्यक्त केली.

दरम्यान,आज महोत्सवातील पंच कुंडात्मक श्री लक्ष्मी नारायण यज्ञास विधिवत प्रारंभ झाला.वैदिक मंत्रघोषात अग्निमंथन झाले. श्री गणेश यागात यजमान मोठ्या संख्येने सहभागी झाले. याशिवाय सकाळच्या सत्रात लक्षदुर्वाचन सोहळ्यात महिला - पुरुष भाविक सहभागी झाले.

२ जानेवारीपासून सुरू असलेल्या ऋग्वेद संहिता,पद क्रम षडंगसहित पारायण सांगता प्रसंगी सर्व सहभागी वैदिकांचा श्री. भगरे गुरुजी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. घन पारायण कर्ते वेदमूर्ती अभिनव जोशी (हैदराबाद), वेदमूर्ती विद्यासागर देव (वाराणसी), वेदमूर्ती मनोज जोगळेकर(पुणे), वेदमूर्ती विजयेश सहकारी (गोवा), वेदमूर्ती निखिल जोशी(जिंतूर), वल्लभ मुंडले (सिंधूदुर्ग) यांचा विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.यावेळी वैदिक प्रतिनिधी सिध्दांत जोशी व वेदमूर्ती उमेश महाराज यांनी मनोगत व्यक्त केले.

या प्रसंगी यजमान विधीज्ञ प्रमोद कुलकर्णी व सौ.विद्या कुलकर्णी हे दांपत्या यासह संस्थानाधिपती वेदमूर्ती उमेश महाराज टाकळीकर उपस्थित होते.सुत्रसंचालन व प्रास्ताविक वेदमूर्ती अवधूत महाराज टाकळीकर व डॉ.हरिभाऊ पाटील यांनी केले.

## चौथा स्तंभ मजबुतीची सर्वांची जबाबदारी- कुलगूरु डॉ.इन्द्र मणि

**परभणी ,/प्रतिनिधी-** लोकशाही व्यवस्था टिकविण्यासाठी चौथ्या स्तंभाचं योगदान मोठं असल्याचे मत वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगूरु डॉ. इंद्र मणि यांनी व्यक्त केले. पत्रकारिता या लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाच्या मजबुतीसाठी सर्वांनीच प्रयत केले पाहिजेत, अशी अपेक्षाही व्यक्त केली.

येथील शारदा महाविद्यालयातील कै. हेमराजजी जैन सभागृहात जिल्हा पत्रकार संघ आणि शारदा महाविद्यालयाच्या वतीने सोमवारी (दि.०६) दर्पण दिन साजरा करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार, साहित्यीक डॉ. आसाराम लोमटे हे होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून पोलीस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी, ज्येष्ठ पत्रकार विजय जोशी, शारदा महाविद्यालयाचे प्राचार्य बबन पवार, मराठी पत्रकार परिषदेचे सरचिटणीस प्रा. सुरेश नाईकवाडे, सामाजिक कार्यकर्ते डॉ. भारत नांदुरे, पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रभू दिपके, कार्याध्यक्ष लक्ष्मण मानोलीकर आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.

या कार्यक्रमात कै. जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहण्यात आली. तसेच दर्पण दिनानिमित्त ज्येष्ठ पत्रकार विजय जोशी, संतोष धारासूरकर, दिलीप माने, हेमंत कौसडीकर, नितीन धूत, रमाकांत कुलकर्णी, राजा पुजारी, आश्रोबा केदारे, जकीयोद्दीन खतीब यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

या वेळी बोलताना कुलगुरू इंद्रमणी पुढे म्हणाले की, भारतातील लोकशाहीचा पत्रकारिता हा चौथा स्तंभ आहे. तो स्तंभ अत्यांत महत्वाचा असून अन्य तीन स्तंभावर भाष्य करण्याची आणि




त्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करुन देण्याची भूमिका या स्तंभाने पार पाडली आहे. त्यामुळे हा स्तंभ मजबूत कसा होईल? याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे, असे ते म्हणाले.

भारतातील लोकशाही व्यवस्था ही जगातील सर्वोत्कृष्ट शासन व्यवस्था असून जगभरातून आपल्या लोकशाहीचा मोठा आदर केला जातो, असे नमूद करतेवेळी कुलगुरु डॉ. मणि यांनी लोकशाही अधिक बळकट व्हावी, या दृष्टीने पत्रकारितेने जबाबदारीने व सातत्यापूर्वक काम केले आहे. लोकशाहीतील इतर तिन्ही घटकांवर पत्रकारांच लक्ष असल्याने हे घटक व्यवस्थित काम करत आहेत. पत्रकारांनी लोकांच्या कल्याणासाठी लोकशाहीतील इतर तिन्ही स्तंभावर आपली निरिक्षक भूमिका सतत दक्ष राहून पार पाडावी, असे आवाहन त्यांनी या वेळी केले.

यावेळी पोलीस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी यांनी वृत्तपत्रात हे समाजमनाचा आरसा आहेत. सर्वसामान्य जे बोलू शकत नाहीत, लिहू शकत नाहीत ते पत्रकार लिहित असतात आणि म्हणूनच त्यांना समाजाचा आरसा म्हटल्या जातं. वृत्तपत्र वाचतांना सुरुवातीला माझ्या परिसरातील बातम्या पाहतो, त्यानंतर राज्यातील बातम्या पाहत असतो. वृत्तपत्र आणि पत्रकार हे समाजाचे प्रश्न मांडून समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी मोठे कार्य करत असतात. पत्रकारांनी मांडलेल्या प्रश्नावर शासन आणि प्रशानाला देखील विचार करुन जनहिताचे निर्णय घ्यावे लागत असल्याचे अनेक उदाहरणं असल्याचे परदेशी म्हणाले.

यावेळी मार्गदर्शन करतांना ज्येष्ठ पत्रकार विजय जोशी म्हणाले की, पत्रकारिता ही समाजातील रंजल्या गांजल्या आणि शेवटच्या घटकाला न्याय मिळवून देण्यासाठी कार्य करत असते. गेल्या अनेक वर्षात पत्रकारितेत अनेक स्थित्यांतरं झाली. माध्यमांमध्ये बदल झाला असून पत्रकारांचा मुळ हेतू मात्र समाजहिताचा राहीला आहे. त्यामुळे पत्रकारांनी तटस्थपणे पत्रकारिता करावी असे आवाहन त्यांनी केले.

ज्येष्ठ पत्रकार संतोष धारासूरकर यांनी सध्याच्या युगात बदलत चाललेली पत्रकारिता यावर प्रकाश टाकतांना सोशल मिडीया आणि इलेक्ट्रानिक मिडीयाच्या माध्यमातून झालेली क्रांती आणि बदल उपस्थितांना सांगितले. हे धावपळीचं युग असून सर्वजण आपल्या मोबाईवरच सर्व काही पाहत असल्याचं त्यांनी परभणी जिल्ह्याच्या पत्रकारितेच्या गौरवशाली इतिहासाबद्दल माहिती उपस्थितांना दिली.

ज्येष्ठ पत्रकार तथा साहित्यीक डॉ. आसाराम लोमटे यांनी अध्यक्षीय समारोप करत असतांना वृत्तपत्रांसमोरील आव्हान त्याच बरोबर पत्रकारांसाठी असलेल्या अडचणींचा उहापोह करत पत्रकारांनी आपल्या ध्येयापासून दुर न जाता पत्रकारीता करावी. सध्या छापील वृत्तपत्रापेक्षा अन्य माध्यमं खुप पुढं आली आहेत. अशा माध्यमांत देखील वृत्तपत्रांनी सहभागी होत या नव्या माध्यमांना आपलंसं करुन घेणं गरजेचं आहे. वृत्त वाहिन्या, डिजीटल मिडीयाच्या माध्यमातून तात्काळ बातम्या आपल्यासमोर येत आहेत यासाठी वृत्तपत्रांनीही पुढाकार घ्यावा आणि समाजहिताचं काम करावं असं म्हणाले.

सामाजिक कार्यकर्ते डॉ. भारत नांदुरे यांनी भारतीय संविधानाच्या एक लाख प्रती वाटपाचा संकल्प केलेला असून त्यांनी या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांसह सर्व पत्रकारांना संविधानाच्या प्रतीचं वाटप केलं. गेल्या आठ वर्षापासून पत्रकारांच्या आरोग्य शिबीराचे यशस्वीरित्या आयोजन करणारे सुर्या

# बीडच्या बायपासवर दोन्ही ठिकाणच्या उड्डाणपूल आणि सर्व्हिस रोडची निवीदा प्रसिद्ध

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ जानेवारी**

आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांच्या निरंतर प्रयत्न आणि पाठपुराव्याला मोठे यश आले आहे. मा.उच्च न्यायालयाच्यख निर्देशानुसार बीड शहराच्या बाजूने जाणार्या बायपासवर दोन्ही ठिकाणी उड्डाणपूल आणि इतर ठिकाणच्या स्लीप सर्व्हिस रोडच्या कामासाठी आता निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. २२ जानेवारीपर्यंत निवीदा मागविल्या असून लवकरच काम सुरू केले जाणार आहे.

बीड बायपासवर बीड शहरात ये-जा करण्यासाठी छत्रपती संभाजी महाराज चौक समनापूर व महालक्ष्मी चौक, जिरेवाडी ही दोन ठिकाणे प्रवेशद्वार होती. परंतु याठिकाणी उड्डाणपूल नसल्यामुळे याठिकाणांवर अपघातांची मालिका सुरू होती. यासोबतच इमामपूर, नाथापूर व परळी रोडला स्लीप सर्व्हिस रोड नसल्यामुळेही या भागातील नागरिक आणि या परिसरात शेती असलेले शेतकरी यांना त्यांच्या शेतात जदिवसेंदिवस होत असलेले अपघात आणि जाणारे जीव यांची दखल आता मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने घेतली असून यासंदर्भातील आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्यायालयाने निर्णय दिला असून, डिसेंबर २०२४ पर्यंत १२ कि.मी. अंतर असलेल्या बीड शहराच्या लगत असलेल्या बायपासवर छत्रपती संभाजी महाराज चौक व महालक्ष्मी चौक येथे उड्डाणपूल तसेच इमामपूर रोड, नाथापूर रोड, परळी रोड या ठिकाणांवर स्लीप सर्विस रोड मंजूर करण्याचे निर्देश मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला दिले होते. त्यानुसार राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून या कामांची निविदा २ जानेवारी २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून २२ जानेवारीपर्यंत २०२५ निविदा मागविल्या आहेत.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून औरंगाबाद-येडशी महामार्गाचे चौपदरीकरण करण्याचे काम २०१५ साली सुरू करण्यात आले होते. याच कामांतर्गत महामार्गावर बीड शहराच्या पूर्व बाजूने १२ कि.मी. अंतराचा बायपास म्हणजेच बाह्यवळण रस्ता तयार करण्यात आला. परंतु हा बायपास तयार करताना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने इंडियन रोड कॉंग्रेसच्या (IRC) गाईड लाइन्स प्रमाणे काम केले नाही. इंडियन रोड कॉंग्रेसच्या (IRC) च्या गाईड लाइन्स नुसार बायपासला क्रॉस होणार्या राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, जिल्हा मार्ग याठिकाणी स्लीप सर्विस रोड करणे आवश्यक आहे. परंतु बीड बायपासवर बीड-परळी रोड हा राष्ट्रीय महामार्ग, बीड-माजलगाव हा राज्य महामार्ग व बीड-इमामपूर हा प्रमुख जिल्हा मार्ग असे तीन महत्वाचे रस्ते क्रॉस होतात. तसेच बीड शहरात महामार्गावरून प्रवेश करताना असलेले छत्रपती संभाजी महाराज चौक व महालक्ष्मी चौक या दोन्ही ठिकाणी उड्डाणपूल करण्यात आलेला नाही. ही बाब अत्यंत गंभीर आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने याठिकाणी आवश्यक असलेल्या बाबींचे पालन न केल्यामुळे आत्तापर्यंत दोन्ही चौकांमध्ये एकूण १३ लोकांचा बळी गेल्याची नोंद आहे. अनेक लोकांना कायमचे अपंगत्व आले आहे. तर दरदिवस अपघात होऊन असंख्य लोक जखमी होत आहेत.

# सेवानिवृत्त शिक्षकाकडून ९० हजाराची लाच स्विकारतांना शिक्षण विभागातील कुडके एसीबीने पकडला

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ जानेवारी**



हाच तो लाचखोर कुडके

बीड येथील माध्यमिक शिक्षण विभागात कार्यरत असणारा वरिष्ठ लिपीक कुडके यानी सेवानिवृत्त शिक्षकाकडून त्याची सेवा निवृत्तीची कार्यवाही पूर्ण करण्यासाठी ९० हजार रूपयांची लाच मागितली. ठरल्याप्रमाणे सदरील शिक्षकाने कुडके यांना ४० हजार रूपये दिले व उर्वरीत ५० हजार रूपये देताना आज दि.८ जानेवारी २०२५ रोजी माध्यमिक शिक्षण विभागात कुडके यांना लाचलुचपत प्रतिबंधक पथकाच्या अधिकाऱ्यांना पकडल्याची घटना घडली.

येथील शिक्षण विभागात भ्रष्टाचाराने पोखरले आहे. नियमबाह्य कामे करणे, योग्य कामासाठी दिरंगाई करणे, त्यातून पैसे काढणे असे प्रकार राजरोसपणे चालू आहेत. या बाबीला अनेक कर्मचारी कंटाळून गेले आहेत. ही लाच वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत दिली जाते. सेवानिवृत्त शिक्षकाला सेवानिवृत्तीच्या कागदपत्राची पुर्तता करून नागपुरला पाठविण्यासाठी कुडके नावाच्या लाचखोर वरिष्ठ लिपीकाने दिरंगाई करून लाच देण्यास भाग पाडले होते. या प्रकरणी आज दि.८ रोजी जिल्हा परिषद माध्यमिक विभागामध्ये ५० हजार रूपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या डीवायएसपी शंकर शिंदे यांच्या टीमने रंगेहाथ पकडले. या कारवाईने शिक्षण विभागातील लाचखोरांचे दाबे दणाणले आहेत. यामध्ये शिक्षण विभागाचे मोठे अधिकारी गळाला लागणार असल्याचे खात्रीलायक सुत्रांनी सांगितले.

# शिवनी येथील बौद्ध विहारास सोनवणे परिवाराकडून १०० सिमेंटची पोते दान



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.८ जानेवारी**

बीड जवळील शिवणी येथे बौद्ध विहाराचे बांधकाम चालू आहे. माजलगाव येथील फुले नगरचे रहिवासी सेवानिवृत्त शिक्षक राजकुमार सोनवणे यांच्या परिवाराच्या वतीने विहारच्या बांधकामासाठी १०० पोते सिमेंट दान केले आहेत.

बीड जवळील शिवणी येथे भंते धम्मशील यांच्या नेतृत्वाखाली व प्रयत्नातून भव्य असे बौद्ध विहार होत आहे. या विहारासाठी समाजातील विविध घटकातून धम्मदान करण्यात येत आहे.सामाजिक कार्यात सतत सक्रीय असलेले माजलगाव येथील रहिवाशी राजकुमार सोनवणे, सौ.पुष्पा सोनवणे,रोहित सोनवणे. सौ.स्नेहा रोहित सोनवणे. चि.वैभव सोनवणे, कु.राखी सोनवणे यांनी शिवणी येथील बौद्ध विहाराच्या बांधकामासाठी भन्ते धम्मशिल थेरो यांच्या उपस्थितीत १०० सिमेंटची पोती दान केले.

# सर्व कार्यालयानी गतिमानता अभियाना अंतर्गत सप्तसुत्री कार्यक्रम राबविण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ जानेवारी**

प्रशासनाच्या सेवांच्या गुणवतेमध्ये वाढ, लोकाभिमुखता, निर्णयशिलता आण्याण्यासाठी सर्वांच्या सहकार्यातुन उत्तम प्रशासन कार्यान्वित कार्यालयीन गतिमानता अभियान १ जानेवारी ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीत बीड जिल्हयातील सर्व शासकीय, निमशासकीय,स्थानिक स्वराज्य संस्था, शासन अंगीकृत उपक्रम सप्तसुत्री कार्यक्रम कार्यालयात राबवावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले आहे.

सप्तसुत्री कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.वेबसाईट सुगमीकरण, कार्यालयीन स्वच्छता, पिण्याचे पाणी उपलब्धता, स्वच्छतागृहाची स्वच्छता, नागरिकांना सेवा सुलभ मिळण्याच्या दृष्ओने शासनाच्या २ महत्वकांक्षी योजनांची अंमलबजावणी, अर्धनयायिक प्रकरणे चौकशी प्रकरणे, दंडाधिकारीय प्रकरणे विविध पोर्टलवरील प्राप्त तक्रारी निर्गत करणे, अभ्यांगताना भेटीसाठी वेळ सुनिश्चित करुन देणे, लोकशाही दिनाची अंमलबजावणी, गुंतवणुकीला प्रोतसाहन देणे. कार्यालयाची आवश्यक डागडुजी व निगा राखणे, क्षेत्रीय भेटीचे पूर्व नियोजन करुन त्यानुसार क्षेत्र भेटी करणे. प्रत्येकी विभागाने कार्यालयीने आपल्या विभाग कार्यालयां अंतर्गत अधिकारी कर्मचारी, कर्मचारी यांच्या संवाद कार्यक्रमाचे करावे त्यात कर्मचारी यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविणे विषयक सकरात्मक प्रयत्न विभाग, कार्यालय प्रमुखाने यांनी आयोजन करावे.शासनाच्या विविध महत्वकांक्षी योजंनाची परिणमकारक अमंलबजावणी करुन नागरिकांना शासकीय कामात गुणात्मक बदल दृश्य स्वरुपात दिसावा यासाठी सर्व शासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी प्रयत्न करावेत असेही आवाहन करण्यात आले आहे.

# जगप्रसिध्द गायक डागर बंधूंना पद्मश्री शंकर बापूजी धृपद गौरव पुरस्कार प्रदान

**अंबाजोगाईत संगीत सभेने रसिक श्रोते मंत्रमुग्ध**

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.८ जानेवारी**

येथील पद्मश्री कै.शंकरबापू आपेगावकर स्मृती प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी दिला जाणारा पद्मश्री शंकर बापूजी धृपद गौरव पुरस्कार यावर्षी शुक्रवार, दि.३ जानेवारी रोजी जगप्रसिध्द धृपद गायक उस्ताद नफिसोद्दिन डागर व अनिसोद्दिन डागर या बंधूंना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यानिमित्त झालेल्या धृपद संगीत सभेत डागर बंधूंनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

या प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी संगीत व वारकरी संप्रदायातील मान्यवर व्यक्तींना पद्मश्री शंकरबापूंच्या स्मृती हा पुरस्कार दिला जातो. यंदाचा पुरस्कार सोहळा येथील इट एँड स्टे या हॉटेलच्या सभागृहात झाला. अध्यक्षस्थानी नॅचरल शुगरचे प्रमुख बी.बी.ठोंबरे हे होते. योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ.सुरेश खुरसाळे, उद्योजक लक्ष्मणराव मोरे, डॉ.नंदकिशोर सोमवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रख्यात पखावज वादक उध्दवबापू आपेगावकर व संध्याताई आपेगावकर यांची उपस्थिती होती.

बापूंनी समर्पणातून कला जोपासली

पद्मश्री शंकरबापू आपेगावकर यांनी आयुष्यभर पखावजाची संगीत कला समर्पणातून जोपासली. संगीत पाषाणालाही पाझर फोडते, मन आणि बुध्दी तल्लीन होण्याची जादू संगीतामध्ये आहे. असे सांगून डागर बंधूंचे धृपद गायन श्रवण करण्याची संधी मिळाल्याच्या भावना बी.बी.ठोंबरे यांनी व्यक्त केल्या. तर वडील उस्ताद सईदोद्दीन डागर यांच्यामुळे आम्ही धृपद संगीतात उभे राहिलो, त्यांची ही धृपद संगीताची पताका खांद्यावर घेऊन जाण्याचा प्रयत्न करीत आहोत. बापूंच्या नांवे मिळालेल्या पुरस्काराने आमची जबाबदारी आणखी वाढलेली आहे. त्याचा आदर करून शंकरबापूंच्या कलेला व त्यागाला उस्ताद डागर बंधूंनी नमन केले. याप्रसंगी लक्ष्मणराव मोरे व डॉ.सुरेश खुरसाळे यांनीही शंकर बापूंच्या अनेक आठवणी सांगितल्या. पं.उध्दवबापू आपेगावकर यांनी पुरस्काराची संकल्पना व भुमीका मांडली. या पुरस्काराचे पावित्र्य जपण्याचा प्रयत्न करणार असल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या. सन्मानपत्राचे वाचन सीमा सोमवंशी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आसाराम जोशी यांनी केले. तर ऍड.संतोष पवार यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमास माईर्स एमआयटी परिवारातील जेष्ठ तुळशीराम कराड यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी मधुवंती देव (पुणे), प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे, संगीत क्षेत्रातील बार्शीकर, देविदास कुलकर्णी (कळंब), तुकाराम महाराज मुंडे, ज्येष्ठ समाजसेवक विठुसेठ आग्रोया यांच्यासह शहरातील अध्यात्म, संगीत, शिक्षण, पत्रकारीता, उद्योग, क्रीडा, सहकार, समाजकारण, राजकारण, शेती, व्यापार, सांस्कृतिक, नाट्य आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.या पुरस्कार सोहळ्यापुर्वी डागर बंधूंचे धृपद गायन झाले. प्रारंभी त्यांनी राग आलाप व जोडझाला घेऊन कर्नाटकी थाटातील काम्बोजी हा राग सादर करून आपले वेगळेपण दाखवले. त्यांनी गायलेल्या शिव, शिव, शिव या आडाना रागाची लय बध्दता व आवाजातील आर्जवाने रसिक मंत्रमुग्ध झाले होते. सूल तालातील बंदिशीमध्ये धृपद व पखावजाची जुगलबंदी झाली. पंडित उध्दवबापू आपेगावकरांनी आपल्या पखावज वादनाने या संगीत सभेला झालर चढवली. सभागृहात उपस्थित रसिकांनी या जुगलबंदीला टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त दाद दिली.

# व्हॉलीबॉल स्पर्धेत मुलीच्या गटात जयभवानी विद्यालय तर मुलांच्या गटात मारफळा विद्यालय विजेता

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.८ जानेवारी**



जयभवानी आणि जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ अंतर्गत सुरू असलेल्या क्रीडा महोत्सवात माध्यमिक विद्यालय तलवाडा येथे आयोजित केलेल्या व्हॉलीबॉल स्पर्धेत शिवाजीनगर गढी येथील जयभवानी विद्यालयाच्या मुलीच्या संघाने तर मारफळा विद्यालयाच्या मुलांच्या संघाने विजेतेपद पटकावले.


स्पर्धेचे आयोजक रणवीर अमरसिंह पंडित यांनी सर्व विजयी खेळाडूचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.शारदा स्पोर्ट्‌स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली चौथा क्रीडा महोत्सव गेवराई तालुक्यात मोठ्या उत्साहात सुरू आहे. क्रीडा महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तलवाडा येथे भव्य व्हॉलीबॉल स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये जयभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय शिवाजीनगरच्या मुलीच्या संघाने अप्रतिम खेळी करत शारदा विद्या मंदिर देठणचा पराभव केला. ऋतुजा बावस्कर ,येवले धनश्री, श्रद्धा सावंत, शेरे संध्या, चव्हाण आरती, आरगडे वैष्णवी, सरोवर शगुन, थावरे आकांक्षा, यादव श्रद्धा, ईश्वरी जयदीप, जाधवर प्रणाली, तळेकर पुनम यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. मुख्याध्यापक वसंत राठोड, क्रिडाशिक्षक आडे, गिरी, देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले.

मुलांच्या गटात मारफळा विद्यालयाच्या संघाने विजेतेपद पटकावले. संघात आतेश पवार, सुमित राठोड, शुभम राठोड, आदित्य राठोड, अभिजीत पवार, आर्यन राठोड यांनी सहभाग घेतला. मुख्याध्यापक पवार बी.टी., क्रिडा विभाग प्रमुख उनवणे नवनाथ, शेळके सत्यवान यांनी मार्गदर्शन केले.

व्हॉलीबॉल स्पर्धेत तृतीय क्रमांक शिवशारदा पब्लिक स्कूलच्या मुलाच्या संघाने जिंकला. संघात सार्थक भोले, अभिजीत वायाळ, सार्थक शेळके, अमर कोटेकर, राजेश्वर चव्हाण , रितेश बोरकर, अभिषेक गात , व्यंकटेश गाडे, अभय गोरे, आदित्य धानोरे, सुहास करांडे, ऋषिकेश बाबरे यांनी सहभाग घेतला. त्यांना क्रिडा शिक्षक संघ प्रमुख ज्ञानेश्वर धापसे यांचे मार्गदर्शन लाभले.क्रीडा महोत्सवाचे आयोजन रणवीर यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले. यावेळी जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक डॉ. आसाराम मराठे, युवा कार्यकर्ते अक्षय पवार, मोहशिन शेख, अमित वैद्य, बबलु गर्जे, बळीराज शेळके, रितेश खोपडे यांच्यासह जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेचे सर्व मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंबाजोगाईत रोहित भालेकर या अल्पवयीन सतरा वर्षीय जखमी युवकाचा उपचारा दरम्यान मृत्यू, नातेवाईकांचा घातपाताचा संशय

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.८ जानेवारी**



अंबाजोगाई शहरातील रोहित भालेकर या अल्पवयीन सतरा वर्षीय जखमी युवकाचा स्वा रा ती रुग्णालयात उपचारा दरम्यान मृत्यू झाल्याने नातेवाईकांनी घातपाताचा संशय व्यक्त केला आहे.

या विषयी प्राप्त माहिती अशी की, अंबाजोगाई शहरातील पाटील चौक परिसरात राहणारा व कधी ऑटो चालवून तर कधी मजुरी करून उदर निर्वाह करणारा रोहित शंकर भालेकर हा युवक ६ जानेवारी रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास पाटील चौक या ठिकाणीच शेकोटी ला शेकत असतानाच केंद्रे व अल्ताफ नामक या त्याच्या मित्रांनी त्याला बाहेरून येऊ म्हणून आपल्या दुचाकी वर बसवून घेऊन गेले, त्यावेळे पासून त्याचा व घरच्या मंडळींचा संपर्क तुटला होता.

काल दुपारच्या सुमारास त्यांच्या कुटुंबियांना समजले की रोहितला मार लागल्याने स्वा रा ती रुग्णालयात उपचार घेत आहे. दरम्यान उपचार घेत असलेल्या रोहितचा आज सकाळी उपचारा दरम्यान मृत्यु झाला.

रोहितच्या डोक्यास मार लागून मृत्यू झाल्याने आणि तो ज्या केंद्रे व अल्ताफ नामक युवका सोबत गेला होता त्यांचे मोबाईल बंद येत असल्याने रोहितच्या नातेवाईकांनी घातपाताचा संशय व्यक्त केला असून त्याचे शवविच्छेदन सुरू आहे.

दरम्यान रोहित यास १०८ अम्ब्युलेन्स ने कोणत्या ठिकाण हुन स्वा रा ती रुग्णालयात कोणी आणून उपचारासाठी दाखल केले याची माहिती उपलब्ध होऊ शकली नसून सदर घटनास्थळ हे अंबाजोगाई शहर व ग्रामीण पोलीस स्टेशनच्या सरहद्दीवर असल्याने या संदर्भात दोन्ही पोलीस स्टेशन पैकी कोणत्या पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल होतो हे पहावे लागणार आहे.

# संविधान बचाव-जन आक्रोश मोर्चानंतर रिपब्लिकन ऐक्यासाठी रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष माणिकराव वाघमारे यांचा राजीनामा

## शेवटच्या क्षणापर्यंत रिपब्लिकन ऐक्याची चळवळ महाराष्ट्रात उभी करणार-वाघमारे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ जानेवारी**



परभणी येथे भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलीस कोठडीत मृत्यू झाला, तसेच संसदेत देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत अपमान कारक विधान केलं होतं. या दोन्ही घटनेच्या निषेधार्थ काल दि.०६.०१.२०२५ रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर 'संविधान बचाव जनआक्रोश मोर्चा' काढण्यात आला या मोर्चामध्ये राष्ट्रीय नेते डॉ.राजेंद्र गवई साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यातील रिपब्लिकन पक्षाचे सर्व कार्यकर्ते पदाधिकारी सहभागी झाले होते महाराष्ट्र राज्यामध्ये व देशांमध्ये रिपब्लिकन चळवळीची झालेली पीछेहाट पाहुन मन व्यतीत झाल्याचे सांगत समाजाला जर योग्य दिशा देऊन समाजाचे प्रश्न सोडवायचे असतील तर रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य होणे गरजेचे आहे असे मत व्यक्त करून यावेळी रिपब्लिकन ऐक्यासाठी रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष माणिकराव वाघमारे यांनी आपल्या पदाचा राजीनामा देत सर्व आंबेडकरी जनतेने आपल्या न्याय हक्कासाठी आणि समाजावर अन्याय होवू नये यासाठी एकत्र यावे असे आवाहन पत्रकाद्वारे केले आहे.

पुढे पत्रकात म्हटले आहे की, संसदेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जो अमित शाह यांनी अपमान केला आहे, त्याप्रकणी स्वतः संसदेच्या अध्यक्षांनी त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल केला पाहिजे आणि त्यांना जेलमध्ये टाकलं पाहिजे होतं. परंतु, या ठिकाणी असलेली पूर्ण सिस्टीम ही जातीयवादी आहे. परभणीत सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलीस कोठडीत मृत्यू प्रकरण याचा निषेधही आम्ही करत आहेत तसेच परभणी येथील संविधान चौकाची जी विटंबना झाली, परभणीमध्ये अकरा तारखेला जो बंद झाला त्यादरम्यान या बंदमध्ये नसलेले सोमनाथ सूर्यवंशी यांना पकडण्यात आलं आणि त्यांचा जेलमध्ये मृत्यू झाला. तर सोमनाथ सुर्यवंशीच्या हत्येस जबाबदार पोलिसांवर गुन्हे दाखल करावा. त्याचबरोबर अमित शाह यांनी संसदेमध्ये जे वक्तव्य केलं आहे, यासंदर्भात त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा अशी मागणी करत रिपब्लिकन ऐक्यासाठी रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष माणिकराव वाघमारे यांनी राजीनामा देत सर्व आंबेडकरी जनतेने एकत्र येण्याचे आवाहन केले आहे.व पुढील काळात शेवटच्या क्षणापर्यंत रिपब्लिकन ऐक्याची चळवळ महाराष्ट्रात उभी करणार असल्याचे सांगितले आहे.

# बीड येथे अन्न दिन साजरा

## तहसीलदार शेळके यांची स्वस्त धान्य दुकानास भेट

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ जानेवारी**

बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक , जिल्हा पुरवठा अधिकारी ओमकार देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी अन्न दिनानिमित्त स्वस्त धान्य दुकान क्रमांक ३२ ला भेट देऊन लाभार्थ्यांना समक्ष धान्य वाटप करून घेतले आणि ई केवायसी बद्दल मार्गदर्शन केले.

मंगळवार ७ जानेवारी रोजी अन्नदिनाच्या निमित्ताने बीड तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानात शिधापत्रिका धारक यांना धान्य वितरण करून अन्न दिन साजरा करण्यात आला.

बीड तालुक्यात प्राधान्य कुटुंब योजनेचे ६३४८७ , अंत्योदय योजनेचे ७३८४ , ए पी एल योजनेचे शेतकरी १९०६६ , एन पी एच योजनेचे ९२७७ , शुभ्र शिधापत्रिका धारक १५६८ असे एकुण १००७८२ शिधापत्रिकाधारक आहेत . तालुक्यात एकुण ३४८ स्वस्त धान्य दुकाने आहेत.जिल्हाधिकारी अविनाश पाठक मसूरी येथून प्रशिक्षण घेऊन परत आल्यानंतर त्यांनी नागरिकांची कामे लवकरात लवकर झाली पाहिजे तसेच सर्व अधिकाऱ्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रात फिरून जनतेच्या अडचणी समजून घेतल्या पाहिजे , कोठेही अपप्रकार होणार नाहीत याची दक्षता घ्यावी , असे वेळोवेळी आवाहन केले आहे . सध्या पी एच एच व अंत्योदय शिधापत्रिका धारक यांची ईकेवायसी स्वस्त धान्य दुकानदारामार्फत करणे सुरू असून लहान मुले व वयस्कर कुटुंब प्रमुख यांची केवायसी सध्या होणार नसून कुटुंबातील इतर व्यक्ती यांनी केवायसी साठी स्वस्त धान्य दुकानदार यांच्याकडे जाऊन ई केवायसी करावी , असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार देशमुख यांनी केले आहे . ही सुविधा निशुल्क उपलब्ध आहे . त्यासाठी कोणताही खर्च आकारण्यात येत नाही.

# डॉ.राजेश इंगोले यांची इंडीयन मेडीकल असोसिएशनच्या अध्यक्षपदी सलग तिसऱ्यांदा फेरनिवड

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.८ जानेवारी**



अंबाजोगाई येथील सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा इंडीयन मेडीकल असोसिएशन अंबाजोगाईचे सलग आठ वर्षे अध्यक्षपद भूषविलेले विक्रमादित्य डॉ.राजेश इंगोले यांनी मागील दोन वर्षी आय.एम.ए. संघटनेतील सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष म्हणून केलेल्या भरीव व दमदार कार्याची नोंद घेत त्यांची पुन्हा एकदा राज्य कार्यकारिणीच्या सांस्कृतिक समितीच्या अध्यक्षपदी सलग तीसऱ्या वर्षी नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ.इंगोले यांच्या या विक्रमी निवडीचे सर्वस्तरांतून स्वागत व अभिनंदन होत आहे.

आय.एम.एचे महाराष्ट्र अध्यक्ष डॉ.संतोष कदम, सचिव डॉ.अनिल आव्हाड,डॉ.जयेश लेले, नूतन अध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी, माजी अध्यक्ष डॉ रवींद्र कुटे, डॉ दिनेश ठाकरे, डॉ.रामकृष्ण लोंढे, डॉ.संतोष कुलकर्णी, डॉ राजीव जेथलिया,डॉ.राजीव अग्रवाल , डॉ सौरभ संजनवाला, डॉ अनिल पाचनेकर, डॉ नवरंगे , डॉ राजू वरयानी, डॉ संजय पाटील, डॉ रंजन संचेती,डॉ वसंत लुंगे, डॉ सारंग कुलकर्णी, यांच्यासह राज्य कार्यकारिणीच्या सर्व सदस्यांनी एकमताने डॉ.राजेश इंगोले यांची सांस्कृतिक समितीच्या चेअरमनपदी निवड केली आहे. मागील दहा वर्षांपासून डॉ.राजेश इंगोले यांनी ज्या धडाडीने आणि तडफेने संघटनेचे काम केले आणि गेल्या तीन वर्षांपासून सांस्कृतिक समिती मार्फत डॉक्टर्ससाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि स्पर्धांचे आयोजन केले आणि वैद्यकीय क्षेत्रात त्यांनी सांस्कृतीक चळवळ गतिमान केली,त्याची दखल घेऊन राज्य कार्यकारणीच्या सर्व सदस्यांनी डॉ.राजेश इंगोले यांची राज्य सांस्कृतीक समितीच्या चेअरमनपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. इंडीयन मेडिकल असोसिएशनच्या सांस्कृतिक समितीच्या वतीने डॉ.इंगोले यांनी पुण्यामध्ये प्रथमच महाराष्ट्रातील साहित्यिक डॉक्टर्सचे पहिले शब्दगंध साहित्य संमेलन आयोजित करून तसेच कलादर्पण सांस्कृतीक महोत्सव सलग दोन वर्ष आयोजित करून डॉक्टर्सच्या साहित्यिक कलेला व्यासपीठ मिळवून दिले. या उपक्रमाची राष्ट्रीय कार्यकारिणीने दखल घेत डॉ.राजेश इंगोले यांचा सन्मान केला होता.

# भाजपा सदस्य नोंदणीच्या घर चलो अभियानात सहभागी व्हा : खा. डॉ. गोपछडे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०८ जानेवारी**

जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष असलेल्या भाजपाच्या सदस्य नोंदणी अभियानाला राज्यात उदंड प्रतिसाद मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर भाजपा सदस्य नोंदणीसाठी ' घर चलो अभियान ' राबविण्यात येणारा असून दिनांक १० जानेवारी रोजी सर्व बूथ वर राबविण्यात येणाऱ्या या अभियानात सहभागी होऊन भाजपाची जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करावी असे आवाहन खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केली आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशभरात भारतीय जनता पार्टीचे जाळे सर्व दूर आणि सर्व व्यापक विणले जात आहे. प्रत्येक शहर , महानगर , गाव , वाडी, तांड्यापर्यंत भारतीय जनता पार्टीची ध्येय धोरणे पोहोचली जात असून देशाच्या प्रत्येक घटकाला विकासाच्या खऱ्या प्रवाहात आणण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व काम करत आहे. जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष ठरलेला भारतीय जनता पक्ष खऱ्या अर्थाने लोकशाहीचा तारक ठरला आहे . शोषित , पिडीत वंचितांनाही न्याय मिळवून देण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे राज्य आणि केंद्र सरकार प्रामाणिकपणे काम करत असल्यामुळे केंद्रात तिसऱ्यांदा भारतीय जनता पार्टीचे सरकार स्थापन झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी , भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा , केंद्रीय गृहमंत्री अमित भाई शहा यांच्या नेतृत्वाखाली आणि महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनात महाराष्ट्रात भाजपाची सदस्य नोंदणी मोठ्या जोरात सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर भाजपाची सदस्य नोंदणी अधिकाधिक व्हावी या अनुषंगाने प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांच्या सूचनेनुसार दिनांक १० जानेवारी रोजी प्रत्येक बूथ पातळीवर घरोघरी भाजपाचे सदस्य नोंदणी अभियान पोहोचण्यासाठी घर चलो अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानामध्ये भाजपच्या सर्व पदाधिकारी, लोकप्रतिनिधींनी, कार्यकर्त्यांनी, बूथ प्रमुखांनी सहभागी होऊन भाजपाची सर्वाधिक सदस्य नोंदणी करून घ्यावी असे आवाहनही खा. गोपछडे यांनी केले आहे.

# समाजात राष्ट्रीय भावना निर्माण करण्यात खेळाडूंचे मोठे योगदान : आ.डॉ.श्रीजया चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०८ जानेवारी**

खेळाडूंमध्ये शारिरीक क्षमता अधिक असते. त्यासोबतच त्यांच्या मनाचा व बुध्दीचा विकास अधिक होऊन एका सांघिक भावनेने राष्ट्र निर्मितीमध्ये योगदान देण्याचे काम नेहमीच खेळाडू करतात असे प्रतिपादन भोकरच्या आ.ॲड.श्रीजयाताई चव्हाण यांनी आज येथे केले.

ऑल महाराष्ट्र वुशु असोसिएशन ऑल नांदेड जिल्हा वुसू असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने येथील यशवंत महाविद्यालयाच्या ऑडिटेरियममध्ये आयोजित २२ व्या राज्यस्तरीय सिनियर वुशु अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. त्याप्रसंगी त्या उदघाटक म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी संत बाबा बलविंदरसिंघजी हे होते. तर व्यासपिठावर शिवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.मनोहर धोंडे, ऑल महाराष्ट्र वुशु असोसिएशनचे अध्यक्ष एस.एस.कटके, वुसू असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष डॉ.हसराज वैद्य, नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष



संतोष पांडागळे, माजी नगरसेवक दुष्यंत सोनाळे, सरदार मनमोहनकौर जंगी, वुशुचे जिल्हा सचिव डॉ.राजेश जांभळे, सहसचिव डॉ.प्रमोद वाघमारे, डॉ.शीतल भालके, विनोद जमदाडे यांची उपस्थिती होती.

आ.चव्हाण पुढे म्हणाल्या की, वुशु खेळ प्रकारामध्ये शारीरिक क्षमतेसह योगाभ्यासाचे धडे दिले जातात. दक्षिण आशियामधील हा अत्यंत लोकप्रिय खेळ असून या खेळाच्या माध्यमातून अनेक होतकरू खेळाडूंना आरक्षीत जागेंवर काम करण्याची संधी मिळते. मी माझ्या आयुष्यात पहिल्यांदाच वुशु खेळाचे चित्तथरारक प्रात्यक्षिके अनुभवली. राज्यभरातून आलेल्या सर्व खेळाडू व त्यांचे प्रशिक्षक यांचे आपण स्वागत करतो व त्यासोबतच या खेळ प्रकाराच्या समर्थनासाठी शासन स्तरावर प्रयत्न करू असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. प्रारंभी संत बाबा बलविंदरसिंघजी व आ.ॲड.श्रीजयाताई चव्हाण यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. राज्यभरातून आलेल्या प्रशिक्षकांना व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते सन्मानीत करण्यात आले.

आजपासून सुरु झालेल्या या राज्यस्तरीय स्पर्धेचा समारोप १० जानेवारी रोजी होणार आहे. राज्यभरातील सुमारे २ हजार वुशु खेळाडू स्पर्धेत सहभागी झाले आहेत. यावेळी माजी नगरसेवक दुष्यंत सोनाळे यांचे समयोचित भाषण झाले.

## संक्षिप्त वृत्त



### तालूका मराठी पत्रकार संघाच्या वतीने दर्पण दिन साजरा

**मुदखेड-**आद्य मराठी पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी मराठीतील पहिले वृत्तपत्र 'दर्पण' सुरु केलेल्या दर्पण दिन वर्धापन दिनानिमित्त शहरातील शासकीय विश्रामगृह येथे तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यानंतर पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक वसंत सप्रे, कॉंग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, कैलास गोडसे, भाजपाचे युवा नेते कुणाल चौधरी यांच्या वतीने दर्पण दिनानिमित्त पत्रकारांना नोट बुक,व लेखणी, देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मराठी पत्रकार परिषद जिल्हा संघटक प्रताप देशमुख, तालुकाध्यक्ष सिद्धार्थ चौदंते, माजी जिल्हा सहसचिव संजय कोलते, शेख अजगर हुसेन साब, गंगाधर डांगे, संतोष पाटील गाढे, नामदेव बिच्चेवार, साहेबराव हौसरे, साहेबराव गागलवाड, उत्तम हानमंते, दिनेश शर्मा, नामदेव राहेरे, शेख शमशोद्दीन, प्रा. संदिप देशमुख, मनोज कमटे,अतिक अहमद, धम्मा कांबळे,अमोल टेकले, आब्दुल रज्जाक, पिराजी गाडेकर, हाफीज खुरेशी, महमद हाकिम, यासह आदिंची उपस्थीती होती.

### शालेय जीवनापासून स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन आवश्यक : मनीषाताई धोंडगे



**कंधार-**जिवनात यशाचे उतूंग शिखर गाठायचे असेल तर बालवयात शालेय जिवनापासूनच स्पर्धा परीक्षांचे धडे आणि मार्गदर्शन मिळाले तर भविष्यात यशाचे शिखर पादाक्रांत करता येईल असे मार्गदर्शन मनीषाताई पुरुषोत्तम धोंडगे यांनी कंधार येथे गरुड झेप कोचिंग क्लासेस कंधार द्वारा आयोजित राज्यस्तरीय नवोदय सराव स्पर्धाचे बक्षिस वितरण प्रसंगी केले . कंधार शहरातील शिक्षणतज्ज्ञ सौ रंजना लुंगारे यांच्या गरुड झेप कोचिंग क्लासेस च्या वतीने दि.५ जानेवारी२०२५ रोजी घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय नवोदय सराव पेपर मध्ये कंधार तालुक्यातील सुमारे साडेतिनशे विद्यार्थांनी सहभाग नोंदविला होता. विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले त्यांना सौ मनीषाताई पुरुषोत्तम धोंडगे यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला त्यावेळी त्या मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. सदरील स्पर्धा यशस्वी करण्यासाठी माणिक बोरकर , राजू केंद्रे सर, झडते सर, विजय दिग्रसकर सर, प्रल्हाद बोरकर सर येरमे सर, जोगपेठे सर, गडपवार सर, वंजे मॅडम, पेटकर मॅडम, सोनी वंजे मॅडम, पवार मॅडम, योगीराज स्वामी, गायकवाड मॅडम, कदम सर, भागवत सरनाईक , तसेच पूर्ण मित्रमंडळी यांनी अतोनात मेहनत करून ही स्पर्धा यशस्वी केली. या स्पर्धेत पहिले बक्षीस २००१ रुपये दुसरे बक्षीस १५०१ रुपये व तिसरे बक्षीस १००१ रुपये असे होते त्यात प्रथम पारितोषिक समर वीर योगेंद्रसिंग ठाकूर कंधार व स्वरा सरचंद्र डांगे लोहा दुसरे बक्षीस अभिषेक धनाजी वाघमारे कंधार ९६.२५% व कपिल आनंद कदम कंधार ९६.२५%, दुसरे बक्षीस अभिषेक धनाजी वाघमारे कंधार ९६.२५% अद्वैत गोपीनाथ केंद्रे कंधार ९६.२५% आर्यन धोंडीबा मुसळे कंधार ९६.२५% आणि एकूण २१ विद्यार्थ्यांना प्रोत्साहन पर बक्षीस देण्यात आले.

# कायमस्वरूपी अधिकारी नसल्याने नागरीकांची हेळसांड

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. ०८ जानेवारी**

नांदेड येथील सिडको कार्यालयात कायमस्वरूपी अधिकारी (प्रशासक), सहायक विकास अधिकारी व लिपिक यांना अतिरिक्त पदभार असल्याने वरील अधिकारी त्यांच्या सवडीनुसार नांदेड सिडको कार्यालया कामकाज पाहण्यास येत असल्याने येथील नागरिकांचे बरेच कामे खोळंबुन बसतात. तेव्हा सिडकोचे मुख्य प्रशासक यांनी ही बाब लक्षात घेऊन नांदेड सिडको येथे कायमस्वरूपी अधिकारी कर्मचारी देऊन नागरिकांची होणारी हेळसांड थांबवावी् अशी मागणी आहे.

नांदेड सिडको कार्यालय येथे गेल्या दोन महिन्यापासून सिडको कार्यालयात प्रशासक व लिपिक आले नसल्याने येथील नागरिकांचे बरीच कामे प्रलंबित आहेत. ही बाब लक्षात घेऊन सिडकोचे मुख्य प्रशासक यांनी नांदेड सिडको कार्यालयात कायमस्वरूपी प्रशासक, सहाय्यक विकास अधिकारी आणि लिपिक देऊन येतील नागरिकांचे होणारी हेळसांड थांबवावी वरील अधिकारी सिडको कार्यालयास पंधरा दिवस नंतर ते एक महिना नंतर काम काजण्यास येत असल्याने नागरिकांचे महत्त्वाची कामे बँक

नाहरकत प्रमाणपत्र, बांधकाम ना हरकत प्रमाणपत्र, घरा व प्लॉटचे हस्तांतरण व लिजडेट तसेच वारसा साठी लागणारे मूल्यांकन प्रमाणपत्र असे आवश्यक असलेली कामे खोळंबलेली आहेत. तसेच गेल्या काही दिवसापासून येतील लिपिक विलास जोशी सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या ठिकाणी आणखी कोणताही लिपिक कर्मचारी घेण्यात आलेला नाही. त्यामुळे येतील मालमत्ता धारकांचे महत्वाची कामे प्रलंबित असल्याने कार्यालयात वारंवार मालमत्ता धारक येऊन अधिकारी कर्मचारी यांची विचारपूस करत आहेत. काही कामे वरिष्ठ अधिकारी औरंगाबाद येथे टपालनी मागवीत असतात पण स्थानिक नांदेड सिडको कार्यालयात लिपिकच नसल्यामुळे कुठल्याही फाईलचे काम पूर्ण होत नसल्याने टपाल औरंगाबादला कसा जाणार हा प्रश्न आहे आणि टपाल घेऊन जाण्यासाठी अधिकचा खर्च सामान्य नागरिकांना सोसावा लागतो. सदरील बाबी सुरळीत करण्यासाठी सिडको मुख्य प्रशासकांनी नांदेड सिडको कार्यालयात कायमस्वरूपी अधिकारी कर्मचारी यांची नियुक्ती करावी अशी मागणी सिडकोतील राजकीय, सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते व नागरिक यांच्याकडून होत आहे.

# नांदेड जिल्ह्याच्या तीन स्थानिक सुट्ट्या जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०८ जानेवारी**

जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांना असलेल्या अधिकारान्वये सन २०२५ मधील तीन स्थानिक सुट्ट्या आज जिल्हा प्रशासनाने जाहीर केल्या आहेत. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी आज जाहीर केलेल्या सुट्ट्यांमध्ये १७ जानेवारी, १ सप्टेंबर, १८ डिसेंबर या तीन तारखांना सुटी जाहीर करण्यात आली आहे.

यामध्ये १७ जानेवारीला हसरत हाजी सैयाह सखरे मगदूम बडी दर्गाह कंधार ऊर्स, १ सप्टेंबरला ज्येष्ठा गौरी पूजन तर १८ डिसेंबरला श्रीक्षेत्र खंडोबा माळेगाव यात्रा निमित्त सुटी जाहीर करण्यात आल्या आहे.

# बाळंतपण व कुटुंबकल्याण शस्त्रक्रियांचे द्विशतक; तामसा आरोग्य केंद्राची कामगिरी



**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. ०८ जानेवारी**

तामसा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात महिन्यात सामान्य प्रसूती व कुटुंब कल्याण शस्त्रक्रियांचे द्विशतक नववर्ष पूर्वसंध्येला पूर्ण झाले आहे. वैद्यकीय अधिकारी डॉ. रामदास बोंदरवाड यांनी सीईओ मीनल करणवाल, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, जिल्हा माता बालसंगोपन अधिकारी डॉ. शिवशक्ती पवार यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार आरोग्य कर्मचारी, आशावर्कर यांच्या संघटित प्रयत्नातून ही कामगिरी शक्य केली आहे. पीएचसीच्या उत्साहवर्धक सेवाकार्यामुळे सकारात्मक व सुखद चित्र बघायला मिळत आहे. ग्रामीण भागातील नागरिकांची पीएचसी मध्ये सामान्य बाळंतपण करण्याबाबत असलेली उदासीनता व शहरातील महागडा खर्च सहन करीत सिजरद्वारे होणाऱ्या प्रसुतीच्या पार्श्वभूमीवर तामसा पीएचसीचे सामान्य प्रस्तुतीतील द्विशतक कौतुकास्पद मानले जाते.

ग्रामीण भागातील गरोदर मातांना पीएचसीमध्ये सामान्य बाळांतपणासाठी विश्वास वाढविण्यात यश मिळाले आहे. येथे झालेले बहुतांश बाळंतपण हे मध्यरात्रीचे आहेत. येथे बाळंतपणासाठी येणाऱ्या गरोदर मातांना माहेरपणाचा मानसिक आधार देण्याचा प्रयत्न महिला कर्मचारी करतात. ३८ मातांना अपवादात्मक स्थितीत बाळंतपणासाठी नांदेडला रेफर केले. पीएचसीत बाळंतपण होण्यामुळे गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबाचा सिजरवरील लाखो रुपयांचा खर्च वाचला आहे. येथे प्रसूती झालेल्यांमध्ये तामसा येथील ४६ व ग्रामीण भागातील १५४ महिलांचा समावेश आहे. जन्मलेल्या बाळांना क्षयरोग, कावीळ,पोलिओ आदी प्रतिबंधात्मक लस नियमित दिली जातात. तामसा पीएचसीच्या दोनशे कुटुंबकल्याण शस्त्रक्रिया ३१ डिसेंबरला पूर्ण झाल्या वार्षिक उद्दिष्ट जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात पूर्ण होणार आहे. येथे दोन पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया एकाच महिन्यात होण्याची लक्षणीय कामगिरी मानली जाते. नववर्षाच्या पूर्वसंध्येला द्विशतकी कामगिरीबद्दल आरोग्य कर्मचारी रामेश्वर चिभडे, मीनाक्षी राठोड, विष्णूशक्ती ढोले, वर्षा कराळे, रुग्णवाहिका चालक सतीश छत्रे यांच्यासह आशावर्कर कर्मचाऱ्यांचा प्रोत्साहनपर सत्कार करण्यात आला.

# राज्यस्तरीय ज्युदो स्पर्धेत नागेश लुटे यास सुवर्णपदक



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०८ जानेवारी**

नुकतेच पुणे येथे पार पडलेल्या सब ज्युनियर राज्यस्तरीय ज्युदो स्पर्धेमध्ये असर्जन येथील नागेश नारायण लुटे पाटील याने सुवर्णपदक मिळवले असून राष्ट्रीय स्तरावर त्याची निवड झाली आहे.

राष्ट्रीय निवड चाचणी अंतर्गत पुणे येथील छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम येथे दि. ७ जानेवारी रोजी ५१ व्या राज्यस्तरीय ज्यूदो स्पर्धेचे तसेच राष्ट्रीय निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत असर्जन येथील पैलवान नागेश नारायण पाटील लुटे याने सुवर्णपदक मिळवले आहे. त्यास नांदेड जिल्हा जुदा असोसिएशन असोसिएशनचे सचिव प्रवीणकुमार कुट्टीकर, उपाध्यक्ष रविकुमार बकवाड, जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे, क्रीडा अधिकारी संजय बेतिवार, बालाजी शिरसिकर यांचे मार्गदर्शन लाभले.

सुवर्णपदक मिळवल्याबद्दल विठ्ठलराव पुयड, जगतसिंग गाडीवाले, दिलीपसिंग गाडीवाले, रविकिरण डोईफोडे, प्रल्हादराव पुयड, जगन्नाथ टरके, गोपीचंद लुटे, अमोल कंकाळ, बारी वस्ताद आदींनी नागेश लुटे याचे अभिनंदन केले आहे.

# महसूल मंडळामध्ये मंडळ अधिकारी व तलाठी यांच्याकडून शेतकऱ्यांची फेरफार करण्यासाठी अडवणूक

**तभा वृत्तसेवा**
**फूलवळ,दि. ०८ जानेवारी**

वारसा, कौटुंबिक वाटणी पत्र असलेले सातबारा, नावाने फेरफार करण्यासाठी तलाठी, मंडल अधिकारी हे सहा-सहा महिने करत नसल्याने शेतकरी हेलपाटे मारुन परेशान असून शेतकऱ्याकडून तसेच गावातील नागरिकाकडून संताप व्यक्त केला जात आहे.

कंधार तालुक्यातील फुलवळ महसूल मंडळांतर्गत फुलवळ,मुंडेवाडी सोमास वाडी,महादेव तांडा,केवळा तांडा ही गावे असून सध्या विविध प्रकारचे नावाने सातबारा करण्यासाठी शेतकऱ्यांची लगबग चालू आहे.आई-वडिलांच्या नावाने असलेली जमीन मुलांच्या नावाने फेरफार करणे, भावांच्या नावाने असलेली जमीन भावाच्या नावाने फेरफार करणे तसेच वारसा व कौटुंबिक वाटणी करून घेण्यासाठी शेतकरी तलाठ्याकडे फाईली टाकलेले आहेत. सहा-सहा महिने झाले फाईली टाकून तलाठी, मंडल अधिकारी यांच्या मनमानी कारभारामुळे बहुतांश शेतकऱ्यांचे फेरफार करणे रेंगाळत पडले आहे.तलाठी म्हणतात, मंडल अधिकारी यांना भेटा, मंडल अधिकारी म्हणतात, माझ्याकडे फाईल आलीच नाही, या दोघात शेतकरी चकरा मारुन पायातील चप्पल झिजवत आहे. फेरफार करून घेण्यासाठी तलाठी, मंडल अधिकारी दहा,वीस हजार रुपयांची मागणी करत आहेत अशी तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. जे गोरगरीब शेतकरी आहे,तो वीस हजार कोठून देणार ? नियमानुसार असलेल्या वारसा, कौटुंबिक वाटणीचे फेरफार करण्यास तलाठी, मंडल अधिकारी अडवणूक करत असल्याने शेतकऱ्यांतून संताप व्यक्त केला जात आहे. ज्यांनी पैसे दिले त्यांचे फेरफार करत असल्याचे शेतकऱ्यांतून बोलले जात आहे. कोणता तरी नियम दाखवून शेतकऱ्यांना हाकलून देतात.

बहुतांश फेरफारचे फाईली तलाठ्याकडे पडून असून शेतकरी चकरा मारुन परेशान आहेत. या संदर्भात कामाजी मंगनाळे यांनी तहसीलदार यांना निवेदन देऊन कामामध्ये कुचराई करणाऱ्या कर्मचाऱ्यांना तंबी देऊन शेतकऱ्यांची होणारी आडवणूक थांबवावी. कंधार तालुक्यातील बहुतांश तलाठी, मंडल अधिकारी सज्जावर राहत नसून कुठे तरी दौरा दाखवून आठ आठ दिवस दांडी मारतात. काही शेतकऱ्यांना आपल्या गावाचा तलाठी, मंडल अधिकारी कोण आहेत, माहितीच नाही. याकडे तहसीलदार साहेबांनी वेळीच लक्ष देऊन गावातील नागरिकांच्या होणाऱ्या गैरसोईकडे लक्ष द्यावे.

# राजगुरुनगर येथील घटनेच्या निषेधार्थ गिरी गोसावी समाजाचे तहसीलदारांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. ०८ जानेवारी**

पुणे राजगुरूनगर येथिल दोन पिडीत मुलींवर बलात्कार करुन निर्गुण खुन करण्यात आला. त्या नरधामास फाशीची शिक्षा देण्याची मागणी निवेदनाद्वारे गिरि गोसावी समाजाच्या वतीने तहसीलदार यांच्याकडे केली आहे.

राजगुरूनगर येथिल पिडीत मुलीवर बलात्कार करून निर्गुण हत्या करण्यात आली त्या नरधामास फाशीची शिक्षा व्हावी म्हणून मुदखेड न्याहाळी येथिल गिरी गोसावी समाज व मुदखेड येथील सर्वांच्या वतीने आपणास विनंती करतोत आमचा आवाज आमचे निवेदन शासन दरबारी पोहचुन पिडीत मुलीला व परिवारास न्याय मिळावून द्यावा व त्या नराधमास फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी निवेदनाद्वारे



मागणी केली आहे.

काळीमा फासनाऱ्या या घटनेचा गिरी गोसावी समाज न्याहाळी व सर्व नागरीक मुदखेडच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला आहे.यावेळी निवेदनकर्ते मानसिंग कुंवारगिर गिरी, उत्तम ईश्वर गिरी, संजय बन्सी गिरी, मारोती किसन गिरी, संजय किसन, गिरी संजय दगडु आऊलवार ,गोविंद संभाजी गोपनपल्ले, शिवा तोटेवाड, बालाजी गोविंद कवडेकर,ज्ञानेश्वर राजु गिरी, भिमराव, विश्वनाथहमहादवाड राजु बन्सी गिरी, संजय साहेबराव गिरी, साहेबराव बाबाराव पावडे, सचिन मगरे, पुरुषोत्तम रमेश चांडक, नितिन नागनाथ गोडसे, सचिन गोपिचंद चंद्रे, संजय दत्ता सोनटक्के अविनाश झमकडे, साहेबराव चव्हाण, कैलास गोडसे, मुजीब पठाण, बालाजी परमेश्वर गिरी, सय्यद अमजद रामराव वडजे, बालाजी कैलास गिरी, मारोती बाबु गिरी, बालाजी उत्तम महादवाड, राजु बारतोंडे, बालाजी तुळशिराम चव्हाण, मारोती बिच्चेवाड, अमोल आबादार, अंकूश मामीडवार, वेदांत शेवटे,यासह आदिंची उपस्थीती होती.


# सिडकोतील मनपा दवाखान्यात चाकू दाखवून तरुणाने घातला धुमाकूळ

## कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेतेचा प्रश्न कायम

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. ०८ जानेवारी**

सिडको येथील मनापा सेवा आरोग्य केंद्र येथे दिनांक ८ जानेवारी रोजी सकाळी ९:३० वाजताच्या सुमारास सिडको परिसरातील नशेत असलेल्या एका तरुणांनी चाकू दाखवून दवाखान्यातील महिला व पुरुष कर्मचारी यांच्या अंगावर धावून जात होता. तेव्हा येथील भयभीत झालेले कर्मचारी यांनी पोलिसात धाव घेतली व मनापाचे आयुक्त यांचीही भेट घेऊन त्यांना सुरक्षिततेच मागणी करण्यात आली.

सिडको मनपा दवाखाना येते दिनांक ८ जानेवारी रोजी येथील सर्वच महिला व पुरुष कर्मचारी आपल्या कर्तव्यावर बजावत



असताना अचानक एक मद्यधुंद अवस्थेत एक तरुण आला आणि औषधी वगैरेची विचारपूस करत कर्मचाऱ्यांची विचारपूस न करता चाकू काढून धुमाकूळ घतला. या प्रकरणामुळे सदरील दवाखान्यातील सर्व कर्मचारी भयभीत झाले. ही घटना वैद्यकीय अधिकारी शिंदे एस.के. व सर्व कर्मचारी यांनी मद्य धुंद अवस्थेत असलेल्या तरुणावर योग्य ती कारवाई करण्यात यावी असा अर्ज नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे येथे करण्यात आला. पण सदरील दवाखाना येते गेल्या ५ ते ७ वर्षापासून सुरक्षा रक्षकाची नेमणूक करण्यात आली नाही. ही मागणी वारंवार करूनही आरोग्य विभागाचे डॉ.बिसेन व आयुक्त डॉ . डोईफोडे यांनी सदरील मागणीस टाळाटाळ करून या ठिकाणी सुरक्षा रक्षक देण्यात आला नाही. तेव्हा अशी कांही घटना घडुन आल्यास येतील कर्मचारी यांच्या जीविताचे काही बरे वाईट झाल्यास वरिष्ठ जबाबदार असतील. तेव्हा त्यांनी ही बाब लक्षात घेऊन या ठिकाणी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करावी अशी मागणी दवाखान्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ. शिंदे एस.के. व कर्मचाऱ्यांनी केली आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# नांदुरा येथील ग्रामस्थांचे पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन

## उप कार्यकारी अभियंत्याच्या आश्वासनानंतर आंदोलन मागे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ जानेवारी**

तालुक्यातील नांदुरा येथे जलजीवन मिशन योजनेअंतर्गत होत असलेल्या गैरकारभारामुळे येथील गावकऱ्यांना पाणीपूरवठा होत नसल्याने बुधवारी गावांतील महिला, पुरूषांनी पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईल आंदोलन करीत पाणीपुरवठा करण्याची तसेच या योजनेत झालेल्या गैरकारभाराची मागणी केली. अखेर ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे उप कार्यकारी अधिकारी यांनी एक महिन्यात योजनेची कामे पूर्ण करून सुरळीत पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन दिल्यानंतर गावकरयंनी आंदोलन मागे घेतले.

नांदुरा येथे जलजीवन मिशन योजनेअंतर्गत काम सुरू आहे. जलजीवन मिशन सिंचन विहीरीची रजिस्ट्री गट नं ५१ ची करण्यात आली मात्र शेतकरी व कंत्राटदार यांनी संगनमत करून गट नं ५२ मध्ये सदर सिंचन विहीरीचे खोदकाम केले. गट नं ५२ मधील विहीरीमध्ये शेतकरी मालक हे मोटार टाकून पाणी शेतीला देत आहेत. त्यामुळे विहीरीत पाणीसाठा शिल्लक राहत नसल्याने गावाला पाणी चार दिवसापासून गावाला पाणीपुरवठा बंद आहे. विशेष म्हणजे शेतकरी व कंत्राटदार यांनी ग्रामपंचायत नांदुरादेवी या नावाने खरेदीखत करण्याऐवजी कडती ग्रामपंचायत नावाने खरेदी खत केले आहे. या प्रकरणाची तत्काळ दखल घेत सखोल चौकशी करून गावाला जलजीवन मिशनयोजनेतून पाणीपूरवठा करावा अशी मागणी केली ग्रामीण पाणी पुरवठाच्या कार्यकारी अभियंता यांच्याकडे केली होती. कोणतीच कार्यवाही न झाल्याने ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी यांचेकडे मंगळवारी निवेदन सादर केले होते.

परंतु प्रशासन गांभीर्याने धेत नसल्याने दि ८ जानेवारी रोजी गावातील महिला आणि पुरूष आक्रमक झाले त्यांनी गावातील जलजीवन मिशन योजनेत बांधलेल्या पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईल आंदोलन केले. या आंदोलनाची दखल ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने घेतली. उपकार्यकारी अभियंता यांनी थेट नांदुरा गाव गाठत आंदोलनकर्त्यांना विहीरीपासून ते पाण्याच्या टाकीपर्यंतचे पाईपलाईनचे काम तसेच गावातील वितरण व्यवस्थेतेतील लिकेज काढणे आणि इतर किरकोळ को करण्यासाठी एक महिन्याचा अवधी मागितला. यावेळी ग्रामस्थांनी एक महिन्यात गावाला जलजीवन मिशन योजनेतून पाणी न मिळाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. यावेळी सुरेश तनपुरे, ओमकार तनपुरे, विश्वनाथ पोहकर, रामप्रसाद कोल्हे, विशाल पडोळे, संतोष गिरी, संदीप तनपुरे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. यावेळी मोठ्या संख्येने महिलाही उपस्थित होत्या.

# वाळू माफीयांकडून तलाठ्याच्या अंगावर टिप्पर घालण्याचा प्रयत्न

## सेनगाव पोलिसांनी आरोपींना घेतले ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ जानेवारी**

सेनगाव तालुक्यातील ब्रम्हवाडी ते लिंबाळा तांडा रस्त्यावर वाळूची वाहतुक करणारे टिप्पर पकडण्यासाठी गेलेल्या महसूल विभागाच्या पथकावर वाळू माफीयांनी हल्ला करून एका तलाठ्यास मारहाण करीत अंगावर टिप्पर घालण्याचा प्रयत्न केला. तलाठ्याने उडी मारल्यामुळे त्यांचा जीव वाचला. याप्रकरणी सेनगाव पोलिसांनी नऊ जणांवर गुन्हा दाखल केला असून आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे.

सेनगाव तालुक्यातील ब्रम्हवाडी वाळू घाटांवरून वाळू उपसा केला जात असल्याची माहीती महसूल विभागाला मिळाली होती. त्यावरून उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, तहसीलदार सखाराम मांडवगडे यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी गहनीनाथ गांधीले, तलाठी वसंत जाधव, प्रदीप इंगोले, नामदेव ढोले यांच्यासह कर्मचाऱ्यांचे पथक दि ७ जानेवारी रोजी मंगळवारी ब्रम्हवाडी ते लिंबाळा तांडा रस्त्यावर वाहनांची तपासणी करीत होते. यामध्ये दोन टिप्पर मधून वाळू वाहतुक केली जात असल्याचे आढळून आले. या पथकाने दोन्ही टिप्पर थांबवून पोलिस ठाण्यात नेण्यास सांगितले असता तेथे आलेल्या नऊ जणांनी पथकांतील कर्मचाऱ्यांना मारहाण केली तसेच तलाठी वसंत जाधव यांची कॉलर पकडून मारहाण केली. टिप्पर चालक टिप्पर घेऊन जात असतांना तलाठी जाधव यांनी त्यास थांबविण्याचा प्रयत्न केला असता चालकांनी त्यांच्या अंगावर टिप्पर घालून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. यावेळी तलाठी जाधव यांनी बाजूला उडी मारल्याने ते बचावले. त्यानंतर चालकांनी वाळू रस्त्यावर सांडून टिप्परसह पळ काढला. याप्रकरणी जाधच यांच्या तक्रारीवरून सेनगाव पोलिस ठाण्यात आरोपी लक्ष्मण नागरे, शेकुराव गडदे, शिवाजी गडदे, प्रकाश गडदे, जीवन देशमुख याच्यासह दोन टिप्पर चालक आणि इतर दोन अनोळखी इसमांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी विना क्रमांकाचे अशोक लिलँड कंपनीचे पिवळा रंग असलेले पाठीमागे शिवसेना नाव असलेला टिप्पर जप्त केला आहे.

जिल्ह्यात वाळू माफीयांचा कहर झाला असून महसुलच्या पथकांवर सर्रास जीवघेणे हल्ले होत आहेत. या वाळू माफीयांकडे या धंद्यातून अमाप संपत्ती जमा झाल्यामुळे कायद्याचा धाक त्यांना राहीला नाही. एका टिप्परचे २७ ते ३० हजार रूपयाला विक्री करीत आहेत. दिवसभरात महसूल प्रशासन आणि पोलिस यांच्या डोळ्यात धूळफेक करीत रात्री उशिरा किंवा पहाटे वाळू माफीया अवैध वाळूंची वाहतुक करीत असतांना दिसत आहे. सेनगाव तालुक्यातील अवैध वाळू जिंतूर, रिसोड, वाशिम आणि हिंगोली या ठिकाणी सर्रासपणे पुरवली जात आहे. या धंद्यात मोठी कमाई असल्यामुळे वाळू माफीयांची ताकद दिवसेंदिवस वाढत आहे. वाळू घाटांचे लिलाव होऊ दिल्या जात नाहीत. यामागेही वाळू माफीयांचा हात असल्याचे बोलले जाते. जिल्ह्यातील सर्वच वाळू माफीयांवर कडक कारवाईची आवश्यकता आहे.

शासनाने वाळू डेपो तयार करण्याचे आदेश दिले होते परंतु हा वाळू डेपो हा केवळ कागदावरच राहील्यामुळे सर्वसामान्यांना वाळू माफीयांकडून बेभाव वाळू विकत घ्यावी लागत आहे.

# २५ बालकांना ऱ्हदयशस्त्रक्रियेसाठी केले रवाना

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ जानेवारी**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत व केंद्र शासनाच्या राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या वैद्यकीय पथकाकडून शून्य ते १८ वर्षे वयोगटातील संदर्भित संशयित हृदय रुग्णांसाठी नुकतेच जिल्हा रुग्णालयात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नितीन तडस यांच्या मार्गदर्शनाखाली टूडी-इको तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ही तपासणी बालाजी हॉस्पिटल, मुंबई येथील तज्ञ कार्डियालॉजीस्ट डॉ. जयश्री मिश्रा व डॉ. प्रतिक मिश्रा आणि त्यांचे चमू यांच्यामार्फत करण्यात आली.



या टूडी-इको तपासणीमधून २५ बालकांना पुढील हृदयशस्त्रक्रिया करण्यासाठी संदर्भीत करण्यात आले होते.

त्यानुसार या रुग्णालयांकडून दि. ६ जानेवारी, २०२५ रोजी हृदय शस्त्रक्रियेसाठी बालकांना घेऊन जाण्यासाठी ट्रॅव्हल्स पाठविण्यात आली होती. या बसमध्ये एकूण २३ बालकांना बालाजी हॉस्पिटल, भायखळा, मुंबई येथे शस्त्रक्रियेसाठी पाठविण्यात आले. या बसला जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितीन तडस यांनी हिरवा झेंडा दाखवून रवाना केले. यावेळी अस्थिव्यंग तज्ञ डॉ. मंगेश टेहरे, डॉ. मनीष बगडीया, बालरोग तज्ञ डॉ. स्नेहल नगरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. बालाजी भाकरे उपस्थित होते.

शस्त्रक्रियेसाठी संदर्भीत विद्यार्थ्यांच्या शस्त्रक्रिया या महात्मा ज्योतीबा फुले जीवनदायी जन आरोग्य योजनेंतर्गत व आरबीएसके कार्यक्रमांतर्गत करण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील विद्यार्थी व पालकांनी आरबीएसके कार्यक्रमामार्फत दैनंदिन जीवनात वावरताना हृदयाच्या आजारासंदर्भात वेळोवेळी टूडी-इको तपासणी करावी व वेळेत आजाराचे निदान करुन घ्यावे, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नितीन तडस यांनी केले आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा कार्यक्रम पर्यवेक्षक लक्ष्मण गाभणे, सांख्यिकी अन्वेषक ज्ञानोबा चव्हाण, राजेंद्र खंदारे, बद्रीनाथ शेळके व राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमातील वैद्यकीय अधिकारी, औषध निर्माता, एएनएम व कार्यालयीन कर्मचारी, रुग्णालयीन अधिपरिचारिका इत्यादींनी परिश्रम घेतले.



**हिंगोली- उपप्रादेशिक परिवहन विभागाच्यावतीने रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत एस टी महामंडळातील चालक, वाहक तसेच मेकॅनिकल यांची नेत्र तपासणी करण्यात आली. यावेळी नेत्रतज्ज्ञ डॉ प्रमोद देवसरकर, सुमीत पासीकंटी, मोटार वाहन निरीक्षक तडवी, श्रीमती गोरे, विक्रांत बोयणे, अरविंद तोडकरी, पुष्कराज, विजय दिघे, कैलास भोर्गे आदींची उपस्थिती होती. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत दराडे विद्यालयाचे यश



हिंगोली- भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय येथील नागेश नर्सीकर हा इयत्ता नववीचा विद्यार्थी कराटे स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदकाचा मानकरी ठरला आहे. वाशिम येथे नेहरू युवा केंद्र व वाशिम जिल्हा कराटे असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने कराटे स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत नागेश नर्सीकर या विद्यार्थ्याने १४ वर्षे वयोगट व ३५ किलो वजन गट यामध्ये प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदक जिंकले आहे. साहित्य, कला क्रीडा आणि विज्ञान अशा सर्वच क्षेत्रात भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्थेचे विद्यार्थी भरारी मारताना दिसत आहेत. नागेश च्या यशाने शाळेच्या नावलौकिकात मानाचा तुरा खोवला गेला आहे. या विद्यार्थ्याला क्रीडा अध्यापक अनिल लोळेवार यांचे मार्गदर्शन लाभले. याबद्दल शाळेत नागेश चा मुख्याध्यापक डॉ. प्रकाश अंभोरे यांनी शाळेच्या व संस्थेच्यावतीने सत्कार केला. संस्थेचे अध्यक्ष, सचिव व सर्व संचालक तसेच उपमुख्याध्यापक जितेंद्र भट्ट, पर्यवेक्षक तुलसी चीलमूल, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी नागेशचे अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.


### सरसकट पीक विमा वाटप करण्याची मागणी

हिंगोली- मागील वर्षी ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टीमुळे सोयाबीन, कापूस आणि इतर पीकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. शेतकऱ्यांना शासन आणि प्रशासनाने तत्काळ पंचनामे करण्याचे आदेश दिले होते. परंतु कंपनीने पंचनामे करण्यास दिरंगाई केली. त्यानंतर शासनाने शेतकऱ्यांना नुकसानीपोटी २५ टक्के अग्रीम रक्कम देण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी कंपनीला दिले होते. परंतु शेतकऱ्यांना अद्यापही कंपनीने रक्कम अदा केली नाही. शेतकरी हवालदिल झाला आहे. संबंधीत कंपनीवर तत्काळ कार्यवाही करण्यात यावी तसेच शेतकऱ्यांना नुकसानीपोटी आर्थिक मदत द्यावी अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे गजानन कावरखे, नामदेव पतंगे, प्रवीण पाटील, कैलास सावके, संदीप पांडूरंग मानमोठे, अक्षय सावके, बळीराम गवळी यांनी केली आहे. यासंदर्भात जिल्हा कृषी अधीक्षक यांना शेतकऱ्यांनी निवेदन सादर केले आहे.

# वाघमारे गेले आता वाघ आले

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ८ जानेवारी**





वसमत शहर पोलिस ठाण्यात कार्यरत असलेला पोलीस कर्मचारी विलास मुकाडे याने पोलिस ठाण्याच्या शस्त्रागारातील पिस्टल आणि १४ काडतुस चोरून हिंगोलीत सासरवाडीत जाऊन अंदाधुंद गोळीबार करून तिघांचा खून केला होता. याप्रकरणी ठाण्याचे पोलिस निरीक्षक कुंदनकुमार वाघमारे यांची बदली करण्यात आली. त्यांच्याजागी सुधीर वाघ यांची नियुक्ती करण्यात आली. वाघमारे गेले आता वाघ आले अशी चर्चा सध्या होऊ लागली आहे.

वसमत शहर पोलिस ठाण्यातील विलास मुकाडे याने काही दिवसापूर्वी पोलिस ठाण्यातील पिस्टल व १४ काडतूस चोरून हिंगोलीत आणले. या पोलिस कर्मचारी विलास मुकाडे याच्यावर हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल झाला असून वसमत शहर पोलिस ठाण्यात पिस्टल चोरीचा गुन्हा दाखल झाला. पोलिस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी पिस्टल चोरी प्रकरणात चौकशी करून अहवाल सादर करण्याचे उपअधिक्षक कार्यालयास आदेश दिले होते. सदर चौकशीमुळे कुंदनकुमार वाघमारे यांची जिल्हा विशेष शाखेत बदली करण्यात आली असून त्यांच्या जागेवर जिल्हा विशेष शाखेचे पोलिस निरीक्षक सुधीर वाघ यांची नियुक्ती शहर पोलीस ठाण्यात केली आहे. सुधीर वाघ हे वसमत शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक म्हणून रुजू झाले आहे.

# अध्ययनस्तर निश्चितीमध्ये चुकीचे गुणदान केल्यामुळे शिक्षक निलंबीत

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ जानेवारी**

निपुण हिंगोली या उपक्रमात अध्ययनस्तर निश्चितीमध्ये चुकीचे गुणदान करणारा पेडगाव जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षकाला निलंबीत करण्यात आले असून त्यांच्या निलंबनाचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी दि ७ जानेवारी मंगळवारी काढले आहेत.

हिंगोली जिल्ह्यात जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या संकल्पनेतून निपुण हिंगोली हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. जिल्हाधिकारी गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ८८० शाळांमधून राबविला जात आहे. या उपक्रमात सुरूवातीच्या टप्प्यात शिक्षकांनीच विद्यार्थ्यांची अध्ययनस्तर निश्चिती करून त्यानंतर त्यांना कृतीयुक्त शिक्षण, गट चर्चा यातून त्यांची गुणवत्ता वाढविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दि ३१ जानेवरीपर्यंत या शाळांमधून गुणवत्ता वाढ व्हावी यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

दरम्यान, अध्ययनस्तर निश्चिती झालेल्या शाळांमधून जिल्हाधिकारी अभिनव गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी भेट देऊन पाहणी करण्यास सुरूवात केली आहे. त्यांनी मागील पंधरा दिवसांपूर्वी पेडगाव येथील जिल्हा परिषद शाळेला भेट दिली होती. यावेळी जिल्हाधिकारी गोयल यांनी इयत्ता चौथीच्या वर्गावर जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच त्यांना प्रश्नही विचारले. मात्र विद्यार्थ्यांना मुळाक्षरांची माहीती नाही, इंग्रजी शब्द वाचता येत नाही, वजाबाकी देखील करता आली नाही. या प्रकारामुळे शिक्षण अरूण कांबळे यांनी वाढीव गुणदान केल्याचे स्पष्ट झाले. यावरून तातडीने अहवाल सादर करण्याचे आदेश गटशिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आले होते. गटशिक्षणाधिकारी नितीन नेटके यांनी सविस्तर अहवाल जिल्हा परिषदेकडे सादर केला. या अहवालावरून शिक्षक कांबळे यांना निलंबीत केले.

# जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०२४ जिल्हाधिकाऱ्यांचेहस्ते पुस्तकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ जानेवारी**



जिल्हा सांख्यिकी कार्यालयामार्फत वर्ष २०२४ करिता सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील सर्व घटकनिहाय सांख्यिकी माहिती असलेले पुस्तक तयार करण्यात आले आहे. या पुस्तकाचे विमोचन आज जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा नियोजन अधिकारी ग. गो. चितळे, जिल्हा सांख्यिकी कार्यालयाचे उपसंचालक एस. एम. रचावाड, सहायक संशोधन अधिकारी ए. ए. करेवार, सांख्यिकी सहायक निशा नवले उपस्थित होते. जिल्हा सांख्यिकी कार्यालयामार्फत दरवर्षी हिंगोली जिल्ह्याच्या समग्र आढाव्यासह दृष्टीक्षेपात जिल्हा, निवडक निर्देशांक, जिल्हा उत्पन्न, कृषी, जलसंपदा, वने, उद्योग, सहकार, शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, पाणीपुरवठा, उर्जा, जिल्हा वार्षिक योजना व इतर विकास योजना इत्यादी विषयक बाबींच्या अनुषंगाने सांख्यिकी तक्त्यांचा समावेश असलेले जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन प्रकाशन प्रकाशित करण्यात येते. प्रकाशनामध्ये जिल्ह्यामधील कला व संस्कृती, यात्रा, क्रीडा, सांस्कृतिक महोत्सव, पर्यटन याविषयी विशेष माहिती उपलब्ध करण्यात आली आहे. यात जिल्ह्यामध्ये नव्याने निर्माण झालेले हळद संशोधन केंद्र व लिगो-इंडिया प्रकल्प याविषयी सविस्तर माहितीचा समावेश करण्यात आला आहे. या प्रकाशनामुळे जिल्ह्याच्या विकासाचे नियोजन करताना शासनाच्या विविध विभागांना, स्थानिक स्वराज्य संस्थांना जिल्ह्याशी संबंधित सर्वांगीण आकडेवारी, तपशीलवार माहिती उपलब्ध होईल. तसेच संशोधक व विद्यार्थ्यांना हे प्रकाशन निश्चीत मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास जिल्हाधिकारी गोयल यांनी व्यक्त केला.

# हिंगोली पोलिस अधीक्षक कार्यालयात वृक्षारोपन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ जानेवारी**

येथील जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय परिसरात नांदेड परीक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमप यांचेहस्ते वृक्षारोपन करण्यात आले.

यावेळी पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या हस्ते महोगुनी, वड आणि ताम्हण जातीच्या झाडांचे वृक्षारोपण आणि संवर्धन कार्यक्रम घेण्यात आला. पोलीस अधिक्षक कार्यालय हिंगोली येथे श्री उमाप हे वार्षिक तपासणीसाठी आलेले होते. यावेळी पोलीस अधीक्षक कोकाटे आणि सद्भाव आणि जायंट्स संस्थेचे डॉ. अभय कुमार भारतीया यांनी वृक्ष संगोपन आणि संवर्धन कार्यक्रमाची माहिती दिली.

यावेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह श्रीमती शालिनी नाईक प्रभारी गृह पोलीस उप अधीक्षक, पोलिस निरीक्षक विकास पाटील, नागेश पवार राखीव पोलीस निरीक्षक, सुधीर वाघ जिल्हा विशेष शाखा पोलीस निरीक्षक, शिवसांब घेवारे सहायक पोलीस निरीक्षक यांच्यासह सदभाव आणि जायन्ट्स चे डॉ. अभयकुमार भरतीया, विनोद खरात पोलीस शिपाई फोलेसह पोलिस अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती होती.